मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

या अंकांत

याशिवाय अभिप्राय, कविता, संघवार्ता व वि. सा. संघाच्या परीक्षांचा निकाल.

वर्ष १० | संपादक : | मार्च १९५६
अंक १२ | दि. ब. पंडित | किंमत आठ आणे

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
श्री. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

र्ष १० वें अंक १२ वा

मार्च १९५६

संपादकीय

हें संपादकीय मी फार जड अंत:करणाने आणि काहीसा अपराधी वृत्तीने लिहीत आहें. डॉ. भाऊजी दफ्तरी गेले सहा महिने रुग्णशय्येवर पडून होते आणि त्यांचा देहान्त समीप येऊन ठेपला होता. त्यांचा मृत्यु ही कांही अनपेक्षित घटना नाही. मृत्यूचीं पाऊलें हळूहळू त्यांच्यावर आक्रमण करून येत होतीं आणि गेले कांही दिवस त्यांच्या निकटवर्तीयांना भाऊजी आता इहलोकीचे राहिले नाहीत ह्याची खात्री होऊन चुकली होती. पण मृत्यूने घडणारा वियोग शाश्वत असल्यामुळे ज्या क्षणीं तो घडून येतो त्या क्षणीं अंत:करणाला वेदनेपायीं बधिरता आली तर नवल नाही.

डॉ. भाऊजी गेले, ते जाणारच होते, जायला ते स्वत: सिद्धहि होते. त्यांना मृत्यु दिसूं लागल्यापासून त्यांनीं हळूहळू निर्याणाची सिद्धता केली. त्यांनी जीवनांत जें ध्येय आपल्या दृष्टीसमोर ठेवलें तें त्यांना प्राप्त झाल्यामुळे त्यांनी अखेरचा समाधानाचा सुस्कारा सोडला, असेंहि झालें नाही. त्यांना समचिकित्सा ह्या देशांत रुजलेली पाहावयाची होती. पण तें साध्य झालें नाही. तें कां साध्य झालें नाही ह्याची मीमांसा करण्याचें हें स्थळ नव्हे. पण त्यांच्या ह्या विषयाच्या जिव्हाळ्याची ज्यांना कल्पना आहे, त्यांना भाऊजीच्या ह्या बाबतच्या आकांक्षा आजहि त्यांच्या नित्य बसायच्या खुर्चीभोवती तरंगत आहेत असें भासल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या समचिकित्सेच्या प्रसाराचीच उपेक्षा झाली असेंहि नाही. त्यांचें जीवन म्हणजे सामाजिक उपेक्षेचा पोवाडा आहे. आता भाऊजी दिवंगत झाले म्हणून अनेकजण विलपाचे आर्तरव काढतील आणि श्रोते गोळा करून आपलें वियोगाचें दु:ख त्यांना कथन करतील. पण हिमालयासारख्या उत्तुंग बुद्धिमत्तेच्या त्या महापुरुषाची त्यांच्या हयातींत बूज करायला कोणीहि पुढे सरसावला नाही. नागपूर विद्यापीठाने त्यांना D. Lit. ही पदवी दिली एवढीच काय ती समाजाने त्यांच्याप्रत आपली कृतज्ञता व्यक्त केली. पण तद्व्यतिरिक्त सर्वत्र उपेक्षा. आमच्या विदर्भ साहित्य संघाचीच गोष्ट घ्या ना. घटनेमध्ये सन्मान्य सभासद करून घेण्याची सोय

अनुक्रमणिका

असतांहि ते विदर्भ साहित्य संघाचे सभासद नव्हते. निवडणुकींत आपणाला मतें देतील असे खात्रीचे मतदार नोंदणीं करण्यांत गर्क असणाऱ्यांना ही कल्पना सुचली नाही तर नाहीच, पण वर्षानुवर्ष कोणत्या उमेदवारांना मतें दिलीं तर विदर्भसाहित्याचें पुरःसरण होईल त्यासंबंधी पत्रद्वारेंहि उपदेशात्मक पाठ सामान्य सदस्यांना देणाऱ्या श्रेष्ठींनाहि ही कल्पना सुचली नाही हें मोठें नवल होय. संपादक कार्यकारिणीचा सदस्य असूनहि तो हें करूं धजला नाही, हा त्याचा अपराध होय. त्या अपराधाची आता निष्कृति शक्य नाही.

भाऊजींची कोणत्या क्षेत्रांत कोणती उपेक्षा झाली नाही ? त्यांची उपेक्षा केल्याच्या पातकाचा शिंतोडा आपल्यावर उडूं नये म्हणून 'भाऊजी प्रसिद्धिपराङ्मुख होते' म्हणून लटकी स्तुति करायला हे सारे महाभाग पुढे सरसावतात. वस्तुस्थिति अशी आहे की भाऊजी प्रसिद्धिसन्मुख होते; पण आपल्या नांवाचा गाजावाजा झाला की आपण प्रसिद्ध झालों अशी खुळेपणाची कल्पना त्यांनी उराशीं कवळून आपल्या भोवतीं लगेढोल त्यांनी गोळा केले नाहीत किंवा ते कोणाच्या गळीं पडले नाहीत. त्यांच्या संशोधनाची प्रसिद्धि व्हावी ही त्यांची आत्यंतिक इच्छा होती. त्यांत सामाजिक हित आहे अशी त्यांची श्रद्धा होती, म्हणून त्यांना तशी इच्छा होती. लोकेषणा सगळ्यांना ज्या कोत्या अर्थानें असते तशी ईषणा त्यांना नव्हती म्हणून कोणत्याहि प्रकारें त्यांनी जाहिरातदारांना आपल्या वेंचेंत घेतले नाही. ते कोणाच्या वेंचेंत जाणें तर शक्यच नव्हतें. त्यांच्या सत्यप्रियतेची दाहकता बेगडी स्तुति आणि 'नाम'मात्र प्रसिद्धि देणाऱ्यांना सह्य कशी झाली असती ? आपलें नांव म्हणजेच आपल्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण परिचय असें मानणाऱ्यांना आपल्या वडीलधाऱ्या माणसांनी मोठ्या कौतुकानें बारशाच्या दिवशीं दिलेली देणगी हेंच काय तें नांवाचें बिरुद. पण भाऊजींना इतक्या भुईसपाट प्रसिद्धीची कल्पनाच शिवत नसे. त्यांचे सिद्धान्त म्हणजे भाऊजी, त्यांचे विचार म्हणजे भाऊजी, त्यांचे ग्रंथ म्हणजे भाऊजी. त्यांची प्रसिद्धि म्हणजे भाऊजींची प्रसिद्धि.

पण नवल असें की भाऊजींची लेखमाला युगवाणींत येऊं लागल्याबरोबर युगवाणी वाचनीय राहिली नाही असा अभिप्राय व्यक्त होऊं लागला. कांहींनी तसें स्पष्ट म्हटलें; कांहींनी पडद्यामागून–असूर्यंपश्येच्या विनयशीलतेनें, कांही थोड्यांनी आमचें अभिनंदन केलें. व त्यांच्याच प्रोत्साहनाचा आधार घेऊन आम्ही आमचा हट्टवादीपणा तसाच पुढे रेटला. आमच्या साहित्याच्या कल्पना ह्या अशा आहेत. साहित्याच्या क्षेत्रांत गोंडस, ललित, नादमधुर किंवा डौलदार शब्दांच्या अर्थशून्य जुळवणीला आज बाजारभाव आहे. कठोर बुद्धीनें विषयाच्या गाभ्याचा भेद करून राकट शब्दांनी प्रमेयविस्तार करणाऱ्याला किंमत नाही. केवळ परंपरागत कल्पना म्हणून साहित्याला शारदा, सरस्वती म्हणून देवता कल्पायची. पण सरस्वतीच्या महान पूजकाची वास्तपुस्तहि करायची नाही. मंदिरांत प्रवेश केल्यावर भक्तदर्शनानें पुलकित होणाऱ्यांची दर्शनेच्छूंत संख्या जवळ जवळ दशकाच्या आंतच, बाकीची शेकडेवारी दुसरीकडेच टक लावणाऱ्यांची. भक्तानें अशांच्याकडे नेत्रवीक्षणहि केलें नाही तर तो ध्यानमग्न म्हणून त्याला वानलें की पुरें झालें. ओठांनी स्तुति करावी भक्ताची, मनानें आराधना करावी सभामंडपांतील इतरेजनांची. कोणत्याहि देवळांत हाच प्रकार असायचा. भक्त असतो गाभाऱ्यांत ध्यानमग्न आणि देवदासी असतात सभामंडपांत देवसेवेसाठी दर्शकांच्या नेत्रांना सुखवीत. नटून थटून मुरडायची आवश्यकता असते त्यांना. भक्ताला भानहि नसतें त्यांच्या दैहिक रूपाचें. हीणकस वाङ्मय आणि सकस वाङ्मय त्यांत हा फरक आहे. साहित्याच्या निरनिराळ्या जातींपैकी ह्या दोन जाती आहेत. साहित्यिकांच्या वेगवेगळ्या वर्गांपैकी हे दोन वर्ग आहेत. भाऊजी दुसऱ्या वर्गाचे होते.

भाऊजींच्या वाट्याला ही उपेक्षा कां आली, ह्याची जर बारकाईनें छाननी केली तर प्रथितप्रसिद्धि मोठ्या लोकांच्या छोटेपणाचें मोठें चिकित्सापूर्ण परीक्षण होईल. पण त्या मार्गानें आमच्या सारख्या माणसांनी न गेलेलेंच बरें. भाऊजींच्या पाशीं एकतर अगदी लहान माणसें गोळा होत किंवा फार मोठीं माणसें येत. मधला वर्ग त्यांच्यापाशीं यायला धजत नसे. मोकळ्या माळरानामध्ये एखादें वारूळ वाढावें

अनुक्रमणिका

आणि आपण आंतून पोकळ आहोंत ह्या न्यूनतेच्या जाणिवेला आपल्या अंतर्भागाच्या विवरांत दडवून ठेवून आढ्यतेने त्या सपाट माळरानांत आपलें शिखर त्याने उंचवावें तसाच प्रकार बहुतेक 'मोठया' माणसांचा असतो. त्यांचा हा न्यूनगंड हिमालयाच्या उंचीकडे मान वर करून पाहूं शकेल कसा? त्या उंचीचें मापन केलें तर आपला मुंग्यांनी पोखरलेला आणि कीटांचें आश्रय-स्थान बनलेला मृत्कणांचा ढोलारा किती क्षुद्र आहे याची दुःखद जाणीव उदित होईल ती सह्य कशी होणार? आपली न्यूनता सहन करायला माणूस नम्रवृत्ति लागतो. क्षीणवृत्तीचा माणूस नम्र असत नाही; उलट तो अहंकारी होतो. आणि तो मोठ्यांचा मोठेपणा तोंडाने कबूल करीत मनाने नाकारीत असतो. एरव्ही भाऊजींच्या उपेक्षेची उपपत्ति लागत नाही. ते प्रसिद्धिपराङ्मुख होतें ही सबब प्रसिद्धीचीं साधनें हाताशीं असणाऱ्यांनी पुढे केली की ते निव्वळ जाहिरातदार आहेत असें खुशाल समजावें.

एवढा महान् सरस्वतीचा उपासक गेला पण जेथे सरस्वतीची उपासना चालायची तेथे जुजबी दुखवटा व्यक्त करायला मिनिटभराची शांतता पाळून श्रद्धाञ्जली अर्पण करण्यापेक्षा जास्त उपचार पाळला गेला नाही. कांही अपवाद म्हणून एकदोन शाळांनी तासा दोन तासांची सुटी देण्याची भलाई दाखविली, तर ज्या सायंकाळीं भाऊजींचा पार्थिव देह अग्नि आपल्या शतजिव्हांनी लपेटत होता, त्याच सायंकाळीं येथील एका महाविद्यालयांतील वाङ्मयमंडळाचा वार्षिकोत्सव निर्वेध पार पडला होता. आमची उत्सव-प्रियता एवढी दांडगी तर जेथें निवडणुकीच्या मत-दानाचा फड उघडला होता तेथील उत्साह एवढा उधाण भराला आला होता की त्या भरांत आपलें कार्यालय एका सायंकाळपुरतें का होईना बंद ठेवावें ह्याचें भानच आमच्या संघाला राहिलें नाही. संपादक कार्यकारिणीचा सभासद असूनहि हा प्रमाद घडला. ह्या अपराधाची निष्कृति आता मालगाडीएवढा लांब-लचक ठराव करूनहि होणार नाही.

आता ठराव होतील. मोठमोठे ठराव होतील. ठिकठिकाणीं ठराव होतील. सभेसाठी गोळा होणारी मंडळी आपण सामुदायिक रीत्या व्यथित अंतःकरणाचे आहोंत याची ग्वाही देतील. माणसाचा मोठेपणा त्याच्या मृत्यूनंतर आम्हांला उमजतो. हयातभराच्या महत्तेच्या संप्राप्तीचा तो पूर्णविराम असल्यामुळे तत्पूर्वी मोठेपणाला मान्यता देणें म्हणजे पूर्णत्वाची अपेक्षा आपणाला नाही, स्तोत्रें गायची घाई आहे असें दिसेल म्हणून आम्ही मोठ्यांच्या हयातींत त्यांची उपेक्षा करीत असतों. क्षुद्रांच्या नांवाला आम्ही त्यांच्या हयातींत वानतों, ह्याचें कारण त्यांना मृत्यूने मोठेपणा येणार नसतो हें तर नसेल?

तें कांही असो. भाऊजींचें नांव वारंवार 'प्रामुख्याने' छापून आलें नाही, म्हणून त्यांना लाघवाचा स्पर्श होणार नाही. मानवाच्या देहाचें आयुर्मान आणि त्याच्या कृतीचें आयुर्मान यांत फार तफावत असते. नांवाची प्रसिद्धी म्हणजे साडेतीन हात देहाचा परिचय. छे, तो देहाचाहि परिचय नाही. किती तरी नांवें नित्य वाचून पाठ होतात, पण त्या नांवांनी विभूषित होणारे देह कसे असतील ह्याची ओझरती जिज्ञासाहि कोणाला उत्पन्न होत नाही. ह्यामध्ये दडलेला व्यक्तित्वाचा उपमर्द मोठ्यांच्याहि ध्यानीं येत नाही म्हणून ते आपल्या नांवाच्या आणि व्यक्तिगत प्रसिद्धीच्या हपापांत गुंतलेले असतात. भाऊजी या अर्थाने प्रसिद्धि-पराङ्मुख होते.

त्यांनी स्वतः आपल्या नांवाचा डिंडिम पिटविला नाही. तें दगडावर कोरले जावें म्हणून प्रयत्न केला नाही. किंवा कालांतराने नागपूरचा मोहेंजोदारो झाल्यावर प्रागेतिहास संशोधकांना आपलें नांव गवसावें म्हणून नांवाचा ताम्रपट गाडायचा 'विधि' केला नाही. समाजाच्या वैचारिक जीवनाचा ओघ वाहता रहाणार आहे, तोंवर भाऊजींचें नांव पुसून जाणार नाही. मग उत्खननाची वार्ता कोठली? त्यांची उपेक्षा झाली तर त्यांत उपेक्षकांचा कोतेपणा प्रकट झाला. काल अनंत आहे आणि पृथ्वी विपुल आहे अशी ज्यांची श्रद्धा, त्यांच्या ठायीं जाहिरात-दारांबद्दल औद्धत्य दिसलें तर तें साहजिक होय. असें

(पुढील मजकूर पान ५ वर)

कै. विद्वद्रत्न भाऊजी दप्तरी

मा. ज. कानटकर

भाऊजींच्या तोडीचे अष्टपैलू विद्वान आज देशांत किती असतील तें सांगवत नाही. ज्ञानाची कुतरओढ चाललेल्या आजचे वातावरण भाऊजींची प्रतिकृति निर्माण होण्यास सर्वस्वी प्रतिकूल आहे, त्यामुळे भाऊजींच्या निर्याणाने निर्माण झालेली उणीव भरून येणें जवळपास दुरापास्त आहे असें म्हणण्यांत कोरडा भाषेचा अलंकार नसून यथार्थत्वाचेंच वर्णन आहे.

भाऊजींचें जीवन व्यावहारिक दृष्टया कष्टमय झालें असेल, पण शिष्टपणाचा आव आणून त्यांच्या कष्टप्रद जीवनाबद्दल आमचेपैकी कोणीहि हळहळणें म्हणजे त्या धीर गंभीर पुरुषाचा अपमान करणें आहे, असें माझें स्पष्ट मत आहे. एखाद्या विषयावर लिखाण सुरूं असलें म्हणजे विचारचक्रामुळे झोप येऊं नये, सगळे गाव डाराडुर झोपलें असतां काजळाचा फुटभर उंचीचा लोट वर सोडणारी एकोणिसाव्या शतकांतील चिमणी पेटवावी व परस्पर विरोधी दोष असणाऱ्या दोन डोळ्यांपैकी एक डोळा मिचका करून दुसऱ्या डोळ्याने एकाग्रतेने लेखन व वाचन करावें व असें करीत असतां मनाला स्वतःच्या कष्टाबद्दल क्षणाचीहि खंत वाटूं देऊं नये अशा ब्राह्मी स्थितींत सदैव रममाण असणाऱ्या व म्हणूनच 'स्थितिः स्यात् अंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमिच्छति' या भगवद्दत्त हमीचा सतत उपभोग घेणाऱ्या भाऊजींच्या व्यावहारिक कष्टमय जीवनाबाबत आम्ही कोणत्या तोंडाने बोलावें अगर लिहावें ? आमच्या खोटया व हिणकस मापटयांनी भाऊजींच्या जीवनाचें मोजमाप करणें हें फार मोठें पाप ठरेल.

सामान्य चाहत्यांची भाऊजींच्या बाबतींत अशी स्थिति आहे. एखाद्या खंद्या पक्क्या गाणाराचें गाणें चालावें, बव्हंश श्रोत्यांना राग समजूं नये, ताल ओळखतां येऊं नये, कांहींनी उठून जावें, बऱ्याचशांनी बसावें पण गाणें कां व कसें चांगलें झालें हें समजण्याची पात्रता मात्र अगदी बोटावर मोजता येतील एवढ्यांचीच असावी, अगदी तशागत भाऊजींचें जीवनसंगीत झालें. ज्या ज्या शास्त्रांत त्यांनी लक्ष दिलें त्या त्या शास्त्रांतील दिग्गजांशीं त्यांना सामना द्यावा लागला. तेव्हा मोठ्या प्रयासाने मरणाकाठी त्यांना निर्विवाद मान्यता मिळाली आणि पूर्वायुष्यांत त्यांचा हिरीरीने विरोध केलेलेहि श्रद्धांजलि वाहून गेले. हा सृष्टिनियमच आहे. तेव्हा याबाबत विषाद प्रकट करण्यांत कोणतेंहि स्वारस्य नाही.

भाऊजींच्या बहुविध योग्यतेपैकी वैद्य या नात्यानेच माझा वीस वर्षें अतिशय घनिष्ट संबंध आला. मी व माझे कुटुंबीय त्यांना प्रिय होण्याचे एकमेव कारण एवढेंच की, कशाहि स्थितींत आम्ही त्यांच्या औषधीयोजनेवरच विसंबून राहिलों. यामुळें भाऊजींनी वैद्य या नात्याने केलेले कितीतरी चमत्कार मी प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. असें असूनहि भाऊजी व त्यांची चिकित्सापद्धति या दोघांनाहि अविचारपूर्वक आणि पूर्वदूषित ग्रहामुळे त्याज्य मानणारे डॉक्टर माझ्या पाहण्यांत येत, तेव्हा फार वाईट वाटे. ही सर्व मंडळी भाऊजींना हेकड समजत, हा त्यांच्यावर मोठा अन्याय आहे. एका क्षयरोगी बाईच्या नवऱ्यास भाऊजी म्हणाले, "हें पहा ! माझें रोगनिदान ठीक आहे. औषधियोजनाहि ठीक आहे. हाच रोग मी देत असलेल्या औषधाने बरा झाला आहे. तुमच्या पत्नीला महिनाभर औषध देत असूनहि अनुकूल परिणाम कां दिसत नाही हें मलाच समजत नाही. सबब आता

तुम्ही माझें औषध बंद करा व तुम्हांला जी दुसरी योग्य वाटेल ती योजना करा." "मी थकलों, माझी अक्कल संपली" असें स्पष्ट व बिनदिक्कत सांगणारा या नमुन्याचा वैद्य मला अजून तरी भेटला नाही. माझीं तीन लहान मुलें दगावलीं. पैकी एकाचे बाबतींत स्वत:ची चूक झाल्याचे भाऊजींनी फारच मोकळेपणाने कबूल केले, असाहि डॉक्टर माझ्या पाहण्यांत आला नाही.

इतक्या स्फटिकवत, स्वच्छ मनाचा, स्वत:ची चूक कबूल करण्यास तत्पर असलेला माणूस हेकड समजला जावा, हें समाजाच्या बुद्धिमांद्याचें लक्षण आहे. एखाद्याने स्वत:च्या चुकीच्या विचारसरणीचा (जी बहुमतमान्य आहे एवढ्याकरितांच) अभिमान बाळगावा व ज्याच्या पाठीशीं सत्य आहे त्याने मात्र स्वत:चें मत पहिला खरचटा लागतांच सोडून द्यावें ही अपेक्षा कमालीची तर्कशून्य आहे. अशा तर्कशून्यतेशीं प्रसन्नचित्ताने आजन्म टक्कर दिलेल्या विद्वद्रत्न भाऊजींबद्दल मला जो आदर वाटतो तो व्यक्त करण्यास मजजवळ पुरेसे शब्द नसल्यामुळे माझी ही श्रद्धाञ्जलि येथेच आटोपती घेतों.

संपादकीय

(पान ३ वरून)

औद्धत्य म्हणा वा उदासीनता म्हणा त्यांच्या ठायीं होती म्हणून आम्ही त्यांना प्रसिद्धिपराङ्मुख म्हणणार !!!

आमचें भाग्य म्हणून आम्ही त्यांच्या निकट आलों. आमचें भाग्य म्हणून आमचा लहानपणा त्यांच्या निकट बसायला आम्हाला साहाय्यक ठरला. आमचें भाग्य म्हणून त्यांनी आम्हांवर अनुग्रह करून 'युगवाणी' साठी लेखमाला पुरविली. आणि आमचें अहोभाग्य म्हणून आम्ही त्यांचा ज्ञानसंभार अंशमात्र का होईना युगवाणीच्या वाचकांना अखंड सादर केला.

तपस्वी

एक वस्तुनिष्ठ व्यक्तिदर्शन

गो. रा. दोडके

सत्याग्रहाचा दंड सरकारांत न भरल्यामुळे—घरावर कुडकी आली.

घरांतील सगळचा मोलवान वस्तू निघून गेल्या.

गणित, ज्योतिष्य, क्षारौषधें यांचीहि पुस्तकें त्याचबरोबर गेलीं.

सगळं सामान गाडींत भरलं गेलं व गाडी चालू झाली.

जड अंतःकरणानं एक म्हातारा तिच्यामागून चालूं लागला. तो कुणाशीं बोलला नाही, कुणाकडेहि त्यानं पाहिलं नाही. जमिनीकडे लागलेली त्याची नजर वर झाली नाही. बाहेरचं जग जणूं त्याच्या दृष्टीपुरतं नाहीसं झालं होतं. आणि त्याची दृष्टि हृदयांतील जग न्याहाळीत होती.

गाडी कोतवालीजवळ आली.

दार ओलांडून गेली.

म्हातारा दाराजवळील पुलाजवळ थांबला. नंतर त्यानं पुलावरील धूळ उपरण्यानं झाडली. व पुलावर तो बसून राहिला. दुपारच्या उन्हांत तास दीड तास त्याने तेथेच काढला. मग एक दीर्घ निसासा टाकला व घराचा मार्ग सुधारला.

सायंकाळीं भाऊजीकडे अनेक माणसं सांत्वनाकरितां आलीं. ते कुणाशीच कांही बोलले नाहीं. माणसं येत, बसत, बोलत व निघून जात. मीहि त्यांच्याकडे गेलों. त्यावेळीं त्यांच्याभोवतीं कुणीच नव्हतं. एकटेच उपरण्यानं वारा घेत होते. मुद्रा खिन्नच होती. मी जाऊन त्यांच्याजवळ बसतांच त्यांनी एकवार माझ्याकडे पाहिलं आणि ते पुन्हा आपल्या मनांत निघून गेले. मी आल्याची त्यांनी जाणीवहि घेतली नाही. मला शांत राहणं असह्य झालं. मी भाऊजीकडे बघत म्हटलं,

"सामान परत मिळण्याकरिता तुम्ही सरकारांत अर्ज कां नाही करीत ?"

"अं ! " एखाद्या निस्तब्ध, निर्जीव गुहेंतून नाद यावा त्याप्रमाणे त्यांचा उद्‌गार ऐकूं आला. थोडा वेळ पुन्हा ते शांत राहिले. आणि मग विषादमय आत्मव्यंजक स्वरांत म्हणाले, " इतकं आयुष्य गेलं. म्हातारवय झालं, घाटावर गोवऱ्या गेल्या. सत्यस्वरूपाचा इतका अभ्यास केला······पण माया याहूनहि मोठी आहे. आज पुस्तकांकरितांच जीव अडकून पडला. कुत्र्यासारखा गाडीमागून गेलों, आणि निराशेनं मनांतल्या मनांत रडत घरीं परत आलों."

हे शब्द व ते बोलत असतांनाची भाऊजींचीं मूर्ति, आज, काल वराच लोटूनहि जशीच्यातशी माझ्या डोळ्यांसमोर आहे. भाऊजींना कोणतं दुःख असेल, याविषयीं माझ्या मनानं केलेली अटकळ आणि त्यांच्या दुःखाचं त्यानीं बोलून दाखविलेलें कारण, या दोन गोष्टींविषयी आजहि मी विचार करतों. नुसता विचारहि मनांत आला की, मला गंमत वाटते ती या कारणानं की, माणसांमाणसांच्या वृत्ति किती भिन्न ! भाऊजी दुःखी असतील ही मी कल्पना केली, त्यांच्या लिलावाला गेलेल्या पुस्तकांवरून भाऊजींच्या मुखांतून आत्मनिर्भर्त्सना बाहेर पडली, यालाहि कारण तीं पुस्तकंच. कारण तींच. विचारांचं आरंभस्थान तेंच. पण मी कुणीकडें गेलों होतों ! ते कुणीकडे गेले होते !

भाऊजी गरीब आहेत, भिकारी आहेत, दरिद्री आहेत. त्यांच्या घरीं पैसा दिसायचा पण तो योगक्षेम चालविण्यापुरताच. तोहि मिळाला नसता. पण त्यांच्या लाजेची चाड सरस्वतीला होती, त्यांना ओळखणारांना होती, म्हणून चुलीला अक्षता वाहण्याची पाळी त्यांच्यावर यायची नाही. पण अशा या जीवनांत चैन कुठली ! व्यसन कुठलं ! मनरंजन कशाचं ! तरीहि या रखरखींत जीवनांत कांही पाणथळी होत्या. दोनच. घानाच्या

लाह्या, आणि घरचीं मुलं. भाऊजी आनंदांत असले की, लाह्याची थाली त्यांच्यासमोर ठेवून द्यावी. असे मिटक्या मारीत खातील की, जणूं पुरणपोळी व वडचांचं जेवण. तसंच मुलं भोवतीं खेळत असलीं, भाऊजींना त्यांनी घेरून घेतलं, भाऊजींच्या म्हातारपणाला त्यांनी "बनजलं" की झालं, संपलं. मुलींनी घर डोक्यावर घ्यावं, धिंगाणा घालावा. भाऊजीवर राज्य आणावं, खूब वेळ पदवावं, ते थकले व त्यांनीं तसं म्हटलं की "रडी रडी" म्हणून चिडवावं.

आरडाओरड चाललेली असली की, मुलांना रागवायला घरांतलीं माणसं येतात. भाऊजींना मुलांशीं खेळतांना बघतात "कां बापा!" म्हणतात, व आल्या-पावलींच परतून जातात, अशा वेळीं भाऊजींना खेळांतून काढून न्यायला समर्थ असलेली व्यक्ति म्हणजे त्यांची सहधर्मचारिणी. "लहानपण आलंय तुम्हांला. हुदडाल, खेळाल आणि रात्रीं पाय दुखले म्हणजे मला जागवाल," हा मंत्र एकदा म्हटला, मुलांना पळवून लावलं की, मग म्हातारी ओशाळल्या वृत्तीनं भाऊजीं-समोर निघून जाते आणि नंतर भाऊजी आपल्या बायको-कडे ज्या नजरेनं पाहतात, तींत अमृत भरलेलं असतं.

भाऊजींची यावेळची मूर्ति! इतकं सौंदर्य मला आजवर कुठंच आढळून आलं नाही.

मी वर म्हटलं भाऊजींना कोणतेंच व्यसन नाही. चुकलं माझं. त्यांना विडीतंबाखूचं, पानसुपारीचं नाही, पण ज्ञानाचं आहे. त्यांची ज्ञानलालसा उत्तुंग हिमाल-याहून उंच आणि अनंत आकाशापेक्षाहि विशाल आहे. ज्योतिष, गणित, वैद्यक, धर्म, वेद, समाजशास्त्र आणि तत्संबंधी शास्त्रें त्यांनीं आत्मगत केलीं आहेत. आणि आजहि, शरीर थकलेलें असतांना त्यांची बुद्धि इतकी चौकस आहे की, अभ्यासांच्या विषयावर नवीन ग्रंथ आढळला की तो मिळवून, वाचून, मनन करून त्यावर विवेचना लिहून आपल्याजवळ ठेविल्याशिवाय भाऊजींना विसावा नाही, समाधान नाही. अशाच वेळीं अधीरता, विमनस्कता, लालसा प्रकट होते. इतर वेळीं आकाशाची अविचल शांति.

त्याचप्रमाणे त्यांच्या सुखदुःखांचें दर्शन घडविणारी दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचीं पुस्तकं.

भाऊजी गाडीमागोमाग गेले आणि निराश अंतःकरणाने परत आले ही घटना कुणाला उपमर्दकारक वाटली तर वाटो, पण भाऊजींच्या निकटवर्ती परि-वाराला मात्र ती एक करुण घटना वाटते.

लक्ष्मीची भाऊजींवर कितपत कृपा आहे याविषयी आधीच मी सांगितलं आहे. अशाहि परिस्थितींत त्यांनी अत्यंत मोलवान ग्रंथसंग्रह जमविला. एकेक ग्रंथाच्या मागं अव्हेरिलेली भूक, काळजाचं पाणी, जळलेलं रक्त आहे. निष्कांचनाची ज्ञानसेवा म्हणजे एक दिव्य. ज्ञानाची तळमळ ग्रंथांनी शमन व्हायची. ग्रंथांना मोल जास्त. आईनस्टाईनच्या सिद्धांतांवर मी एक अठरा पानाचं पुस्तकं पाहिलं. गंमत म्हणून किंमत विचारली. "वीस रुपये". ऐकतांच तोंडाचा चंबू केला. असल्या पुस्तकांचा भाऊजींना हव्यास. जिवाचा आटापिटा करून त्यांनी हाहि हव्यास पूर्ण करून घेतला. फ्रेंच, जर्मन, इंग्रजी भाषांतील ग्रंथांचा संग्रह केला. हा संग्रह गाडींतून लिलावाला निघाला होता. दुसरा मनुष्य जीव टाकायचा. पण भाऊजी म्हणत होते, "कुत्र्या-सारखा गाडीमागून गेलों. उभ्या हयातीनंतरहि उपाधी सुटल्या नाहीत."

भाऊजींचा आपल्याच मनाशीं चाललेला हा संघर्ष अत्यंत मनोवेधक आहे. वासनालिप्त अचिरंतन मन आणि निर्विकार, अविनाशी आत्मा या दोघांचा संग्राम भाऊजींच्या अंतःकरणांत नेहमीं चाललेला असतो. रोजच्या आयुष्यांत लहानलहानशा प्रसंगांमध्ये तें युद्ध बघणं मनाला भारी उद्बोधक वाटतं. बुद्ध भगवान् आणि मार यांच्यामधील स्पर्धा जितकी चित्तवेधक तितकीच भाऊजींच्या अंतःकरणांतीलही.

भाऊजी वैद्यक चांगलं जाणतात. त्यांच्या बारा-क्षार पद्धतीनं अनेकांना गुण आला आहे. इतर डॉक्ट-रांनी असाध्य म्हणून टाकून दिलेले रुग्णाईत भाऊजींनी आपल्या हाताशीं धरले, त्यांना रोगमुक्त केलं, नव-जीवन दिलं. भाऊजींच्या हाताचा गुण ज्यांना कळला त्यांना प्रत्यय आला, त्यांतील कांही तरुण मुलं त्यांच्या भोंवती गोळा झालीं व वैद्यकाचा अभ्यास भाऊजींच्या डोळ्याखाली करूं लागलीं. एक दिवस भाऊजी आपला वर्ग घेत होते. जवळच नातवंडं खेळत होतीं. एक लहान

मूल गांठीचं पदक खातखात वर्गांत आलं. इतर मुलांनी त्याला पदक मागितलं. त्यानं देण्याचं नाकारलं. नंतर भाऊजींनी मागितलं. आजोबांना त्यानं सपशेल धुडकावून लावलं. भाऊजींची मुद्रा एकाएकीं विचारमग्न झाली. भोवतालच्या मुलांना ते विसरले, आणि आपल्याशींच म्हणाले, " खरोखर, माणसांना इतरांनाहि सुखी करावंसं वाटत नाही. काय झालं असतं ? मला पदक दिलं असतं तर ! दुसऱ्याच्या सुखानं आपण सुखी होणं नाही जमत मुलांना." नंतर थोडा वेळ ते स्वब्ध राहिले. मग एक हुंकार दिला, म्हणाले, "आम्हां मोठमोठ्या माणसांना हें कळत नाही, मग तीं तर मुलंच." नंतर भाऊजींच्या मुखावरील विषाद निवळूं लागला, आणि थोड्या वेळानें प्रसन्न ज्ञानप्रभा मुखावर झळकूं लागली.

भाऊजींनी खूप अभ्यास करून, आपलं ज्ञान व्यवहाराच्या कसोटीवर पारखून कांही जीवनसिद्धांत बसविले आहेत, आणि या सिद्धांताला बाध आणणारं कांहीहि आढळून आलं की, आपलं प्रामाणिक मत सांगायला ते मागंपुढं पहात नाहीत. ज्योतिष गणित न जुळेनासं झालं की आकाशस्थ ग्रहांच्या स्थितीचं जितकं भावशून्य निदान करील तितकीच भावशून्य वृत्ति भाऊजींची असते. एखादा रोगी त्यांच्याकडे गेला तर त्याला ते सरळ म्हणतील, " मी औषध देतों. पण तुला असं असं रहावं लागेल. असं राहणं तुला अशक्य असेल तर रोग असाध्य." एका सद्गृहस्थाला मी त्यांच्याकडे दाखवायला नेलं. भाऊजींनी त्याला तपासलं, रोग पाहिला, सांगितला, म्हणाले, " डॉक्टर नाही. आयुर्वेद नाही, कांही एक वरं करूं शकत नाही, डॉक्टर इंजेक्शन देईल, रोग तात्पुरता दबून राहील, आयुर्वेद तर अपरीणतच, बाराक्षार मात्र धन्वंतरी आहे." कांही दिवसांनी मी भाऊजींना कळविलं, "तो गृहस्थ आयुर्वेदिक उपाय करून बघतो आहे." भाऊजी उद्‌गारले, " करो बापडा, पण तो जगायचा नाही. रोग दावल्यानं शरीरांतून निघतो काय ? शरीर रोगाहून कणखर केलें पाहिजे. तुमचा डॉक्टरहि करत नाही, नी आयुर्वेदहि करत नाही. जाणार तो."

" भाऊजी, तुमचं बाराक्षारांचं पुस्तक म्हणजे आम्हांला प्रत्यक्ष वेद आहे." एक शिष्य म्हणाला.

भाऊजी काय म्हणतील याविषयी त्याची काय अपेक्षा होती कुणाला ठाऊक ! पण भाऊजी एकदम उसळले. " वेद ! माझं पुस्तक वेद ! वेद म्हणजे काय तुम्ही ज्ञानाची परिपूर्णता मानतां ? वेदांत कितीतरी भाग अनर्थकारक, अपरिपक्व आहेत. माझ्या पुस्तकांत जर हे दोष उरले तर किती तरी जीवांचं अकल्याण होईल. मी माझा ग्रंथ माझ्या वैद्यकाच्या ज्ञानाची संपूर्ण सांगता झाल्यावरच लिहिला आहे. वेद थोर आहेत, पण परिपूर्ण नाही. माझं पुस्तक सामान्य आहे. पण परिपूर्ण आहे." वेदांविषयी भाऊजींना आदर आहे. भारताच्या अनेक अनामिक ज्ञानवंतांचं प्रतिभाप्रेरितांचं तें कार्य आहे. हें ते अनेकदां बोलून दाखवितात. भारतीय तत्वज्ञानाला वेदाचा आधार असल्यामुळे भारतीय तत्वज्ञान जीवनाधार आहे, हे उद्‌गार नेहमी ऐकवितात. परंतु त्यामुळे वेदांतील दोषांकडे दुर्लक्ष करतील असं मात्र नाही. वृथा अभिमान धरून एखाद्याने वेदांची कड घेतली की, भाऊजींनी त्याची राखरांगोळी केलीच.

भारतीय तत्त्वज्ञानाचा परिपाक, साकार स्वरूपांत कुठं आढळेल कां म्हणून जर कोणी म्हटलं तर मी भाऊजींकडे बोट दाखवीन. भारतीय तत्त्वज्ञानांत जीवनाधार मानला गेलेला त्याग, निष्काम कर्मवृत्ति, निवृत्तीमधून प्रवृत्तिपर तत्त्वज्ञान निर्माण करण्याची रीति, मनन, चिंतन, संकलन, लेखन यांच्याकरिता स्वीकारलेली अभ्यासु वृत्ति, संपत्तीविषयी तुच्छता, या सगळ्यांमुळे भाऊजी पौराणिक इतिहासांतील ऋषि वाटतात. त्यांना धन विद्या, बल आत्मबल, दान विद्येचं, अनास्था प्रतिग्रहणाविषयी, तुच्छता स्वतःच्या मनाशीं प्रतारणा करणारांविषयी, आदर वेद, पूर्वाचार्य, वृद्धि व तपस्व्यांविषयीं, आस्था ज्ञानाविषयी, आणि प्रेम शिष्याविषयी.

कित्येकदा मनांत असा विचार येतो की पुराणांत अश्वत्थामा हनुमानादि आत्मे चिरंजीव मानले गेले आहेत. अशाच एखाद्या चिरंजीवी तपस्वी आत्म्यानें भाऊजींच्या रूपाने देहधारणा तर केली नसेल ना !

अनुक्रमणिका

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

काळु घराण्यांतील कागदपत्रें

शंकर गोविंद चट्टे

पत्र नं. ८

श्रीराम

विनंती उपरी. आपले पत्र सरकारचे नावे देवळा-वऱ्होन आले ते भानुवासरी सायंकाळी पोहचून अक्षरशा समजले. भागानगरचे वर्तमान आपण लिहिले तसेच इकडेही विघातोमुखी आब आहे. बापुसाहेब प्रारब्ध-वान. सर्व मसलती घरास आल्या. सर्वाचि वडीलपण इकडेस आले. फिरंगियाचे आपण लिहिले तैसेच वर्तमान. सांडणीस्वार दोन येजमानसाहेबापासून आले यानीही सांगितले. दुसरें नानेदचे ठाने हस्तगत जाल्याचे वर्तमान ऐकताच मोठा संतोश मानीला. पेटनी पोशाख शुतरस्वारास दिल्हा आणि भाऊसाहे-बास मोठे कृपेनें पत्र हस्ताक्षर स्वसदस्तुर अकरावळी की सा महिने मेहनत तुम्ही केली त्याचे सार्थक जाले की आजचे प्रसंगी फौज मोकळी जाली. तो निघून गेला त्याची चिंता नाही. स्यानभ्रष्ट जाला. कोठेही तुडवन मारु. प्रसंग नाजूक आहे. अंग्रेजासी मोगलासी विघाड जाला. मसलतीचा प्रसंग आहे. तुम्ही या प्रसंगी आम्हा-जवळ असावे. च्यार पतके समागमे घेऊन वाटेने संभाळून आम्हाजवळ येऊन पोहचावे. व्यंकटराव भगवंत येथे इदईक येतील म्हणजे भाऊसाहेब कूच करतील. फौजा तो आपल्या गंगातिरास नांनडथ (?) मैदानात आल्या. इकडोन सेलूचे मार्गे पलाही जवळ आहे परंतु याहाची मर्जी वासमावऱ्होन जावे. मर्जी खुदपसंत तो आहेच. वाकडे पडल.

वासिमास एका दो रोजा येजेमान सहित येऊन रा॥ रावजी प्रतिपदेस दारव्ह्यास गेले. शेष्टी सप्तमीस कारंज्यास जातील. डोनगावचा ऐवज वासिमास देवळा-वर आपण जो पाठविला त्याची याद आली तेव्हा रावजी होते त्यांनी यादीप्रमाणे जमाखर्च केला. तो ऐवज भाऊसाहेबाकडेस देवविला. आणखीहि ऐवज देवळावर आला असला सत्वर कळावे. आपलें पत्र वरचेवर येत जावे. येयून कालही रवानगी आपणा-कडेस केली आहे. सखाराम विठ्ठल दोनेकसे स्वार से दोनसे पैदल कलवुरीचे मुक्कामास आले आहेत. आणि येथील फौज उंबरखेड परगन्यात पोट भरावयास गेली आहे. प्रसंग गर्दीचा आपपर ओळख कोठेच राहिली नाही. ऐसे प्रसंगांत उंबरखेडचे ठाने घेयास जातात. चार दिवस टाळण्याचा प्रसंग आहे. आज पत्र आले होते. सलह लिहिली आहे. तेहि शाहणेच आहेत. कळल तैसे करतील. दारव्हे तालुका आंधळकराकडोन निघाला. जप्ती दारव्ह्यास आली. कळावे बहुत काय लिहिणे हे विनंती. येजमानांनी आपले पत्र अक्षरशा वाचिले. उत्तरास अवकाश न उरला. हेच उत्तर जाणोन सविस्तर पाठवावे हे विनंती.

पत्र नं. ९ नकल

सेवेसी मेहरबान दोस्तान अबदुलला सरदेशमुख प्रगणे खेडले सलाहुल अज सा॥ सेख मिखन खाविंदार सलाम. आमी येथील खैरसम जाणोन तुम्ही आपली खैरियत हमेशा लिहून शाहमानी करीत जाणे. दिगर मजकूर अैसियात तुम्हाकडील काही वर्तमान कळले नाही. तरकूल लेहून पाठविणे. इकडील वर्तमान तर साहेब मेहरबान गोपाळराव भाऊ आजंठीयाचे घाट चढून आले आहेत. याचे तैनाती सोळा पलटणे तैनात

अनुक्रमणिका

आली. आहेत. पहावे पुढे कोणीकडून जातील, हे समजत नाही. परंतु ज्या मार्गें जातील वीस वीस कोस वस्ती राहत नाही हें वर्तमान तुम्हास माहितच आहे. त्याजवरून आपले सावधगिरी हुशार असावे. खलक बयेमान आहे. आजंठियासी कंपूची तनख्वा दो लाकाची जाली आहे. येथील एका दो रोजानी फडच्या जाल्यास कूचही होईल. मालुम होये होशाने. खत किताबतीने याद करीत जाणे. ज्यादा काय लिहिणे. अमडापुरास बच्याजी अन्नास खत लिहिले ते पोहचून दरजोब पाठवणे हे किताबत.

पैवस्ती छ १९ माहे जमादिलावल सन १२१३

पत्र नं. १०　　　　श्रीराम

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामाजीपंत स्वामी गोसावी यासी सेवक भवानी काळोजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल छ. २ जमादिलावल जाणोन स्वकीय लेखन करीत जाणे. यानंतर तुमचे पत्र कारंजियाचे रवानगी बरोबर छ. ९ रविलाखरीचे आले तें पोहचून वर्तमान सविस्तर कळले. याजपूर्वी तुमचें पत्र रा. आपाजी गोपाळ याचे जासुदाबरोबर आले होते त्याचे उत्तरहि जे लिहिणें ते लिहून जासुद मजकुराबरोबर तुम्हाकडेस विदा केले आहे. पोहचले असेल. सांप्रतचें पत्री तुमचे लिहिण्यांत की गाजीखानाचे पुत्राचा उपद्रव इकडेस अतिशय. गावचे सं(रक्षण) तर पायदळाने होऊ शकते परंतु सिवाराचे संरक्षण विना राऊत घडत नाही. या अर्थी पनास राऊत रा. आपाजी गोपाळ याजपासून तैनात आणिलेत परंतु त्याज पनास टके रोज खर्चास द्यावे लागते. याची जागाहि लागेल. घेयास ठिकाण आहे म्हणोन लिहिले ते विस्तारे समजले. ऐसीयासी पनास टके रोज तेव्हा पंधरासे टके दरमाह बसला. यास घेयास ठिकाण आहे म्हणोन मोहगम लिहिले. खोलून लिहिले नाही की अमका ऐवज यास आहे. कदाचित ठिकाण तुम्ही आपाजीपंत म्हणत असाल तर त्यांचा भरवसा किमपि ठेवू नये. (पु)र्जा म्हटला तर हजारापासून पांच हजार परियेंत देतील. मागे पुढे पाहणार नाहीत. परंतु त्याजपैकी येक पैसाहि मिळणे दुरापास्त. याचे अनुभव आम्हास नाहीत ऐसे. नाही अद्यापवर त्याचे पुर्जे येथे आहेत. देण्याची वासना नामस्मरण नाही. तेव्हा त्याचे बोलण्याचे शाश्वत एकंदर मोजायाचे नाही. डोनगावांत जागा करुन घेऊ म्हणता तर तुम्ही जे पयेदल सिवंदी ठेविली आहे त्याची ज्यायेदाद होणें दुरापास्त. तत्रापि हे करून घेतलीच पाहिजे. वरते हा स्वाराचा खर्च कैसा साधेल. साधणार नाही. दुसरे हारवला तर महिन्या दो महिन्यांत सरतो असे नाही. गर्दीस आता आरंभ आहे तेव्हा ऐसी सिवंदी तुम्ही कोठवर ठेवाल व वोहदहर (?) व्हाल. त्यास हे गोष्ठ काही ठीक नाही. से पन्नास माणुस गावचे संरक्षणास असावे. जेंगलचा पसारा. ज्याचे त्यानी तारतम्य वरचेवर पाहत जावे. ढोरेगुरेहि वहूत दूर जाऊ न द्यावीत. तरते बुडते पाहून तशा सारखी वर्तणुक करीत असावी. रावताचे खटल्यांत कांही पडू नये. व आपाजीपंताचा विश्वास किमपि मानु नये. जर करिता हे रकम गावावर न पडतां व आपाजीपंतासीही समंध न राहता परस्परे सोयेसाये होत असली आणि राऊत तैनातीस राहत असले तर इतके खटल्यांत न पडणें. बहुधा आपाजी गोपाळ यास त्याचे परपत्याचीच आज्ञा. तेव्हा पारपत्य तर जमावे. जेव्हा होईल तेव्हा घडणार तैसे घडल. परंतु प्रस्तुत त्यांच्या स्वाऱ्या सिकाऱ्या इकडील बंद करतील. जैसे घडल तैसे वर्तमान वरचेवर लिहित जाणें. *तुम्हास सर्व मरातव समजत आहे. तेव्हा विस्तारे काय लिहावे. समये उचित आहे. विशेष काय लिहिणे. आपला हित जेथे उगवल तेथे उगवून घेणे हे विनंती. चिरंजीव नारायेणपंतास आसीरवाद. उपरी कागजपत्र तर तयार जालाच असल. घेऊन याल हा आसीरवाद.

सेवेसी बापूजी मोरेश्वर सा० नमस्कार विनंती उपरी. आपण सा० त्रिंबकपंत बरोबर पत्र पाठविले, त्या पत्री मजकूर रा० राधोपंत अमीन याचे अमर्यादेचा लिहिला होता. त्याजकरून श्रीमंत आबासाहेबाचे पत्र रा. काळोपंतास पाठविले आहे ते त्याजकडेस लखोटा करून पाटवून द्यावे आणि उत्तर पत्राचे आनवून इकडेस पाटवून द्यावे लोभ किजे हे विनंती.

पैवस्ती छ २१ माहे जमादिलावल सन १२१३

* येथून मजकूर भवानी काळोच्या हस्ताक्षरांत आहे.

पत्र नं ११ स·········

राजश्री माधोराव स्वामीचे सेवेसी सेवक नारायेण ···सदासीव सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ ६ रोज रविवार जाणोन स्वकुशल लिहिणे. विशेष सेखमुराद व कमाल महमद बरोबर पत्रोत्तर पाठविले. वर्तमान कळले. लष्करचा कूच दसऱ्याचे दिवसी आहे. देऊळगावास जातात. तेव्हा मार्ग इकडूनच पडल. किंवा काय. जर याच मार्गे आल·········त खरा······सी······राजश्री·········राऊत विनंती ······स्थित. वरचेवर लि······येथोल मनुश नसला तर तुम्ही मुजरद मानुश समागमे बातनी सत्वर लिहून पाठवावी. येथून दारव्ह्यास मनुश गेला होता.‍ याज समागमे तुम्हास पत्र आले ते पाठविले आहे. खासा स्वारी या मार्गे आल्यास तुम्ही येथवर समागमे याचे येथुन ऐवज तुम्हाकडेस केला. चाळीस जवानांनी घेऊन पाठविला. त्याचे देण्याचा बलवा झाला आहे. त्यास तुम्ही चिठी चपाटी न करावी. ये······नाही······ हे विनंती.

पत्र नं १३ श्रीराम

पै॥ छ २२ माहे जमादिलाखर सन १२१३

राजश्रीपंत दादा स्वामीचे सेवेसी मुदगल बापूजी कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. आपले पत्र काल मंदवासरी सायंकाळीं पोहचले. सविस्तर वर्तमान कळले. कारंजियासी डोनगावचा ऐवज व जिनस व कापड आज उशकाली रवाना केले. याजबराबर आपलें पत्राची रवानगी केली. काल भाऊसाहेबाचे पत्र हस्ताक्षर पातुरचे मुक्कामचे आले. शरीर प्रकृति नीट नाही. ज्वर येत होता म्हणोन सरकार आज्ञा झाली. कांही कारखानाही सरकारी समागमे आहे. मान्याचे रस्त्याने नागपुरास स्वार होऊन गेले. नागपूरचीहि रवानगी आज केली. गुलाबसिंग भवानी पांढरे यांनी जे ग्रहस्तपण डोनगावावर केले ते वडिलास विस्तारे लिहिले. शिखानष्टाचे वर्तमान आपण जे लिहिले ते तेथे मनुश मात्रास दखल फिरंग्यापेक्षा याचाच बहुत आहे (शरीराक) डोन श्रमी. देडा मधुरा जाला म्हणतात. हे कैसे आहे ते मनास आणून पहावे. काही सुजलाहे म्हणतात. मोठें फौजेचे वर्तमान. प्रस्तुत नक्षा बिगडलाच आहे. होळकर बोलाविले आहे. अथवा अलिबहादर पुन्हा सावर खाऊन लढाई होईल. प्रस्तुत तो फिरंगीयांनी पुढे कदम ठेविला. मागे मुलुक राहिला. त्यास वाली परमेश्वर. इच्छा श्रीजीची. आज बोरीवरोन फौज पुढे पातुरचे जाण्याकरिता येणार. व्यंकटराव भगवंत नानदेहून जाताना लाखेवरोन गेले. लाख लुटिली. गाव जाळिला. तिमा रावजीचे कुटुंब मुले माणसे तेथे होती. त्यांनी ग्रहस्त मल्हारपंत भेटीस पाठविला आहे. काही मागत असतील. लाखेची पत्रें आली आहेत. मातुश्री गोपिकाबाईचे अपत्याजमुळे लिहिले आहे. आज तेथे मुक्कामास आल्यास रा॰ आनंदराव तात्याजी सर्वासी भेटी होतील. रा॰ काळोपंत आबाही लष्करातच आहेत. त्याहासी बोलावे. हजार पाचसे पावेतो कारकून सुटत असल्या आपले हातीं घ्यावा. ऐवज कबूल करावा. रातोरात पत्र आपले यावे. आपण पत्र येताच आपणाजवळ येऊन पोहचतो. गाव तो लुटिला. वाड्यांत बायका लेकरे आबरू. वाड्यात घसू लागलें तेव्हा आवाज करणें प्राप्त जाले. कारकून पुढे जाऊ देण्याचा नाही. सोडविला पाहिजे. हजार पाचसे जाल्यास ऐवजास चिंता नाही. येथूनच देऊ परंतु हे कार्य अगत्यच करावयाचे आहे. विशेष तो बोलतच असतील. परंतु बिसाद काही विशेष नाही. आपण झोंब घालून घ्यावे अथवा बोलण्याचा घाट ध्यानास आणून रवानगी करावी. पत्राबराबर येत असू. बहुत काय लिहिणे ही विनंती.

पत्र नं. १४ श्री

पैवस्ती छ २१ माहे रजब सन १२१३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामाजीपंत स्वामी गोसावी यासी. सेवक पांडुरंग गणेश नमस्कार विनंती उपरी. येथील ता। छ २० माहे रजब मु॥ उबर प्रा। बाळापूर चलकूच जाणून स्वकीये लेखन करणे. विशेष तुम्ही जासुदाबरोबर पत्र पाठविले. पोहचून मजकूर समजला. सिखानष्टाचा चिरंजीव पाचशा लोकानसी दौलतखान याजकडे आला व भगवाना नाईक यांनी नकारग्रामचे ठाणे घेतले ऐसी

अनुक्रमणिका

वार्ता. याचे बातमीकरिता वासिमासी पाठविले आहे व सिखानष्टाचे संधानही लाविले आहे. जौब आलियासी लिहिला जाईल. लाला सिताबरायें याजला सरकारातच बोलाविलें आहे. तेव्हा ते तेथें आलियासी हिवर वगैरे गुरमानसे. बहुधा तर लाला मजकूर येणार नाही. कारण त्याजला जळचराचा आश्रा परिछिन्न आहे. रा० बापु भगवंत सरदेशमुख लालाचे भेटीस गेले. भेट होताच लालानी कैद केले. मनस्वी वर्तनुक करीत आहे. त्यास याचा बंदोबस्तही सरकारातून जालाच आहे. तेव्हा पारपत्य घडल. त्यास हिवर येथील गुर व डोनगावचे सात बैल गेले आहेत. ते सुटावे व चिचाळ्याचा बंदोबस्त बोलण्यांत येऊन घडावा. जलचर आदिकरून बातनी वरचेवर कळत असावी ऐसे तपसिलें लिहिले ते समजले. त्यास लाला सिताबराये तो विसीलीचे गढीत कोंडीला आहे. तोफा शुरू आहे. परिछिन्न तुमचा जासुद मार्गानी येता पाहून आला. येक दो दिवसांत हस्तगत होईल. नंतर तुम्ही लिहिले ते जोबसाल ध्यानास आनून हिवर येथील गुरु वगैरे व डोनगावचे सात बैल व बापुपाड्या कणोलीकर याची लेकरबाळे लालानी कैद केली. हा जोबसाल येकून हस्तगत जालियासी सर्व गोष्ट घडल. विठोजी आटोळ्याचा मुकाम हिवरी यावर जाला. याजविशई आटोळे मजकूर यासी पत्र याजपूर्वीच लिहिनीयांत आले आहेत. वरकड वर्तमान फिरंगी याची बातनी मलकांपुरा पलीकडे घोडसगाव तेथे बऱ्हाणपुराहून फिरंगी आलें. सिंदे जळगावावर आहेत. आम्ही आज वाडेगावावर गेलो. तेथून जैसा फौजेचा सुमार घडल तैसे तुम्हास लिहिण्यांत येईल. चिचाळ्याचा मजकूर लिहिला. त्यास त्याचेही मागाहून लिहू. नालमेख पाठवितो म्हणून लिहिले त्यास विदा केली असल. वरकड वर्तमान श्रीमंत येजमान राक्षस भुववाकडे आहेत म्हणून बातनी आली. तुम्ही सिखानष्टांकडे सूत्र लाविले त्यास याचे उत्तर आनवून सत्य लिहावे. नाल व पट्या पाठविणे हे विनंती

पत्र नं. १५

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री मुदगलपंत दादा स्वामीचे सेवेसी पो॰. रामाजी शामराज सा. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे. विशेष ऐसियात आपणांकडून कृपापत्र येऊन परामर्श होत नाही. अपूर्व असे. आमचे इकडील वर्तमान आपले कृपेने यथास्थित असे. चिरंजीव राजश्री रावोबादादा इकडील वर्तमान लिहिले आहे त्याजवरून समजल. आम्हाविशी चिंता तिळतुल्य न करावी. श्रीहरी रायाचे व यजमानप्रतापे गोष्ट बाणीचीच राहिली. सर्वास कारण की आनंदरूप खेडल्यास आलो. आठ रोजात भेटही होईल. तुमच्या पासोड्या करविल्यात. येताना समागमे घेऊन येऊ. पुण्याकडील होळकराची सदासिवराव विठलकडील लढाई जालीयावर सिधांत वर्तमान आले नाही. फकीरजी गाढवे यास नगरकरानी दगा केला. दहा पन्नास माणूस मारले गेले. गाढवे येकला निघून आपले से दोनशेनिसी बऱ्हाणपुराकडेस गेला तरी मजविसी चिंता न करावी. आपली भेट लवकर होईल. बहुत काय लिहिणे लोभ किजे हे विनंती.

पत्र नं. १६ श्रीराम

विनंती उपरी सोमवारी जवळ्याचा मुकाम जाला. ताफा लयेंने नानदचे नाल्यावर गेले आहेत. सरकार अशा चाकरीस यावे. हे अनकूल न पडल्यास पारपत्य करावे. खासा स्वारी डेरे दाखल चैत्र वद्ये दसमीस जाली. सत्वरच वासीम प्रांतास येणार ऐसी पत्रे आलीत. आपण काल नानदेस गेलो होतो. मंगरूळ परगन्याची गुरे व माणसे व पुरुषोत्तमपंत ऐसे घेऊन आलो. चाकरी पाचासा लोकानसी करावी हेहि कबूल केले. सरकारचे मुलकास उपद्रव न द्यावा ऐसे ठहरले परंतु भगवद इच्छा कैसी आहे कळत नाही. आम्ही नानदेहून तिसरा प्रहरा आलो तो फौज कूच होऊन जवळ्यावर आली. आज नानदेहून पत्रे आले आहे. उदईक कारकूनही येईल, ऐसे दिसते. गोळाही इकडोन शुरू होईल. आता उपाय रचली आहे. ईश्वर इच्छा तैसे घडल. हे वर्तमान सविस्तर रा० आंबा व रा० दाजी व आन्यास सांगावे. पत्रच दाखवावे. आबदागिरीस झ्यालर भगवी लावून पोहचेसी पाठवावी. मानूस आबदागिऱ्याही पाठवावा. धामनीकर भाटाबराबर सविस्तर लिहिलें आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

कविता

मुकें निळेपण—

मूक नभाला म्हणतो सागर,
"सतत प्राशतो तुझें निळेंपण
तुझ्या पोटिच्या अंधाराचा
टिपून घेतो हळूच कणकण

घेत निशेचा मादक, शीतल
गंध ओलसर नकळत हुंगुन
तुझ्या भाळिच्या उडू रत्नांना
जलपटलांवर घेतो रेखुन

स्कंधांवर क्षितिजाच्या रेलुन
उभा माझिया निकट सदा तूं
रूप गोजिरें तुझें उमटतें
रूपांत माझ्या, मूक परी तूं

मानव म्हणतो, "प्रशांत सागर
विशाल-हृदयीं, शांती-आगर ?"
कुठे परी तव मूक शांतता ?
नांदे चंचलता लाटांवर

जाणवते मज तव गंभिरता
गूढ शांतता, मुकें निळेपण
युगायुगाचें साकळलेलें
सांग व्यथेचें हळवें स्पंदन

रुपांत माझ्या तुझी वसूं दे
गंभिरता अन् मुकें निळेपण
हवी मला तव गूढ शांतता,
हवें व्यथेचें हळवें स्पंदन",

सागर पुशितो मूक नभाला
तुषार-लाटा निज उंचावुन
मुकेंपणांतच नभ गहिवरतें
अबोध अजुनी मुकें निळेंपण

—यशवंत पारखी

डंख !—

शेवंतीच्या फुलावर
दरवळे उष्ण [illegible] !
झरोक्यांतुन हिरव्या
चैत्रपालवीची आस !

तुझ्या डोळ्याच्या वलयीं
विसावते चंद्रकळा
चार दिवसांत कसा—
मला लाविलास लळा

उमजल्या जास्वंदीचा
वाऱ्यावरती सुगंध
पळसाचा वेल डुले—
कशा मैना झाल्या धुंद !

जास्वंदीच्या वाटेवर
खूण दिसे अधराची
फांदीवरती हिरव्या
कुजबुज साळुंकीची !

पाखरांच्या पावलाशीं
रोमांचित येते सांज
केशरी चावण्यांतील—
कसें विसरावें गूज !

लोचनांत खिळलेले
घोटाळती दोन क्षण
ओढ्याकाठीं वाटेवर
आठवती हिरवळ !

जुळवी स्वैर बटांना
रेखतो श्यामल तीळ
कुस्करला तुझा गाल
विसरावा हाच खेळ !

केळीवरच्या दवांत
अधराचे ओले पंख
अभिलाषेचा घुमतो
श्वासासह मनीं डंख !

—कृष्णचंद्र भोइटे

जंव विणेच्या तारा तुटल्या—

जंव विणेच्या तारा तुटल्या
मानसीं जीवन कंप पावलें
सळसळले अन् खळखळलें
त्यांतुन मग जे स्वर घुमले
शब्दरूपें ते प्रकट जाहले
'कां ?' या शब्दें कारण पुशिलें,
एकच शब्द किमयागार !
'कां ?'
एकच शब्द,
एकच हा उद्‌गार
छेदित मजला हा वारंवार !
केवळ शब्द
छे ! शर हा तीक्ष्ण
छेदुनि जाई आरपार
अन् करी नागवें जीवन अवघें
तदनंतर !
सामान्यांतून अद्‌भुत यावें
चूर्णांतुन अन् दुर्ग निघावा
म्हणून सारी घडपड घडपड !
काळा ठिक्कर दगड बावळा
तेजःपुंज हिरा बनावा
पंखहीना मज पंख फुटावें
अद्‌भुत जें जें तें तें व्हावें
त्यासाठिच सारी धडपड धडपड !
किती काळ ही अशी चालली
तरी घडेना अंत, पडेना अंतर
'शक्य' 'अशक्य' मल्ल दोन ते
झुंजझुंजती तदनंतर !
अन् 'अशक्य' जिंकी फड तो बाका !
तरीहि धडपड व्यर्थचि धडपड
कशास करिशी खुळ्या मानवा
तुझ्या भावना
तुझ्या कल्पना
भरडून काढी
दैवाचें हें जातें दगडी
फिरतें गरगर, करि रव घरघर
चुकुन निसटती पण कांही कण
म्हणती अन् मग 'कसें निसटलों ?'
हसून म्हणती 'आम्हा सारखी'
तुम्हा पारखी जी ती आशा
असूं द्या आशा असूं द्या असूं द्या
येईल यश तें येईल येईल
पुसतें मन मग
नाचून नाचून
आनंदून कि ओठंगून ?
थरथरणाऱ्या—
कंपित शब्दे "केव्हा ?"

—ऋतुराज

साज उलवला—

साज उसवला मावळतीचा
बरवळलेले सुकले भाव
काल पाहिली तुला तशी अन्
उमळून आला हिरवा घाव !

किती दिसांच्या फुटल्या वाटा
विटले विरले पाश रेशमी
तुहेलें नातें जिरवुन गेलें
मनोमनींच्या नवथर ऊर्मि !

काल पाहिली तशी तुला मीं
बारावरती टेकुनि माथें
दूर कुठे शून्यांत रेखलें
स्थिरावलें नजरेचें पातें

क्षणैक हललीं निळसर बुबुळें
ओठांवर अडखळलें हासू
आणिक मिटल्या पापणींतलें
साकळुनी थरथरले आसू

जडावुनी क्षण खिळलें पाऊल
मनांत सललें जुनेंच कांही
अता कशाला गत स्वप्नांच्या
पुसट छटांना नविन झिलई

—मधु वावगांवकर

अनुक्रमणिका

आनंद-गीत

गाणें गाऊं या
टाळी देऊं या
गातां गातां ब्रह्मानंदीं लीन होऊं या

निज दुःखाचें तें रडणें
जिणें नको तें लाजिरवाणें
आनंदाचें गाणें गाउनि दुःखें विसरूं या

आकाशींच्या अंतरांत
चंद्रसूर्य दीप ज्योत
स्वर्गीय त्या प्रकाशांत क्षणभर हिंडूं या

माझी भार्या, माझें घर
हृदयांतच दुःखाचें माहेर
नातीं गोतीं मर्त्य जिवाचीं सारीं तोडूं या

कधी सुखानें हुरळुनि जावें
कधि दुःखानीं व्याकुळ व्हावें
सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर झोके घेऊं या

टिचभर पोटाची ती भूक
शमवायातें मानस मूक
झगडुनि झालें अशक्त त्याला पुष्टी देऊं या

इवलाशा या संसारांत
कंपित व्हावी ना हृद्ज्योत ?
अंतरींचा ज्ञानदीप उजळूनी घेऊं या

आकाशांतील पाहूं गंगा
तारकांशीं घालूं पिंगा
क्षणभर अपुलें देहभान विसरुनि जाऊं या

कै. वसंतराव सदाशिवराव बल्लाळ

असाच उभा झेलतो—

असाच उभा झेलतों आहे
बाहू पर्ण-हीन पसरून
काळ्या, रेशमी आवर्णाला
येते फाडून धीट—
नजर निळ्या नभाची,
आता नाही क्षोभ, नाही बोच
तरी आहे झेलतों...
असाच उभा होतो झेलत
श्रावणाच्या सहस्र धारा
पर्णापर्णांवर-अंगांगांतून
लालबुंद चढवून कंगन
गेला चोर पावलीं
—काकणवाला तो ! राहिलों मीच...
आता मीच उभा—
झेलला...एकदाच...
लोळ रुद्राच्या नेत्रांतला
आगवारा प्यायलेला लोळत...
झिंगत... कलंडत...
आला असा – गेला तसा,
चाटून जिभेने-!
आता-कोळ (?) मी हा अपर
शांत निःशब्द उभा आहे
झेलत नजर धीट
निळ्या नभाची...

—जगन्नाथ टंकसाळी

दुःख

रेंगाळत जेव्हा केशरी उन्ह
सावळ्या उघड्या धरेवर,
अन् पाण्याची आर्त ओढ
जाणवतें अधिकच किनाऱ्याला,
ताऱ्यांना उमगतात जेव्हा
रजनीचें मिश्किल पाश,
तेव्हा माझ्या विकल हृदयांत,
कुठेतरि खुपतं जाणवतं
एक शब्दातीत दुःख !

—मनोहर वझे

कारीतलाई येथे उपलब्ध झालेला कलचुरी राजा पहिला युवराजदेव ह्याचा शिलालेख

श्री बालचंद्र जैन, एम्. ए., शास्त्री
केंद्रीय संग्रहालय, नागपूर

गेल्या वर्षी (१९५५) एप्रिल महिन्यांत मी जबलपूर जिल्ह्यांत दौऱ्यावर असतां मुरवाडा तहसिलीच्या कारीतलाई नामक गावीं मला हा शिलालेख उपलब्ध झाला. हा शिलालेख सुमारें तीन वर्षांपूर्वी त्या गावचे श्री. कन्छेदीलाल पटेलांना ते आपल्या शेताची नांगरट करीत असतां शेतांत आढळला. त्यांनी तो तेथून आपल्या घरीं आणला. आजहि तो त्यांच्याच घरीं आहे. तो नागपूरच्या संग्रहालयांत आणावयाचा प्रयत्न आम्ही करीत आहोंत.

हा शिलालेख २ फूट ६ इंच रुंद आणि १ फूट ५ इंच उंच आहे. ह्या लेखाच्या तेरा पंक्ति आहेत. रचना संस्कृत श्लोकबद्ध आणि लिपी १० व्या शतकांत प्रचलित असलेली देवनागरी आहे.

कलचुरि राजा मुग्धतुङ्गाचा मुलगा पहिला युवराजदेव ह्याच्या विजययात्रेचें स्पष्ट वर्णन यांत आहे. हा या शिलालेखाचा ऐतिहासिक विशेष आहे. ह्याच्या अगोदर सापडलेल्या कोणत्याहि शिलालेखांत ह्या राजाच्या विजयांचा इतका स्पष्ट उल्लेख नाही. शिलालेख खोदण्याचा प्रधान हेतु सोमेश्वर नांवाच्या मंत्र्याने खणलेल्या विहिरीची स्मृति चिरस्थायी करण्याचा होता. शिलालेखांत सोमस्वामिपुर नांवाच्या नगराचा उल्लेख आढळतो. वर्तमान कारीतलाईचें प्राचीन नांव सोमस्वामिपुर असावें असें ह्यावरून अनुमान होतें. ह्यापूर्वीच्या एका लेखांत 'सोमस्वामि' नामक मंदिराचा उल्लेख आहे. ह्या मंदिराच्या नांवावरूनच ह्या नगरीचें नांव सोमस्वामिपुर पडलें असेल हेंहि संभवनीय आहे.

प्रस्तुत शिलालेखांत युवराजदेवाच्या (१) गौड, (२) कोसल, (३) दक्षिण देशचे प्रसिद्ध राजे आणि (४) गुर्जर ह्यांवर मिळविलेल्या विजयांची वार्ता प्रथमच कळते. बिलहरीच्या शिलालेखांत ह्या राजानें गौड, कर्नाट, लाट, काश्मीर, कलिङ्ग आदि देशावर आपलें प्रभुत्व स्थापिल्याचें नमूद आहे. परंतु त्यांत कोसल आणि गुर्जरांवरील विजयाचा मुळीच उल्लेख नाही. अशा प्रकारें प्रस्तुत शिलालेखांत पहिल्या युवराजदेवाच्या दोन अधिक विजयांचा नवा उल्लेख आढळतो. तत्कालीन राजकीय परिस्थिति पाहातां ह्या विजयांबाबत कांही शंका किंवा दुमत उद्भवूं शकत नाही.

प्रस्तुत शिलालेखाची भाषा अगदी ऋजु आणि ओजस्वी आहे. ह्यांत व्याकरणदोष नाहीतच. प्रशस्तीची रचना करणारा कवि व्याकरण आणि अलंकारशास्त्राचा मोठा व्युत्पन्न पंडित दिसतो. त्याने श्लेष, यमक आणि विरोधाभासाची विपुल योजना केली आहे. प्रायः प्रत्येक श्लोकांत कोणत्या नां कोणत्या विशिष्ट अलंकाराची योजना आहेच. दुर्दैवाने शिलालेख कांही ठिकाणीं खंडित झाला आहे आणि कांही अक्षरें झिजून गेलीं आहेत. जर लेख संपूर्ण हातीं लागता तर संस्कृत कवितेंत ह्याला विशेष स्थान मिळालें असतें.

ह्या प्रशस्तीच्या काव्यात्म विशेषतांचा परिचय

होण्यासाठी एकदोन उदाहरणें दाखल केल्यास पुरेशीं होतील असें मला वाटतें. कलचुरि वंशाचे राजे चंद्रवंशी होते. त्यांना चंद्राचें प्रतिबिम्ब मानून कवि म्हणतो.

स्वच्छाशया स्फुरितनिर्मलमंडलाग्र–
संक्षोभिताखिलदिशाश्रयवाहिनीशा ।
सोमात्सदुद्गतिरतीव्रकरा नरेन्द्र–
चन्द्रावली प्रववृते प्रतिबिम्बितेव ॥

कलचुरि वंशाचा उद्भव चंद्रापासून, जणू चंद्राचेंच तें प्रतिबिंब. चंद्रोदयाने दिशा (आशा) उज्ज्वल होतात. आणि चारहि दिशांचे समुद्र (वाहिनीश) उचंबळून येतात. कलचुरि राजांच्या स्वच्छ खड्गानें सगळ्या दिशांचे वाहिनीश म्हणजे राजे संक्षोभित झाले. चंद्र आकाशांत वर चढतो, (सदुद्गति), कलचुरि वंशाचे राजेहि सदुद्गति होते, म्हणजेच उच्चकार्यरत असत. चंद्र अतीव्रकर म्हणजे सौम्य किरणांचा असतो, हे राजेहि अतीव्रकर होते म्हणजें हे राजे जो करभार प्रजेकडून वसूल करीत तो सौम्य असे, जाचक नसे.

दुसऱ्या एका श्लोकाचा हा भाग पहा.
यस्यांघ्रिवारिरुहि वाढमलीयमाना:
प्रापुर्द्विषस्सपदि संपदमापदञ्च ।

येथे अलीयमान याचे दोन अर्थ–(१) भृंगासारखे (२) नम्र न होणारे असे—करून कवीने शत्रूंच्या संपद् आणि आपद् ह्या दोन्ही स्थितींचें वर्णन केलें आहे.

विरोधाभासाचें तिसरें उदाहरण फार सुंदर आहे. सोमेश्वर नामक मंत्र्याचें वर्णन करतांना कवि म्हणतो,
धिषणान्वितो पि काव्यप्रियोपि बुधसंगतोपि तच्चित्रम्
यत्सकलग्रहरहितः श्रीमद्भूमिप्रसूनुरसौ ॥

सोमेश्वर सकलग्रहांपासून विमुक्त असूनहि तो धिषणाशीं (बृहस्पति) संबंधित (अन्वित), काव्याचा (शुक्र) आवडता (प्रिय), बुधसंगत आणि भूमिप्रसूनु (मंगळ) आहे. ह्या विधानांत स्पष्ट विरोध आहे. जी व्यक्ति सकलग्रहांपासून विमुक्त आहे ती बृहस्पति, शुक्र, बुध, मंगळ आदींशीं संबंधित कशी असणार ? ह्या विरोधाचा परिहार पुढील प्रकारें होतो, सोमेश्वर सगळ्या प्रकारांच्या ग्रहांपासून म्हणजें कुविचार किंवा व्ययाबावापासून मोकळा होता. तो धिषणान्वित म्हणजे बुद्धिमंत होता. काव्य (कविताबाङ्मय) त्याला प्रिय होतें. बुध म्हणजे विद्वानांच्या सहवासांत तो राहायचा आणि त्याच्या पित्याचें किंवा पितामहाचें नांव भूमि होतें.

अशा प्रकारें प्रस्तुत शिलालेखाचा लाभ म्हणजें एका सुंदर संस्कृत प्रशस्तिकाव्याचा नवा परिचय होय. पण ह्याचें महत्त्व निव्वळ काव्य म्हणूनच नव्हे तर कलचुरि वंशाच्या इतिहासांतील प्रकट झालेला एक अज्ञात दुवा म्हणूनहि आहे. हा शिलालेख ह्या कारणासाठीच फार मोलाचा आहे.

(मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या ४ डिसेंबर १९५५ च्या सभेंत वाचलेल्या निबंधाचा सारांश.)

अनुक्रमणिका

निर्वाण भगवान् बुद्धाचें अंतिम सत्य

शंकर गोविंद चट्टे

भगवान बुद्धाच्या निर्वाणाच्या स्वरूपाविषयीं आज निरनिराळे ग्रह प्रचलित आहेत. कांहींच्या मतें निर्वाण ही शून्यात्मक अभावात्मक अशी अवस्था आहे. तर कांहींच्या मतें निर्वाण ही पारलौकिक अवस्था आहे. कित्येकांच्या मतें भगवान् बुद्धाचें तत्त्वज्ञान वेद-विरोधी असून बुद्धधर्म ही वैदिक धर्माविरुद्ध प्रतिक्रिया आहे. परंतु भगवान् बुद्धाच्या उपदेशाचा विचार केला असतां वरील ग्रह विपरीत वाटतात.

भगवान बुद्धाच्या उपदेशाचा विचार करतांना जी एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते ती ही की, त्यांच्या उपदेशाचें केवलाद्वैत संप्रदायाशीं अतिशय साम्य आहे. भगवान् बुद्ध व केवलाद्वैती शंकराचार्य दोघेहि जग दुःखमय असून अविद्याजनित आहे असें मानतात. अविद्येचा नाश सम्यक् ज्ञानाने होतो. ह्या बाबतींत दोघांतहि एकवाक्यता आहे. सम्यक् ज्ञानाकरिता काया, मन व वाचा याच्यांतील कल्मष नाहीसें होऊन चित्त-शुद्धि झाली पाहिजे हें उभयतांसहि मान्य आहे. केवलाद्वैत संप्रदाय व भगवान् बुद्ध यांच्या विचारसरणींत इतकें साम्य आढळल्यावर भगवानाचें अंतिम सत्य निर्वाण व शंकराचार्य प्रतिपादित मोक्ष यांच्या स्वरूपांतहि एक-वाक्यता आढळली तर बुद्ध तत्त्वज्ञान उपनिषद–विरोधी व आचार्य–विरोधी नसून भगवान बुद्धाविषयींचे बरेच प्रचलित गैरसमज दूर होतील. प्रस्तुत लेखांत याच हेतूनें भगवान् बुद्धाचें निर्वाण व आचार्यप्रतिपादित मोक्ष यांच्यातील एकवाक्यता दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

तिसरें आर्य सत्य सांगतांना भगवान् बुद्धाने निर्वाणाचें अभाव स्वरूपाने पुढीलप्रमाणे वर्णन केलें आहे. "**यो तस्सायेव तण्हाय असेस विरागनिरोधो चागो पटिनिस्सगो मुत्ति अनालयो**" (समादिठ्ठी सुत्त मज्झम निकाय)—विकाररहित, अशा सर्व इच्छांचा ज्यांत उपशम आहे, सर्व तृष्णांचा ज्यांत त्याग आहे, व त्यापासून मुक्ति आहे, त्यांत लीन होणें म्हणजे निर्वाण. दुसऱ्या एका स्थळीं स्वतःच्या निर्वाणप्राप्तीचें वर्णन करीत असतां भगवान् म्हणतात, "**सब्बसंसार-समयो सब्बूपाधिपटिनिस्सगो तण्हक्खयो विरागनिरोधो निब्बाणम्**" (अरियपरियसेन सुत्त मज्झम निकाय)—ज्यांत सर्व इच्छांचा उपशम व शेवट होतो, सर्व संस्कारांचा उपशम होतो व उपाधींचा शेवट होतो तें निर्वाण.

निर्वाणाच्या स्वरूपाचें वर्णन करतांना मिसेस ऱ्हीस डेव्हिड म्हणतात " नरकापासून वा पापापासून मुक्तता असें निश्चितपणें निर्वाणाचें वर्णन करतां येत नाही. ख्रिस्ती लोकांची ज्याप्रमाणे स्वर्ग–नरकावर श्रद्धा आहे तशी पुनर्जन्माच्या कल्पनेमुळे भारतीयांची श्रद्धा असूं शकत नाही. पाश्चात्यांच्या श्रद्धेप्रमाणे सर्व जिवांना स्वर्गांत वा नरकांत मृत्यु येईल. परंतु भारतीयांच्या श्रद्धेप्रमाणे कर्मक्षय झाला असतां ते स्वर्ग वा नरकापासून पतन पावतील. नरकांत जन्म येणें ही कल्पना तितकी भयंकर नाही, जितकी जन्म–मरणाच्या फेऱ्यांतून सुटका नाही ही कल्पना भयंकर आहे. सुखांत किंवा दुःखांत असलेल्या जिवास आज ना उद्या ही स्थिति नष्ट होणार असें वाटतें, परंतु ती नष्ट झाल्या-वर पुनर्जन्म येतो व अपूर्णत्वामुळे कर्मफलें भोगावीं लागतात व जिवास चिंता, जरा, दुःख, मरण इत्यादि-कांचा पुन्हा अनुभव घ्यावा लागतो. यामुळेच सर्व भार-तीय दर्शनांनी जन्म–मरणापासून कसें मुक्त होतां येईल या प्रश्नाचा प्रामुख्याने विचार केला आहे." (It can-

not be accurately described either as salvation from hell or salvation from sin. The Indian belief in transmigration made the belief in hell impossible. All the beings in all the heavens and hells would necessarily die (as we would say), fall from that state (as the Indians would say), when the casual efficacy of the Karma which put them there is exhausted. The terrible thing was not a rebirth in hell so much as the far more staggering and terrifying conception that there was no escape the round of transmigration at all. A being in a state of misery or in a state of happiness might be perfectly sure that that state would sooner as later come to on end but it would come to an end only by the commencement of another state of another birth and that birth would be inevitably attended by all the results inherent in the limitations of individuality and the struggle necessary to keep individuality alive would bring with it fresh cares and troubles, old age and death, grief lamentations, wailings and despair" Buddhism,—page 154).

बौद्धदर्शन हें भारतीय असल्यामुळे इतर भारतीय दर्शनांप्रमाणेच त्यांतहि जन्म–मरणापासून मुक्तता कशी होईल याच प्रश्नाचा मुख्यत्वें विचार केलेला आहे. जन्म–मरणाचा शेवट हा तेव्हाच होऊं शकतो की जेव्हा जन्ममरणाचें कारण असलेल्या अविद्याजात उपाधि वा संखर नष्ट होतात व अविद्येनें उत्पन्न झालेलें दुःख नाहीसें होतें. तेव्हां मुक्ति किंवा निर्वाण म्हणजे पाप वा नरकापासून मुक्तता नसून ज्या संसारांत जिवास जन्म–मरणाचे अनंत फेरे घ्यावे लागतात त्या संसारापासून मुक्तता होय. ह्या मुक्तिकरिता प्रथम विद्येने अविद्येचा नाश झाला पाहिजे. भगवान बुद्धाच्या या विचारसरणीसारखीच वेदान्ताची विचारसरणी आहे.

मोक्ष शब्दाचा अर्थ मुक्तता व निर्वाण शब्दाचा अर्थ "निघून गेलेला" "बाहेर पडलेला." अर्थात या दोन्ही मागे 'कशापासून' हा प्रश्न अध्याहृत व अभिप्रेत आहे. मोक्ष म्हणजे सर्व दुःखांचा नाश, अनर्थजाताचा शेवट, भवचक्रापासून मुक्तता व अविद्येचा नाश. हा अविद्यानाश विद्येने वा सत्यज्ञानाने होतो. (ज्ञानादेव तु कैवल्यम्) व ज्ञानप्राप्तिनंतर तृष्णा, अहंकार व सर्व द्वैत नाहीसें होतें. भगवान् बुद्धहि निर्वाण म्हणजें जीवास बद्ध करणाऱ्या दहा संयोजनांचा नाश असेंच मानतो. मोक्ष म्हणजे जीवास बद्ध करणाऱ्या वासनांसह सर्व संसारापासून मुक्तता अशी वेदांताची विचारसरणीं आहे.

आता निर्वाणाचें निश्चित स्वरूप काय आहे, त्यांत कोणती कल्पना अभिप्रेत आहे हें पाहण्याकरिता पाली ग्रंथांतून निर्वाणाला दिलेल्या विशेषणांचा विचार करूं. निर्वाण **निच्च** (नित्य) व **सच्च** (सत्य) आहे. अर्थात तें अनित्य, असत्य किंवा मायाकृत जगाच्या विरोधी आहे. धम्मपदांत निर्वाण **परमं सुखं**– अर्थात दुःखमय जगाच्या विरोधी आहे असें म्हटलें आहे. तें बोधी किंवा संबोधी अर्थात ज्ञानस्वरूप आहे. अभिधान प्रदीपिकेंत निर्वाणाचें स्वरूप सांगणारीं पाली ग्रंथांतील एकंदर ४६ विशेषणें दिलेलीं आहेत. त्यांपैकीहि कांहींचा विचार करूं. निर्वाणास मोळ, अपवर्ग, मुत्ति (मुक्ति) त्ताण, सरण खेम, सुद्धि, सान्त, अखर, अनन्त, ध्रुव, अच्युत, अमत (अमृत), अकत (अकृत), असंख्यात, अमरण, केवल, शिव, अशोक, अनाख्यात योगक्खेम, सेय्य (श्रेय) इत्यादि विशेषणें दिलेलीं आहेत. ह्या सर्व विशेषणांचा विचार केला असतां निर्वाण म्हणजे राग, द्वेष व मोह हे तीन अग्नि, जिवाच्या ठिकाणीं असणाऱ्या दुष्प्रवृत्ति, अविद्या व वासना

यांचा ज्यांत नाश होतो अशी परमसुखाची अक्षय व नित्य स्थिति. वरील विशेषणें व उपनिषदांत ब्रह्माचें वर्णन करतांना योजिलेलीं विशेषणें यांत इतकें साम्य आहे की, निर्वाणाच्या जागीं ब्रह्म ठेवला तर अर्थाचा कांहीच बदल होणार नाही.

वरील विशेषणांत, उपनिषदांत ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करण्याकरिता जशी भावाभावात्मक विशेषणें उपयोजिलीं असतात, त्याप्रमाणेच निर्वाणाचें स्वरूप सांगणारीं भावाभावात्मक विशेषणें आहेत. अभावात्मक विशेषणांनी अविद्या किंवा तृष्णा यांच्यापासून होणारें जें द्रव्यात्मक वा गुणात्मक असेल त्या सर्वांचा अभाव सांगितला असून भावात्मक विशेषणांनी जें कांही सत्य सुंदर व सुखमय आहे तें निर्वाणांत आहे, असें म्हटलें आहे. निर्वाण अरूप, अक्षर, अनन्त, अमृत व अमरण आहे. म्हणजेच भौतिक जीवनाचीं दोन टोकें असलेल्या जन्म-मरणाचा अभाव असलेली ती स्थिति आहे. निर्वाण अरूप म्हणून अनन्त अर्थात् तें अच्युत, अचल, अकृत व अक्षर आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रह्माचें वर्णन करतांना उपयोगांत आणलेला 'नेति नेति' हा शब्दप्रयोग ज्याप्रमाणें ब्रह्म अस्ति जायते इत्यादि षड्भावविकाररहित आहे असें दर्शवितात त्याचप्रमाणे वरील अभावात्मक विशेषणें निर्वाणाचें तेंच स्वरूप तशाच प्रकारें संक्षेपानें सांगतात. **'सब्बुपाधिपटिनिस्सग' व सब्ब संखार समथ** या विशेषणांनीहि तोच अर्थ वेगळया प्रकारें सांगितला आहे.

परंतु केवळ अभावात्मक विशेषणांनी जर भगवान् बुद्धाने निर्वाणाचें स्वरूप सांगितलें असतें तर त्यामुळे निर्वाण म्हणजे शून्य अभाव असा ग्रह उत्पन्न झाला असता. या करिताच अव्याप्ति दोष पत्करूनहि भगवान् बुद्धाने निर्वाणाचें स्वरूप भावात्मक विशेषणांनी सांगितलें आहे.

उपनिषद्कारांनाहि ब्रह्माचें वर्णन करतांना अशीच अडचण उत्पन्न झाली होती. दिक्कालाद्यनवच्छिन्न व अनन्त ब्रह्माचें वर्णन सान्त व परिमित जगांतील शब्दांनी होणें अशक्य असल्यामुळे, ब्रह्म शून्यस्वरूप आहे असा ग्रह टाळण्याकरिता उपनिषत्कारांनी सत् चित् आनंद हीं भावात्मक विशेषणें योजिलीं आहेत. भगवान् बुद्धानेहि निर्वाणाचें वर्णन करतांना निच्च (नित्य) सच्च (सत्य) अशीं भावस्वरूप विशेषणें योजिलीं आहेत. निर्वाण संबोधी पूर्णज्ञानस्वरूप आहे. औपनिषदिक ब्रह्महि चिन्मय-ज्ञानस्वरूप स्वयंप्रकाशी आहे. ब्रह्म आनंदमय आहे, निर्वाण परम सुख आहे. अशाप्रकारें ब्रह्म व निर्वाण यांच्या विशेषणांत शब्दभिन्नत्व असलें तरी अर्थ भिन्नत्व नाही.

येथे हें लक्षांत घेतलें पाहिजे की, ब्रह्माचीं सत्-चित्-आनंद हीं विशेषणें विशेषण विशेष्य संबधानें नसून ती स्वरूपसंबंधाने वा तादात्म्य संबंधाने असतात. निर्वाणाचीं वरील विशेषणें देखील याच संबंधाने घ्यावयाचीं. या विशेषणांसारखीं इतरहि अन्य विशेषणें याच अर्थानें घेतलीं पाहिजेत. ह्या विशेषणांचा व्यवहारांत आपण जसा दिक्कालावच्छिन्न अर्थ घेतों तसा तो न घेतां, दिक्कालाद्यनवच्छिन्न तत्त्व मग तें भगवान् बुद्धाचें निर्वाण असो किंवा औपनिषदिक ब्रह्म असो, त्यांचीं हीं विशेषणें दिक्कालनिरपेक्षच समजलीं पाहिजेत.

उपनिषदांत ब्रह्माचें 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह'—तें वाणीचा व मनाचा विषय नाही, तें तर्काचा विषय नाही, असें वर्णन आढळतें. त्यामुळे तें 'इदमस्ति' अशा स्वरूपांत सांगतां येत नसून 'इदम् नास्ति' अशा अभावस्वरूपानेच सांगावें लागतें. निर्वाणाचेंहि स्वरूप असेंच दुरनुबोध व अतक्कावचर असल्यामुळे भगवान् बुद्धाने 'अमत', 'अच्चुत' अशी अभावदर्शक विशेषणें योजून निर्वाणाचें स्वरूप सांगितलें आहे.

येथे आणखीहि एक मुद्दा विचारांत घेतला पाहिजे तो असा की, अभावदर्शक विशेषणें सत्तेचा निषेध न करतां गुणांचाच निषेध करतात. उदा०, "देवदत्त अज्ञानी आहे" या वाक्यांत ज्ञानत्वगुणाचा देवदत्ताच्या ठिकाणीं अभाव दर्शविला आहे. देवदत्ताची सत्ता (अस्तित्व) मान्य आहे. त्याचप्रमाणे "ब्रह्म किंवा निर्वाण अक्षर आहे" यांतहि 'क्षरत्व' गुणाचा ब्रह्मांच्या

किंवा निर्वाणाच्या ठिकाणीं अभाव आहे हेंच अभिप्रेत आहे. ब्रह्म वा निर्वाण यांच्या सत्स्वरूपाचा अभाव नाही. फक्त हें स्वरूप सापेक्ष कल्पनातीत असून स्वसंवेद्य आहे एवढेंच.

भगवान् बुद्धाचें वा उपनिषदांचें अंतिम सत्य अभावात्मक वा शून्यात्मक नाही. तें भावस्वरूप, सत्स्वरूप, सर्वकालावस्थातीत व निरपेक्ष आहे. तेव्हा अभावात्मक विशेषणें निर्वाण हीं अभावरूप स्थिति दर्शविणारीं नाहीत. निर्वाणप्राप्तींत निर्वाण प्राप्त होणाराचा नाश होत नसतो. ती 'याची देहीं याच डोळा' अनुभवता येणारी स्थिति परमसुखाची पूर्णावस्था आहे. भगवान् बुद्धास याच देहांत ही पूर्णावस्था प्राप्त झाली होती.

ह्या निर्वाणसुखापुढे ऐहिक सुखें क्षुद्र व तुच्छ असतात. बुद्धकाव्यांत भौतिक जगावर व जन्ममृत्यूवर विजय प्राप्त केलेल्या अखंड आत्मानंदाच्या व अंतः-सुखाच्या अवस्थेचें जेथे जेथे वर्णन आहे तेथे तेथे अति-शय उच्चतम सौंदर्याचा साक्षात्कार आढळतो, त्याचें तरी कारण हेंच. (The Buddhist poems reach their highest level of beauty when they attempt to describe the glory of the state victory over the world and over birth and death, at an inward peace that can never be shaken, of joy that can never be raffled–Rhys David's : Buddhism, page 266). बुद्धकाव्यांतील अशा स्थळांचें काळजी-पूर्वक निरीक्षण केलें तर निर्वाण प्राप्त झालेल्या जिवाची स्थिति व ब्रह्मीभूत झालेल्याची स्थिति यांत अत्यंत साम्य आढळतें.

अभावात्मक विशेषणें नेहमी सापेक्ष असतात. त्यांचा अर्थ प्रतियोगी वाचून नसतो. परंतु हीं विशेषणें अंतिम सत्याचा केव्हाच अभाव दर्शवीत नाहीत. तीं फक्त ज्ञानविषय झालेल्या विषयाच्या दिक्कालावछिन्न अंशा-चाच अभाव दर्शवितात. त्यापुढे त्यांची व्याप्ति नसते. यामुळेच ब्रह्म किंवा निर्वाणास लावलेलीं अभावात्मक विशेषणें केवळ सापेक्ष कल्पनेचा अभाव सुचवितात. ब्रह्म किंवा निर्वाणाचा अभाव सुचवीत नाहीत.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल की, भगवान् बुद्धाचें निर्वाण हें औपनिषदिक ब्रह्माप्रमाणेच भावस्वरूप आहे, अभावस्वरूप नाही. विषयनिष्ठ आनं-दांत मग्न झालेल्यांना, अज्ञानांधकाराने दृष्टीस मंदत्व आलेल्यांना ब्रह्माप्रमाणेच निर्वाणहि शून्य भासेल; परंतु भासणें म्हणजे असणें नव्हे ! निर्वाण निराश्रय, अद्वि-तीय, असून इतर कोणत्याहि साधनाने त्याचें ज्ञान होणें शक्य नसल्यामुळे कदाचित् त्यास कुणी शून्य म्हणेल; परंतु ती पूर्णावस्था आहे, तींत भूत–वर्तमान–भविष्य असा कालविभाग नाही, सर्व अवस्थांचा लय आहे. सर्व विकारांचा व तृष्णांचा उपशम आहे, सर्व गुणदोषांचा अंत आहे. सारांश, निर्वाण म्हणजे द्वैताभाव व परमसुख.

आतापर्यंत निर्वाणाच्या स्वरूपाचें जें वर्णन केलें तशाच प्रकारें निर्वाणाचें स्वरूप बौद्ध पंडित नागार्जुन याने आपल्या "माध्यमिक कारिकां"तहि सांगितलें आहे. अलिकडे पाश्चात्य पंडितहि याच दृष्टीने विचार करीत आहेत. रशियन पंडित Dr. Stcherba-tsky आपल्या "Central conception of Nirvana" या ग्रथांत म्हणतात. "Nirvana is a state of 'Absolute Quiesence' condi-tion in which all emotions and con-crete thoughts are stopped forever."

भगवान् बुद्धाच्या निर्वाणाच्या स्वरूपाचें आता-पर्यंत जें विवेचन केलें त्यावरून असें दिसून येईल की, भगवान् बुद्धाचें तत्वज्ञान औपनिषदिक परंपरेंतून निर्माण झालें असून तें वेदान्तविरोधी नाही. वेदान्त व भगवान् बुद्ध यांचें अंतिम सत्य एकच आहे. यामुळेच भगवान् बुद्ध आपल्या मार्गास **'पुराणं मग्गं'** असें म्हणतात. परंतु भगवान बुद्धांना जरी तो पुराणं मग्ग वाटत असला तरी त्यांच्या अनुयायांना मात्र तो 'नूतन मग्ग' वाटतो एवढेंच नव्हे, तर तो भारतीय तत्त्वज्ञानाविरुद्ध प्रतिक्रिया वाटते. या संबंधांत Dr. Suzako आपल्या "Mahayana Buddhism" या ग्रंथांत म्हणतात "Buddhism was foun-ded upon the ancient Indian religion and developed from it, its foundation

अनुक्रमणिका

stone being the Vedas, Brahmans and Upanishadas. It cannot therefore be conceived as something entirely separate but should be regarded as further growth of Indian religion."

भगवान् बुद्धाचा 'धम्म' हा वैदिक परंपरेपासून भिन्न नाही. तो वैदिक तत्त्वज्ञानाचा ज्ञानमार्गी संप्रदाय आहे. पूर्वकालांतील तत्त्वज्ञांना व उपासकांना तो आपल्या पैकीच एक संप्रदाय वाटल्यामुळे व तोहि वेदानुकूल वाटल्यामुळे त्यांनी भगवान् बुद्धाची दशावतारांत गणना करून भगवानाचें श्रेष्ठत्व मान्य केलें.

अष्टकलांचा पुनर्जन्म

"सव्यसाची"

यंत्रयुगांतील 'साहसा'ने साहस केलें आणि निरागस आत्मीयतेच्या भावनेने त्याने भारतीय महामानवाला प्रबोधन केले, "मानवा तुझ्या चैतन्याचा आविष्कार श्रमप्रतिष्ठेद्वारें दशदिशांमध्ये होऊं दे."

महामानव ?

नव्हे, अस्थिचर्माची निर्विकार जुळणी करणारें व उरांत असहाय धुगधुगी बाळगणारें, दारिद्र्याच्या कबरींत पुरलेलें जिवंत मढेंच तें !

—त्याने अस्पष्ट शब्दांत प्रतिसाद दिला.

"यंत्रतंत्राच्या या विश्वव्यापी अधिसत्तेचा मी एक दुबळा गुलाम आहे. यंत्राच्या मायावी प्रलोभनांनी मी आता आळसाच्या चौकटींत बंदिस्त झालों आहें. आता कुठलें साहस ? कुठलें चैतन्य ? कुठलें श्रम आणि कुठली प्रतिष्ठा ?"

लांब लांब पावलें टाकीत 'साहस' निघून गेलें. मानवता एकलेपणाच्या असह्य आगींत आपलें हृदय जाळूं लागली. जखमी चंडोलांचें विव्हळणें आणि फुटक्या पडघमाचा बद्द आवाज दूरवर कुठेतरी ऐकूं येऊं लागला.

आणि भारतीय मानव ?

महागाईचे पिवळे डोळें चुकवीत, कुजल्या माताचा वीतभर डोंगर शोधण्यासाठी स्वप्नांची शिदोरी व आकांक्षांच्या पावड्या घेऊन सुखाच्या शोधांत त्याने अखंड अनिरुद्ध पदयात्रा सुरूं केली.

पारतंत्र्याची भीषण रजनी काळोखाच्या मिटक्या मारीत होती; आणि दूर कोपऱ्यांत कळकटलेली एक मिणमिण पणती काळोखाला नाक मुरडत तेवत होती; हृदयाचें घर उजळत होती.

अशाच एका मध्यरात्रीं अचानक सूर्योदय झाला.

स्वातंत्र्याचा सूर्योदय ! तो स्वावलंबनाच्या नव्या मनूचा साक्षात्कार घेऊन आला. सुख–समृद्धीची पहाट उगवली. नवजीवनाचें मंगलगान झालें. नव्या युगाचा नित्य नूतन संदेश मिळाला. आकाशवाणी झाली.

"यंत्रांच्या दासानुदासांनी उठा. हीं यंत्रें तुमच्याच बुद्धिमत्तेचीं अपत्यें आहेत. त्यांना गोंजारा, राबवा. पण तुमच्याशीं असलेलें हें नातें कदापिहि विसरूं देऊं नका. 'कराग्रे वसते लक्ष्मीः' हें लक्षांत घ्या आणि तुमचें कौशल्य हस्तव्यवसायांत ओता. अष्टकलांचें अन्वेषण करा. प्राचीन वैभवाचें पुनरुज्जीवन करा. समृद्धीचें अभिष्टचिंतन करा. म्हणजे मग ऋद्धिसिद्धि तुमच्या घरीं पाणी भरूं लागतील."

मानवता प्रसन्नतेने हसली. इंद्रधनुष्यांतल्या सप्त-रंगांची छटा अवनीतलावर पसरली. नव्या योजनांचं रोपण झालं. त्यांना परिश्रमाचं खतपाणी मिळालं.

समाजपुरुषाने शरीर जोमाने झटकलें. आळसाच्या बंदिवासांतून त्याने आपली सुटका करून घेतली. प्रत्येक कुटींत नवप्रभेचें आगमन झालें. लगबगीने साहसहि परत आलें. जागरणाचें नवें पर्व ! जागृतीचा नवा आशय !!

—इकडे ग्रामोद्योगांच्या पुनर्जन्माचीं घोषणा करणारीं मंगल वाद्यें वाजूं लागलीं

—तिकडे, राक्षसी यंत्रें नाक फेंदारून वाफेचे उष्ण निःश्वास सोडूं लागलीं.

अनुक्रमणिका

र स ग्र ह ण

भयचकित नमावें तुज रमणी !

माधव गोपाळ जामदार

स्त्री ही परमेश्वराची उत्कृष्ट कलाकृति आहे. पण त्या कलाकृतीचें रहस्य आकलन होण्याची पात्रता अंगीं असलेले मर्मज्ञ रसिक विरळाच ! म्हणून जिच्या उदात्त व्यक्तिमत्वासमोर पुरुषजातीचें मस्तक, आदरापोटीं निर्माण झालेल्या भीतीने लवावें त्या स्त्रीजातीची, बळी तो कानपिळी या न्यायाने अन्याय्य पायमल्ली समाजांत होत असते. जननी, रमणी, भगिनी आणि नंदिनी या चतुर्विध नात्यांनी अखिल पुरुषजातीला कायमचें ऋणी करून ठेवणाऱ्या स्त्रीजातीवर होणारा हा अतिक्रमणाचा अन्याय सहन न होऊन कविवर्य भास्करराव तांब्यांसारख्या सहृदय रससिद्ध कवीचें असली स्त्रीदाक्षिण्य उफाळून आलें. आणि 'भयचकित नमावें तुज रमणी !' हें गौरव-गीत निर्माण झालें.

कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे हे बृहन्महाराष्ट्राचे जेष्ठ आणि श्रेष्ठ भावकवि आहेत. 'तांबे यांची समग्र कविता' या नांवाने प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या काव्यसंग्रहांतील भावगीतें महाराष्ट्रांतील आबालवृद्धांना बिलक्षण आवडलीं. तांबे हे कौटुंबिक कवि म्हणूनहि प्रसिद्ध आहेत. कारण त्यांच्या कवितेंत कौटुंबिक जीवनाचें हृदयंगम प्रतिबिंब पडलें आहे. मायबहिणी, मुलेंबाळें, सगेसोयरे या कौटुंबिक नात्यांचा भावनिक आविष्कार त्यांच्या बऱ्याच कवितांतून झाला आहे. त्यांची भाषाहि भावनावाही असल्यामुळे त्यांच्या कविता विलक्षण चटकदार झाल्या आहेत. त्यांच्या काव्याला गेयतेची जोड मिळाल्यामुळे काव्य आणि संगीत यांचा मनोज्ञ मेळ त्यांच्या कवितेंत बसला आहे. तांबे हे आस्तिक्य बुद्धीचे कवि असल्यामुळे त्यांच्या अभिजात सौंदर्य दृष्टींत मांगल्याचें दर्शन घडतें. 'भयचकित मावें तुज रमणी !' या त्यांच्या भावगीतांत वरील सारीं वैशिष्टचें प्रगटलीं आहेत.

> 'भयचकित नमावें तुज रमणी !
> जन कसे तुडविती तुज चरणीं ?'

या ध्रुवपदांत आपण अखिल मानवजातीचें कल्याण करणाऱ्या स्त्रीजातीचें स्तुतिस्तोत्र गाणार आहोंत असें कवीने सूचित केलें आहे. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' या सुभाषितांतील कल्पनेचाच काव्यमय विस्तार जो तांब्यांनी पुढे केला आहे तो त्यांना स्त्रीजातीचा अत्यंत श्रेष्ठ असा अनुभव आला म्हणूनच ! स्त्री ही वंदनीय आहे याचे कारण सांगतांना ते म्हणतात—

> 'महाकवी, तत्वज्ञ, भूपती
> समरधुरंदर वीर धीरगती
> स्थितप्रज्ञ हरि उरीं कोंडिती
> प्रसव तयांचा तूं जननी !'

या मंगलमय विश्वाचें अस्तित्वच मुळी स्त्रीशिवाय असंभाव्य आहे. मानवजातीला जीवनाचा महान संदेश देणारे आणि आपल्या प्रतिभासंपन्न वाणींतून भविष्यवाद सांगणारे व्यासवाल्मीकिसारखे महाकवि; जीवनाचा अर्थ विशद करून सांगणारे शंकराचार्य ज्ञानेश्वरासारखे अनुभवी तत्त्वज्ञानी; राष्ट्राचें संरक्षण करून संपूर्ण जीवन समृद्ध आणि सुखी करणारे विक्रमादित्य शिवरायासारखे तेजस्वी सम्राट, समरांगणांत तळहातांवर शीर घेऊन मातृभूमीसाठी बलाढ्य शत्रूशीं शौर्याने झुंज घेणारे तानाजी बाजीसारखे धीर गंभीर योद्धे आणि 'इंद्रियें जिंकिलीं ज्याने त्याची प्रज्ञा स्थिरावली' असें भगवंतांनी ज्यांचें वर्णन केले आहे,

असे भगवंतालाच आपल्या हृदयाच्या सिंहासनावर कायमचे प्रतिष्ठित करणारे जितेंद्रिय स्थितप्रज्ञ या सर्वांना जन्म देणाऱ्या स्त्रीजातीसमोर सारा वृथाभिमान सोडून कोण नमणार नाही ?

पुढे स्त्री जातीच्या दिव्य व उदात्त सामर्थ्याचें उत्कृट वर्णन करतांना कवि म्हणतात—

" भूत निघाला तव उदरांतुन
वर्तमान घे अंकीं लोळण
भविष्य पाही मुली रात्रंदिन
तव हाकेची वाट मनीं–"

भारताच्या उज्ज्वल आणि स्फूर्तिप्रद अशा इतिहासाकडे नजर टाकली असतां 'भूत निघाला तव उदरांतुन' म्हणजे काय तें कळेल. स्त्रीशिवाय विश्वाचें अस्तित्वच मुळी असंभवनीय आहे. स्त्री जन्म देते तेव्हाच विश्व आकारास येतें व पुढे तिच्याच पुण्याईने विकास पावतें. विश्व निर्माण करणाऱ्या स्त्रीमुळेच गतेतिहास निर्माण झाला. आणि वर्तमानादि स्त्रीच्या चरणीं लीन आहे. कारण जन्मदेने दिलेल्या पुण्याईचा व संस्कारांचा वारसा घेऊन तो आपली प्रगति करून घेत असतो. भविष्यकाळ तर मोठ्या आतुरतेने तिच्या हाकेची वाट पाहत आहे. उत्कृष्ट संततीला जन्म देऊन आणि तिच्यावर उत्तम संस्कार करून उज्ज्वल भविष्यकाळ निर्माण करण्याची शक्ति कर्तव्यपरायण अशा त्यागी स्त्रीच्या ठायीं नाही काय ?

अशा या उदात्त आणि समर्थ व्यक्तित्वाच्या स्त्रीदैवताचें सौंदर्य वर्णन करतांना कवीने असे उद्‌गार काढले आहेत की—

" तुझ्या कांतिने चंद्र झळझळे
फुला फूलपण मुली ! तुजमुळे
रत्नीं राग तुझा गे उजळे
तुझ्या स्तवच हीं, प्रियभगिनी ! "

सतेज पौर्णिमेच्या शांत चंद्रिकेला जी आल्हादक आभा लाभली ती स्त्रीच्याच कृपेमुळे. स्त्रीच्याच कांतीचा शीतल रम्य आविष्कार चंद्राच्या ठिकाणीं झाला आहे. मधुर धुक्याच्या अस्फुट सृष्टींत हळूच उमलणाऱ्या फुलाचें फूलपण त्याच्या मुग्धमधुरतेंत व सुकुमारतेंत आहे. ही मुग्धमधुरता व सुकोमलता फुलाला स्त्रीने दिलेली आहे. पाणीदार रत्नाला स्त्रीमुळेच उजाळा मिळाला आहे. स्त्रीच्या सौंदर्याचें हें वर्णन कवीने काव्यमय भाषेंत करून तिच्या तुलनेंत चंद्र, पुष्प आणि रत्न यांना कमी लेखलें आहे. ही निवेदनाची एक अलंकारिक पद्धत आहे. कवीच्या म्हणण्याचा आशय असा की चंद्राची सौम्य शीतलता पुष्पाची मुग्धमधुरता आणि रत्नाची रम्य तेजस्विता यांचा स्त्रीच्या ठिकाणीं हृदयंगम संगम झाला आहे.

पुरुष जातीवर अनंत उपकार करणाऱ्या स्त्रीजातीचा उदात्त गौरव या संबंध कवितेंत केला आहे. त्यामुळे ही संपूर्ण कविताच उदात्त नांवाच्या अलंकाराचें उत्कृष्ट उदाहरण आहे. वस्तूच्या समृद्धीचें वर्णन जेथे केलें असेल तेथे उदात्त अलंकार होतो. शरीराच्या अलंकारांप्रमाणेच भाषेचेहि अलंकार असतात. शरीराला अलंकारानी शोभा येते तशी काव्याला भाषेच्या अलंकारांनी शोभा येते. उदात्त अलंकाराची जोड मिळाल्यामुळे भावनेचा आविष्कार करणारी ही कविता अधिकच परिणामकारक झाली आहे. रसिकाच्या भावनांचें उदात्तीकरण करणें हा काव्याचा उद्देश आहे; तो ही कविता वाचून सफल झाला नाही असें कोण म्हणेल ?

अनुक्रमणिका

डॉ. दफ्तरींची ज्ञानसाधना १

सुरेश म. डोळके

प्रास्ताविक

विद्वद्रत्न डॉ. केशव लक्ष्मण ऊर्फ भाऊजी दफ्तरी यांचा जन्म ता. २२–११–१८८० रोजीं झाला.

—आणि गेले सात महिने त्यांच्या जीवनाशीं खेळ खेळून काळपुरुषाने रविवार ता. २९–२–१९५६ रोजीं, भीष्माचार्यांच्या निर्वाण–दिनीं, जीवनाच्या क्षेत्रांतून या भीष्माचार्यांना हद्दपार केलें !

साक्रेटीसने तत्त्वज्ञानाची व्याख्या मृत्यूचा अभ्यास अशी केली आहे. अमरत्वाचा शोध म्हणजे मृत्यूचा अभ्यास. या दृष्टीने खरा ज्ञानी पुरुष हा मृत्युंजय असतो. 'वासनाक्षय' व 'एकात्मप्रत्ययसार' या आंतरिक प्रसादगुणांनी जीवन्मुक्तीची साधना करीत तो आपलें पार्थिव शरीर शांत प्रसन्नतेने मृत्यूच्या स्वाधीन करीत असतो. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे भाऊजींचा उल्लेख नेहमी 'साक्रेटीसासारखा एक तपस्वी ज्ञानी पुरुष' असा करीत असत. भाऊजींच्या मृत्यूकडे पाहिलें म्हणजे कोल्हटकरांच्या या उद्गारांची सार्थता मनाला पटते.

भाऊजींचें जीवन हा यज्ञ होता; त्यांचा मृत्यु ही त्या यज्ञांतली पूर्णाहुति आहे. ज्ञानान्मोक्षाच्या साधनेंत सदैव मग्न असलेल्या या ब्रह्मर्षीच्या जीवन–यज्ञांतून आविर्भूत झालेल्या ग्रंथरत्नांचा प्रस्तुत लेखांत थोडक्यांत परिचय करून देण्याचें योजलें आहे.

'भूमितिशास्त्र' (अप्रकाशित)—

लेखन : इ. स. १९०६

हा भाऊजींचा पहिला ग्रंथ. १९०० सालीं बी. ए. झाल्यानंतर लगेच त्याच वर्षी त्यांची इतिहास व न्यायशास्त्र या विषयांचे फेलो म्हणून कॉलेजांत नेमणूक झाली. त्यानंतर पटवर्धन हायस्कुलांत गणिताचे अध्यापक म्हणून काम करीत असतांना युक्लिडच्या भूमितींतील अप्रत्यक्ष सिद्धि (Indirect Proof) समजणें विद्यार्थ्यांना फार कठीण जातें असें त्यांना दिसून आलें म्हणून, तशा प्रकारची सिद्धि जिच्यांत नाही अशी भूमिति भाऊजींनी तयार केली. यांत प्रत्यक्ष सिद्धीनेच (Direct Proof) सर्व सिद्धांत सिद्ध केले आहेत.

प्रस्तुत ग्रंथाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागांत सरळ रेषा, कोन, त्रिकोण व इतर सरळ रेषाकृति यांचा विचार असून क्षेत्रफळ काढण्याची रीति व समानकोन त्रिकोणांचे धर्महि यांत सिद्ध केले आहेत. दुसऱ्या भागांत वर्तुळाचा विचार असून त्रिकोणमिती-चाहि (Trigonometry) अभ्यास आहे. तिसऱ्या भागांत आवश्यक तेवढा दीर्घ वर्तुळाचा विचार आहे.

या पहिल्याच ग्रंथांत भाऊजींच्या सूक्ष्म बुद्धीचा प्रत्यय येतो. आपल्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणाकरिता भाऊजींनी यांत उदाहरणेंहि भरपूर दिलीं आहेत. गणितज्ञांच्या विचाराकरिता भूमितिक्षेत्रांत क्रांतिकारक विचारसरणी मांडणारा भाऊजींचा प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध होणें अवश्य आहे.

'ग्रहगणितकुतूहल' [अप्रकाशित]—

लेखन : इ. स. १९१२

कॉलेजांत शिकत असतांनाच भाऊजींचें लक्ष ग्रह–गणिताकडे व विशेषतः 'ग्रहलाघवा'कडे उत्कटतेनें वेधलें गेलें, व त्यांनी म. म. भट्टजीशास्त्री घाटे यांच्याजवळ ग्रहलाघवाचा अभ्यास सुरू केला. घाटे-

शास्त्र्यांनी भाऊजींना ग्रहलाघवांतली वेरीजवजाबाकी शिकविली. पण गणिताची उपपत्ति शिकविली नाही. त्यामुळे ग्रहलाघवांत सूर्यस्पष्टीकरणाचें जें गणित आहे, त्याचा 'ग्रह दीर्घवृत्तांत कांही विशिष्ट नियमाने फिरतात' या आधुनिक सिद्धान्ताशीं भाऊजींना मेळ घालतां येईना. त्याकरिता त्यांनी ग्रहलाघवावरील 'मल्हारी दैवज्ञा'च्या टीकेचा कसून अभ्यास केला. पण तरीहि तो प्रश्न सुटेना.

दीर्घ वर्तुळांत फिरणाऱ्या ग्रहाचें गणित कसें होईल याचा अत्यंत सूक्ष्म व स्वतंत्र विचार करून भाऊजींनी दोन समीकरणें शोधून काढली. या दोन समीकरणांच्या साहाय्याने गणित करून पाहतां उत्तर जुळे पण रीतीचा समाधानकारक उलगडा होईना. शेवटीं या दोन समीकरणांचें एकच समीकरण कसें होईल हें भाऊजींनी शोधून काढलें. न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धान्तावरूनच, केवळ गणिताने, चंद्राच्या गतीचे ४० संस्कार पाश्चात्य गणकांनी कसे ठरविले हें जाणून घेण्याची भाऊजींना फार उत्कंठा लागली. त्याकरिता त्यांनी 'लूनर थिअरी'चें एक पुस्तक मुद्दाम कलकत्त्याहून मागवून त्याचा अभ्यास केला.

"आणि या सर्वांचा परिपाक म्हणून, ज्यावरून थोडया कोष्टकांनी, त्रिकोणमितिसारख्या उच्च गणिताच्या ज्ञानाशिवाय, आधुनिक ज्योतिःशास्त्रानुसार, ग्रहाचें सूक्ष्म गणित श्रमांशिवाय करतां येईल असा, 'मेंदूचे तुकडे पडल्यासारखें वाटावे' इतके प्रदीर्घ परिश्रम करून, १९१२ च्या अखेरीस ग्रहलाघवासारखाच 'ग्रहगणितकुतूहल' नावांचा ग्रंथ भाऊजींनी लिहिला. ज्योतिर्गणितांतील श्रम टाळण्यासाठी व सूक्ष्मता साधण्यासाठी भाऊजींनीं या ग्रंथांत ग्रहगणिताच्या अनेक नवीन रीति शोधून काढल्या आहेत.

'ह्या ग्रंथासाठी लागलेल्या असह्य बौद्धिक श्रमांनी माझें रक्त, शक्ति व आयुष्य फार खाल्लें अणि अग्निमांद्य कायमचें जडलें' असें भाऊजी म्हणत असत.

'भारतीय युद्ध कालनिर्णय'

लेखन : इ. स. १९१३; प्रकाशन : इ. स. १९१८

कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचा 'भारतीय ज्योतिषशास्त्र' हा ग्रंथ वाचीत असतां 'भारतांतील ग्रहस्थिति प्रत्यक्ष पाहून लिहिलेली आहे असा माझा विश्वास आहे, पण तिची उपपत्ति आम्हांस लावतां येत नाही, ती उपपत्ति कोण कधी लावेल ते लावो' या दीक्षितांच्या वाक्यांनी भाऊजींच्या मनाची विलक्षण स्थिति झाली. आपण जर ही उपपत्ति लावूं शकलों नाही व तीवरून भारतीय युद्धाचा काळ जर आपण ठरवूं शकलों नाही तर आपलें ज्योतिषाचें ज्ञान व्यर्थ होय असें भाऊजींना वाटलें. ही भावनाच या ग्रंथाची प्रेरकशक्ति होय.

या विषयाचे दोन भाग पडतात. एक, युद्ध कोणत्या वर्षी आणि दुसरा, तें कोणत्या महिन्याच्या कोणत्या तिथीस झालें. हे दोन भाग स्वतंत्र नसून परस्परावलंबी आहेत व म्हणून त्यांचा स्वतंत्र विचार करतां येत नाही असे भाऊजी म्हणतात. भाऊजींनी आधी दुसरा प्रश्न सोडविला आणि ठरविलें की युद्ध कार्तिकाच्या अमावस्येस किंवा मार्गशीर्षांत सुरू झालें. या उत्तराच्या साह्याने ग्रहस्थितीवरून वर्ष नक्की ठरविलें आणि वर्ष नक्की ठरविल्यानंतर महिना व तिथि निश्चित केली.

'चंद्रादित्यावुभौ ग्रस्तौ एकाह्नहि त्रयोदशी' या भीष्मपर्वांतील (भी. प. ३–२८) किंवा 'सप्तमाच्चापि दिवसादमावास्या भविष्यति । संग्रामो युज्यतां तस्यां तामाहुः शक्रदेवतां ॥' [उ. प. १४३–१८] या उद्योगपर्वांतील वचनांत 'त्रयोदशी तिथीस एकाच वारीं चंद्र व सूर्य ह्या दोघांसहि ग्रहणें लागलीं व अमावस्येच्या दिवशीं भारतीय युद्ध सुरू झालें असें म्हटलें आहे. वरील वचनांतील एकाह्न या शब्दाचा सतत तीन महिने विचार करून भाऊजींनी त्याचा अर्थ एकाच वारीं, म्हणजे १४ दिवसांच्या अंतराने, असा लावला. कारण, एकाच दिवशीं दोन्ही ग्रहणें होऊं शकत नाहीत व अथर्वज्योतिषांत वार सांगितले आहेत म्हणून त्या काळीं वार माहीत असणें अशक्य नाही. तेव्हाच्या राहूचा किंवा ग्रहणाचा व सूक्ष्म गणिताचा विचार करून गणिताने येणाऱ्या कार्तिकाच्या अमावास्येस, परंतु वास्तविक मार्गशीर्ष शुद्ध द्वितीयेस, युद्ध सुरु झालें असें भाऊजींनी ठरविलें आहे.

महाभारतांतील ग्रहस्थितिनिदर्शक वचनांचा परस्परांशीं मेळ नाही. म्हणून भाऊजींनी त्या वचनांचे

महाभारतांतील ग्रहस्थिति

(संघ १ ला)	(संघ २ रा)
[भीष्मपर्व अ. १७ श्लो. २ या वचनाशीं संगत असलेलीं वचनें—]	[तदितर वचनें].
भीष्मपर्व, अ. ३, श्लो.–१२, १६, १७, १८, १९	[भीष्मपर्व अ. ३ श्लो.–१४, १५]
उद्योगपर्व, अ० १४३, श्लो.–८, ९	
शल्यपर्व, अ. ११, श्लो.–१७	
कर्णपर्व, अ. ९४, श्लो.–५१	

असे दोन संघ केले आहेत, एकाच पर्वांतील या परस्परविरुद्ध वचनांची संगति लावली आहे, व त्यावरून युद्धाचें वर्ष १६९५·३ होय असें सिद्ध केलें आहे.

ग्रहणविचारावरून व भारतोक्त ग्रहस्थितिवरून हा काळ ठरविल्यानंतर भाऊजींनी युद्धाचा दिवस ठरविला आहे, व त्यांनी ठरविलेल्या १६९५·३ शुद्ध द्वितीया भौमवार या तिथीशीं बुधाची स्थिति, शुक्राची वक्रता आणि घोर प्रज्वलितता, मंगळाचें श्रवणाकडे झालेलें वक्रानुवक्रत्व, पांडव वनवासाला गेल्यापासून ३६ वें वर्ष लागण्याच्या सुमारास झालेलीं द्वारकेचीं दोन ग्रहणें इत्यादि महाभारतांतील इतर वचनांचा तंतोतंत मेळ जुळवून दाखविला आहे.

ज्योतिषावरून येणाऱ्या या काळाशीं पुराणोक्त [भागवत स्कं. ९ अ. २२, ४५–४९, १२–१, २–३८; मत्स्यपुराण अ. २७२ श्लो. १७–३०, अ. २७२, १–३६; अ. २७३, १–१६; विष्णुपुराण अंश ४, अ. २३, १–३; अं. ४, अ. २४, १–१३; वायुपुराण अ. ९९, २९४–३५८; मत्स्यपुराण अ. २७३, ३५–३७ इ. इ.] कालहि जुळतो असें त्यांनी पुराणांतील प्रद्योतन, शैशुनाग, मौर्य, शुंग, काण्व व आंध्र या राजांच्या वंशावळीवरून दाखवून दिलें आहे. या सर्वांचा विचार करून ते म्हणतात,—'हा युद्धकाळ म्हणजे शकापूर्वी १२७५·३ वर्षें,–इसवी सनापूर्वी ११९७ वर्षें,–संवता पूर्वी ११४० वर्षें,–हा होय.'

'प्राप्तं कलियुगं विद्धि' या शल्यपर्वांतील (अ. ६०, श्लो. २५) किंवा 'एतत्कलियुगं नाम अचिराद्यत्प्रवर्तते' या वनपर्वांतील (अ. १४९, श्लो. ३८) वचनांवरून भारतीय युद्ध कलियुगाच्या आरंभाच्या सुमारास झालें असें ठरतें. त्यावरून कै. चिं. वि. वैद्य प्रभृति सनातनी पंडित, शकपूर्वी ३१७९ वर्षें कलियुग सुरू झालें या समजुतीनुसार, श. पू. ३१८० हा भारतीय युद्धाचा काल मानीत. भाऊजींना, अर्थातच, हें मत मान्य नाही. 'भारतांतील ग्रहस्थिति व पुराणांतील वंशावळी या प्रमाणांवरून कलियुगच शकापूर्वी १२७५ वर्षांनी सुरू झालें व कलियुगारंभाची जुनी समजूत चुकीची आहे' असें भाऊजी म्हणतात. या कालनिर्णयानें 'हरिवंशा'त सांगितलेल्या सर्व ग्रहणांची देखील उपपत्ति भाऊजींनी लावून दाखविली आहे.

इ. स. १९१३ त लिहिलेला प्रस्तुत प्रबंध १९१८ सालीं 'विविधज्ञानविस्तारा'त प्रसिद्ध झाला. या प्रबंधांत प्रगट झालेलें भाऊजींचें ज्योतिषाचें सूक्ष्म ज्ञान पाहून कै. श्री. कृ. कोल्हटकर इतके कांही हर्षविस्मित झाले, की त्याच वर्षी मुद्दाम नागपुरास येऊन त्यांनी महाराष्ट्राला अपरिचित असलेल्या या पंडिताची भेट घेतली. भाऊजींच्या प्रगाढ विद्वत्तेबद्दल व नाविन्यपूर्ण व प्रत्ययोत्पादक विचारसरणीबद्दल त्यांचें अभिनंदन केलें व 'भारतीयज्योतिःशास्त्रनिरीक्षण' हा जो दुसरा प्रबंध त्यांच्याजवळ लिहून तयार होता, तो त्यांना वाचावयाला मागीतला.

लो. टिळकांचेंहि लक्ष भाऊजींकडे त्यांच्या या प्रबंधानेंच वेधलें गेलें. टिळकांनी भाऊजींचा हा निबंध हस्तलिखित स्वरूपांतच वाचला होता. त्यांनी ठरविलेला भारती युद्धाचा काल टिळकांना मान्य होऊन शिवाय त्यांतील विवेचनहि इतकें नाविन्यपूर्ण वाटलें की ता. १ सप्टेंबर १९१५ रोजीं कै. डॉ. मुंजे यांना पाठविलेल्या पत्रांत ते लिहितात—

"I have read and re-read Mr. Daftari's Mss essay. The conclusion is in my opinion sound....He has, no doubt, worked for himself and his essay contains some entirely new

suggestions. Will he not translate it into English ? I should advise him to do so and publish in some Oriental journal..."

'वैदिक कालगणना पद्धति व श्रीरामचंद्र जन्मकालनिर्णय'

(प्रकाशन : इ. स. १९२५)

भाऊजींनी ज्योतिर्गणिताने ठरविलेला भारतीय युद्धाचा काळ (श. पू. १२७५) व 'भारतीय युद्ध कलियुगारंभीं झालें' या महाभारतांतल्या वचनावरून निष्पन्न होणारा काळ (श. पू. ३१८०) यांत फरक पडल्यामुळे भाऊजींनी वायुपुराणाचा व प्राचीन युगपद्धतीचा फारच सूक्ष्म अभ्यास केला. या प्रदीर्घ अभ्यासांतूनच त्यांनी 'वैदिक कालगणनापद्धति' व 'श्री दाशरथी रामचंद्राचा खरा जन्मकाळ' हे दोनहि शोधून काढले.

वायुपुराणादि प्राचीन इतिहासग्रंथांवरून व धर्मग्रंथांवरून भाऊजींनी प्रस्तुत प्रबंधांत असा सिद्धांत मांडला आहे की, वैदिक कालीं दैवी व मानुषी अशा दोन युगपद्धति अस्तित्वांत होत्या. (ऋग्वेद, मं. १०, सू. ७२, महाभारत, सौ. अ. १८; ऋग्वेद मं. १, सू. १०३, ऋग्वेद, मं. ५, सू. ५२.)

सर्व पुराणांच्या मतें कलियुगाच्या दुप्पट द्वापार, तिप्पट त्रेता व चौपट कृत आहे. द्वापार, त्रेता, कृत या शब्दांचे जे अर्थ होतात त्यावरूनहि हेंच सिद्ध होतें. दैवी युगपद्धतींत ४००० वर्षांचें कृतयुग ३००० वर्षांचें त्रेतायुग, २००० वर्षांचें द्वापार व १००० वर्षांचें कलियुग मानीत. हें दैवी द्वापारच शकपूर्व ३१८० मध्ये सुरू झालें. मानुषी युगपद्धतींत ४०० वर्षांचें कृतयुग, ३०० वर्षांचें त्रेता, २०० वर्षांचें द्वापार आणि १०० वर्षांचें कलियुग मानीत. मानुषी युगपद्धतीच्या कृतयुगाचा आरंभ शकपूर्व ३१८० हाच होता. अर्थात, मानुषी कृतयुगाच्या आरंभींच भारतीय युद्ध झालें.

वैदिक कालगणनापद्धतींत साधारण संवत्सर ३६० दिवसांचें व चवथें वर्ष ३८१ दिवसांचें घेत. वेदांग ज्योतिषांत ५ वर्षांचें युग मानलें आहे. त्याच्या पूर्वी तैत्तिरीय ब्राह्मणांत सांगितलेली (१-४-१०) चार वर्षांचीच युगपद्धति अस्तित्वांत असावी. चार वर्षांचें युग मानलें तर वायु पुराणांतील (अ. ९८, श्लो.- ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३) या वचनांची संगति फार उत्तम लागते व परशुराम व श्रीराम यांच्या जन्मामध्ये सुमारे २० वर्षांचें अंतर येतें. अशा चार वर्षांच्या म्हणजे १४६१ दिवसांच्या काळाला भाऊजींनी 'अल्पयुग' असें म्हटलें आहे. प्रत्येक युगाच्या शेवटीं 'अश्वमेध' नांवाचा यज्ञ करीत. प्रत्येक तीन वर्षांनंतर चवथ्या वर्षी २१ दिवस जास्त येत असत. त्या २१ दिवसांचें प्रतीक अश्वमेधांतील २१ यूप होत.

१००० वर्षांनंतर एक द्वादश वार्षिक यज्ञ करीत. भारतीय युद्धापूर्वी निदान ८ वर्षे अगोदर कलियुग सुरू झालें म्हणजे भारतीय युद्धापूर्वी सुमारे चार वर्षे कलियुग सुरू झालें. (पुराणांतील काळ दुपटीनें सांगितले आहेत.) भारतीय युद्धापूर्वी द्वादश वार्षिक यज्ञ एकदा झाला होता. अर्थात् ही युगपद्धति युद्धापूर्वी सुमारें १०००+४००+३००+२००+४ = १९०४ वर्षे सुरू झाली असावी. युद्धाचा काळ भाऊजींनी श. पू. १२७५·३ हा ठरविला आहे. ज्याला कलिकाळ म्हणतात तो सकारंभी ३१८० वर्षे झाला होता. त्यांतून १२७५·३ वर्षे वजा केल्यास १९०४·७ येतात. यावरून ज्याला कल्पादि काळ म्हणतात तो वास्तविक या युगपद्धतीच्या आरंभाचा काळ असावा, असें भाऊजींचें मत आहे. ही कालगणनापद्धति भारतीय युद्धानंतर निदान ९२ कलि व ३८० कृत म्हणजे ४७२ वर्षेपर्यंत चालली होती.

या चार वर्षांच्या काळालाच चतुर्युग, कल्प, मन्वंतर असेंहि म्हणत असत.

सनातनी पंडित श. पू. ३१८० या कालीं दैवी कलियुग सुरू झालें असें मानतात. भाऊजींच्या मतें श. पू. ३१८० मध्ये दैवी द्वापर सुरू झालें. ज्योतिष-कलि देखील श. पू. ३१८० मध्येच सुरू झाला. शकपूर्व ३१८० हा काल फार महत्त्वाचा आहे. त्या कालीं सर्व ग्रह अश्विनी नक्षत्राच्या आरंभीं एकत्र झाले होते. या

काळापासून व या आरंभकाळापासूनच भारतीय ज्योतिषी आपलीं सर्व गणितें करीत. अर्थात, ज्योतिष-कलीहि शकपूर्व ३१८० मध्येच सुरू झाला.

ज्योतिषांत ग्रहगति सांगतांना आणि तत्वज्ञानांत जगदुत्पत्तिलयाचा काळ सांगतांना दैवी युगपद्धतीचा उपयोग करीत असत. कारण तेव्हा फार मोठा काळ सांगावयाचा असे. पण इतिहास सांगतांना एवढ्या मोठ्या युगाचा उपयोग केल्यास कांहीच अर्थबोध व्हावयाचा नाही. उदाहरणार्थ, राम त्रेतायुगांत झाले असें दैवी पद्धतीने म्हटलें तर १२,९६,००० वर्षा-एवढ्या काळांत केव्हा तरी झाले असा अत्यंत अनिश्चित अर्थ करावा लागेल. किंवा रामानें ४० वर्षे राज्य केलें असें दैवी युगपद्धतीने सांगतांच यावयाचें नाही. म्हणून पुराणग्रंथांत इतिहास सांगतांना मानुषी युगपद्धतीचाच उपयोग केला आहे.

'चतुर्विंशे त्रेतायां' या वायुपुराणांतील वचनां-वरून श्रीरामाचा जन्म त्रेतायुगांतील २४ व्या युगांत झाला. म्हणजे मानुषी कृतयुगाचा एक फेरा (४००+ ३००+२००+१००=) १००० वर्षे+कृतयुग (४०० वर्षे)+४ वर्षांचा एकेक अशीं २३ युगें (९२ वर्षे)+१ वर्ष=१४९३. म्हणजे श्रीरामाचा जन्म कृतयुग सुरू झाल्यानंतर १४९३ या वर्षी किंवा (३१८०−१४९३=१६८७) शकपूर्व १६८७ या काळीं झाला हें सिद्ध होतें. या काळाशीं रामायणांत सांगितलेली सर्व ग्रहस्थिति उत्तम जुळते.

भाऊजींचा प्रस्तुत प्रबंध बडोद्याच्या 'सहविचार' मासिकांत १९२५ सालीं प्रसिद्ध झाला. या निबंधाच्या उपसंहारांत भाऊजी म्हणतात—"मानुष पद्धतीने सांगितलेल्या इतिहासास दैवी पद्धति लाविल्यामुळे त्या इतिहासास फार वेडगळ रूप आलें आहे. त्यामुळे पुराणें सर्व भाकड कथा असा समज झालेला आहे. या आपत्तीमधून पुराणांस सोडवावयाचें असल्यास त्यास आम्ही सिद्ध केलेली मानुषी युगपद्धति लाविली पाहिजे आणि असें केल्यास भारतीयांचा फार सुसंगत असा इतिहास पुराणांतून विशेषतः वायुपुराणांतून उपलब्ध होतो."

'भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षण'

[लेखन : इ. स. १९१८, प्रकाशन इ. स. १९२९]

वसिष्ठाने शीघ्रफलप्रमेयाचा सिद्धांत सांगून भारतांतल्याच नव्हे, तर जगांतल्याहि ज्योतिःशास्त्राचा पाया घातला. त्यानंतरच्या अग्निपुराणांत देखील चंद्रसूर्यस्पष्टीकरण सांगणाऱ्या वसिष्ठसिद्धांताचा उल्लेख आढळतो. ग्रीकांच्या ज्योतिःशास्त्राचें प्रवर्तन इजिप्तमध्ये त्यावेळीं नुकतें कुठे सुरू झालें होतें.

असें असूनहि, भारतीयांनी आपलें ज्योतिःशास्त्र इतरांकडून उसनें घेतलें असा अनेक पाश्चात्य ग्रंथ-कारांनी त्यांच्यावर आरोप केला होता. या आरोपाचें निरसन करण्याकरिताच मुख्यतः, त्या वेळचे अग्रगण्य ज्योतिर्विद कै. शं. बा. दीक्षित यांनी 'भारतीय ज्योतिः शास्त्र' नांवाचा इतिहासात्मक बृहद्ग्रंथ इ. स. १८९६ मध्ये प्रसिद्ध केला, कै. दीक्षितांनी हा ग्रंथ अत्यंत परिश्रमपूर्वक व उपलब्ध असलेल्या सर्व साधनांच्या साह्याने लिहिला आहे.

अशा अवाढव्य ग्रंथांत अनेक उणीवा व चुका राहणें अपरिहार्य होतें व त्यांचें स्पष्ट आविष्करण होणेंहि जरूर होतें. तेंच कार्य भाऊजींच्या प्रस्तुत प्रबंधाने केलें आहे.

ग्रहांच्या वास्तविक गति ठरविण्याकरिता भार-तीय ज्योतिःशास्त्राचें कै. दीक्षितांनी केलें त्यापेक्षा अधिक सूक्ष्म निरीक्षण करणें अवश्य होतें. भारतीय ज्योतिषाचा संबंध वायुपुराणादि धर्मग्रंथांशीं व वेदांग-ज्योतिषाशीं म्हणजे वेदांशीं पोचत असल्यामुळे प्राचीन भारतीय धर्मशास्त्राचें सूक्ष्म ज्ञान असणेंहि अवश्य होतें. शिवाय, भारतीयांनी ज्योतिःशास्त्र ग्रीकांपासून घेतलें की काय या प्रश्नाचा समाधानकारक निर्णय करण्यासाठीहि जुन्या सिद्धांताचें निरीक्षण फारच सूक्ष्म-पणाने करणें जरूर होतें.

प्रस्तुत प्रबंध लिहावयाला आणखीहि एक कारण घडलें, तें असें—

१९०५ च्या मुंबई येथील सर्वभारतीय ज्योतिष-परिषदेने 'करणग्रंथ' करणारास १००० रुपयांचें बक्षिस लावलें होतें. भाऊजींच्या मनांत आपण हा ग्रंथ

करावा असें आलें. पण, 'वर्षमान सूर्यसिद्धान्ताचेंच घ्यावें' हा त्या परिषदेने घातलेला निबंध ग्राह्य की अग्राह्य हें त्यांना ठरवावयाचें होतें. त्याकरिता घ्यावयाचीं ग्रहगतीचीं मानें भारतीय ग्रंथांतून घ्यावीं की पाश्चात्य ग्रंथांतून घ्यावीं असा त्यांना प्रश्न पडला. पाश्चात्य ग्रंथांतलीं मानें घेतल्यास प्राचीन भारतीयांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या शोधांचा त्याग करावा लागेल व भारतीय ग्रंथांतून घेतल्यास पाश्चात्यांनी लावलेल्या शोधांचा फायदा घेतां येणार नाही. अशा द्विधा मनःस्थितींत या दोघांच्याहि मानांचा समन्वय करतां येणार नाही का ? असा विचार त्यांच्या मनांत आला. आणि त्याचेंच फळ म्हणजे प्रस्तुत प्रबंध होय.

प्रस्तुत प्रबंधांत, प्राचीन भारतीय ज्योतिषी वेध किती सूक्ष्म घेत, पण अनुमानें कशीं चुकीचीं काढत हें भाऊजींनी फार सुंदर रीतीने दाखविलें आहे. 'यस्मिन् वृत्ते भ्रमति खचरो नास्य मध्यः कुमध्ये' म्हणजे 'ग्रह वर्तुलांत वर्तुलमध्याभोवती मध्यमगतीने फिरतो पण पाहणारा त्या वर्तुलाच्या मध्यांत नसतो' हा भारतीयांचा ग्रहगतिसिद्धांत कसा चुकीचा आहे व तरीहि त्यांचीं परममंदफलें व उच्चें वास्तविकाशीं कां, कितपत व कोणत्या परिस्थितींत जुळतात हें त्यांनी अत्यंत मार्मिकपणाने उलगडून दाखविलें आहे. या ग्रंथाच्या उत्तरार्धांत 'मूळवसिष्ठसिद्धांत' 'अग्निपुराणोक्त सिद्धांत', 'रोमकसिद्धांत' इत्यादि सिद्धान्तांचा व लल्लादि ज्योतिर्गणितज्ञांचा कालनिर्णयहि भाऊजींनी केला आहे.

प्रस्तुत प्रबंधाला कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी, कुठल्याहि ग्रंथाला प्रस्तावना लिहावयाची नाही असा निश्चय केल्यावर व डोळ्यांना अंधत्व आल्यावरहि अत्यंत विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. आपल्या प्रस्तावनेच्या शेवटीं कोल्हटकर म्हणतात—

> "प्रस्तुत निबंध प्रथम इंग्रजींत प्रसिद्ध झाला असता तर त्याचें योग्य चीज झालें असतें. तो मराठींत प्रसिद्ध झाल्याने त्याचें तसें चीज झालें नाही तरी त्याने मराठी वाङ्मयांत एका असामान्य पुस्तकाची भर पडून त्या वाङ्मयाचें महत्त्व निःसंशय वाढणार आहे, असेंच प्रत्येक मार्मिक वाचकास वाटेल."

लो. टिळकांनी प्रस्तुत प्रबंध तात्यासाहेब कोल्हटकरांकडून मुद्दाम मागवून वाचला होता. तो वाचून लो. टिळक इतके हर्षविस्मित झाले होते की, १९२० सालीं सांगली येथे कोल्हटकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ज्योतिषसंमेलनांत ज्यावरून शुद्ध पंचांगाचें गणित थोड्या श्रमांत सूक्ष्मपणाने करतां येईल असा करणग्रंथ तयार करण्याचा ठराव झाला, व जेव्हा त्यावेळचे अग्रगण्य ज्योतिर्विद कै. व्यं. बा. केतकर यांनी रैवतपक्षाच्या मतानुसार नवा करणग्रंथ लिहून देण्याचें नाकारलें, तेव्हा लोकमान्यांनी भाऊजींना १९–६–१९२० रोजीं तारेने पुण्यास बोलावून करणग्रंथरचनेची बिकट कामगिरी त्यांचेवर सोपविली व त्याकरिता ठरलेलें १००० रु. चें बक्षिसहि पंचांगप्रवर्तन कमिटीनें त्यांना दिलें.

पण, १९१८ मध्ये लिहून तयार असलेला प्रस्तुत प्रबंध प्रसिद्ध होण्याचा योग मात्र टिळकांच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांनी आला. नागपूर ॲकेडेमीने प्रस्तुत ग्रंथाला १५० रु. चें बक्षिस देऊन त्याचा गौरव केला होता.

'करणकल्पलता'

[लेखन : इ. स. १९२०,
प्रकाशन : इ. स. १९२५.]

लो. टिळकांच्या मनांत शुद्ध पंचांग प्रचलित करण्याविषयी फार कळकळ होती व त्याकरिता मंडालेहून परत आल्यावर त्यांनी पुण्याला एक व सांगलीला एक अशीं दोन ज्योतिषसंमेलने भरविलीं. सांगलीच्या संमेलनांत ज्यावरून शुद्ध पंचांगाचें गणित थोड्या श्रमांत सूक्ष्मपणाने करतां येईल असा 'करणग्रंथ' तयार करविण्याचें ठरलें. व त्याप्रमाणे ता. १२–६–२० च्या 'केसरी'त 'करणग्रंथ असा असावा की त्यावरून पंचांगाचें सर्व गणित सुलभ व्हावें व त्याप्रमाणे वर्तविलेली ग्रहस्थिति दृक्तुल्य असून सायनपद्धतीची असावी' अशी जाहिरातहि दिली गेली. अशा प्रकारचा ग्रंथ

अनुक्रमणिका

तयार करून देणारास १००० रुपयांचें बक्षिसहि होतें. ता. १९-६-२० च्या रात्रीं लो. टिळकांची तार आल्यामुळे भाऊजी करणग्रंथाची वाटाघाट करण्यासाठी पुण्याला गेले व लो. टिळकांशीं विचारविनिमय करून त्यांनी ह्या ग्रंथ तयार करण्याचें काम स्वीकारलें.

'भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षणां'त भारतीय व पाश्चात्य ज्योतिःशास्त्रांतील सिद्धान्तांचा भाऊजींनी जो समन्वय केला, त्याप्रमाणे शुद्ध पंचांगाचें गणित करण्याच्या नव्या रीति, दोन तीन कोष्टकगणकांच्या व अनेक कोष्टकांच्या साह्याने भाऊजींनी ह्यांत शोधून काढल्या आहेत. सूर्यग्रहण गणितांत परमग्रास व परमग्रासकाळ काढण्याची फार सूक्ष्म रीति यांत दिली असून महापाताचें गणितहि दोर्ज्यागुणांक कोष्टकाच्या साह्याने यांत फार सूक्ष्म केलें आहे. ह्या रीतीवरून येणारे ग्रह व नाटिकल अल्मॅनॅकचे ग्रह यांत १-२ कलापेक्षा जास्त अंतर नाही.

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनी, १० जानेवारी १९२५ रोजीं, प्रसिद्ध झालेल्या प्रस्तुत ग्रंथानेच भाऊजींनी भारतीय कीर्ति मिळण्याचा योग आला.

करणकल्पलता (उत्तरार्ध)

[लेखन : इ. स. १९२५, अप्रकाशित]

'करणकल्पलते'च्या या अप्रकाशित उत्तरार्धांत उच्च प्रकारच्या ज्योतिर्गणिताचें भाऊजींनी विवेचन केलें आहे. छायागणित, चंद्रशृंगोन्नति, बुधशुक्रकृतसूर्याक्रमण इत्यादि विषयांचा यांत विचार असून सकलभूमंडलासंबंधी सूर्यग्रहणाचें गणित, स्पष्ट ग्रहावरून मध्यमग्रह व त्याचा काळ काढण्याचें गणित, वेधांवरून मंदोच्चादि काढण्याचें गणित, मंदकर्णाशिवाय सूक्ष्म ग्रहस्पष्टीकरण इत्यादि प्रकरणें यांत आहेत.

'पंचांगचंद्रिका'

[प्रकाशन : इ. स. १९३१]

"तिथिचिंतामणीं'तील गणितापेक्षा ह्या ग्रंथांतील तिथि, नक्षत्रें व योगांचें गणित अनभ्यस्तास थोडेसें कठिण वाटेल हें खरें. तथापि, ह्या ग्रंथांत जितकी सूक्ष्मता साधली आहे, तिच्या दृष्टीने तें फारच सोपें आहे" असे उद्गार भाऊजींनी 'करणकल्पलते' च्या प्रस्तावनेंत काढले आहेत. तरीहि 'करणकल्पलतें'तील पंचांगगणित बरेंच श्रमदायक असल्यामुळें तीवरून पंचांगाचें गणित करण्याचा गणकास कंटाळाच येत असे, व त्यामुळे शुद्ध पंचांगाच्या प्रसारास अडचण येत होती. ती दूर करून तिथिनक्षत्रयोगांच्या गणितांत सोपेपणा आणण्याकरिता भाऊजींनी १९३१ मध्यें प्रस्तुत प्रबंध लिहून प्रसिद्ध केला.

ह्या ग्रंथांत भाऊजींनी एक नवीन समीकरण तयार केलें. त्यामुळे केरोपंतांच्या पंचांगसाधन कोष्टकापेक्षा किंवा ज्योतिर्विद् केतकरांच्या वैजयंतीपेक्षादेखील ह्यांत अधिक सूक्ष्मता आली आहे. प्रस्तुत ग्रंथांत गणेशदैवज्ञाच्या तिथिचिंतामणीप्रमाणे अनेक कोष्टकांचा अवलंब केला असून त्यामुळे स्पष्ट चंद्रसूर्य काढल्याशिवाय एकदम स्पष्ट तिथ्यन्तकाळहि अत्यंत सूक्ष्मतेनें काढतां येतो.

'गणेशदैवज्ञांना चंद्राचा फक्त एकच (मंदफल) संस्कार माहित होता. त्यामुळे त्यांना गणित फार सोपें करतां आलें. तथापि त्याने फक्त पौर्णिमा व अमावास्या ह्या दोनच तिथि आकाशांतील स्थितीशीं जुळतात, म्हणून आज माहीत झालेले चंद्राचे बहुतेक सर्व संस्कार चंद्रास देऊन त्यावरूनच पंचांगगणित केलें पाहिजे, आणि असें केल्यास पंचांगगणित तिथिचिंतामणींतील गणिताइतकें सोपें होणें अशक्य आहे. आणि म्हणूनच ह्या ग्रंथांत सूक्ष्मतेस न सोडतां, गणित शक्य तितकें सोपें केलें आहे.' 'उपसंहारां'त भाऊजी पुढे म्हणतात—

> "गुरुवर्य आपटे (उज्जयिनी) ह्यांचा 'पंचांगचिंतामणि' लवकरच प्रसिद्ध होणार आहे. त्यांतील गणित जर सूक्ष्म असूनहि जास्त सोपें असेल तर गणकांनी त्याचाच स्वीकार करावा, नाहीतर पंचांगचंद्रिकेचाच स्वीकार करावा."

(अपूर्ण)

अभिप्राय

राष्ट्रधन (लघु उद्योग अंक)

[संपादक—द्वारकाप्रसाद शर्मा, २६ जानेवारी १९५६, सातवा अंक. प्रकाशक–प्राचार्य मि. रा. तोखी, कॉमर्स कॉलेज, नागपूर. पृष्ठें २००.]

येथील गो. से. अर्थ–वाणिज्य महाविद्यालयाच्या 'राष्ट्रघन' या वार्षिकाचा यंदाचा अंक 'लघु उद्योग' अंक म्हणून प्रकाशित झालेला आहे. ग्रामोद्योग आणि शहरी छोटे उद्योग यांची सांगोपांग चर्चा त्यांत विद्यार्थ्यांनी व्यासंगपूर्ण अधिकाराने केलेली आहे. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेची नाडी ज्यांनी ओळखली आहे त्यांना ग्रामोद्योगांचें महत्त्व वेगळयाने सांगण्याची गरज नाही. आर्थिक पुनरुत्थानाचा द्वितीय सोपान चढत असतांना तर ग्रामोद्योगांवर, बेकारीचा इलाज म्हणून, दृष्टि केन्द्रित करणें अपरिहार्य आहे. ही निवड लक्षांत घेऊन उद्या ज्यांच्यावर देशाच्या आर्थिक जबाबदारीची धुरा प्रामुख्याने पडणार आहे, अशा वाणिज्याच्या विद्यार्थ्यांनी हा लघु–उद्योग अंक काढावा व त्यांत निर्भीडपणे आपले विचार मांडावे, हें स्तुत्य नाही असें कोण म्हणेल ? आजकाल विद्यार्थ्यांची अध्ययनशीलता आणि सखोल अन्वेषणाची वृत्ति यांचा लोप होत आहे असा आक्षेप घेण्यांत येतो. पण 'राष्ट्रघना'कडे पाहिल्यानंतर हें म्हणणें खरें वाटत नाही कारण यांतील उदाहरणादाखल एकहि लेख असा दाखवितां येणार नाही की ज्यांत विद्यार्थ्यांच्या वाचनाचें, मननाचें किंवा उद्यमशीलतेचें प्रतिबिंब पडलें नसेल. प्रत्येक लेख आकडेवारीने परिपूर्ण आणि मांडणीने तर्कशुद्ध आहे. त्यांत ग्रामोद्योगविषयक अर्थ-प्रश्नांच्या विभिन्न पैलूंचें कठोर पृथक्करण आहे आणि पुढील विकासाचें यथोचित मार्गदर्शनहि आहे.

या अंकाचे हिन्दी, मराठी व इंग्रजी हे तीन विभाग असून त्यांपैकी सरस कोणता हें सांगणें कठीण आहे. हिंदी विभागांतील 'जपानी अर्थव्यवस्था का प्राणस्थल', 'ग्रामोद्योगों को आवाहन तथा आव्हान !' 'अंबर चर्खा' 'चंदेरी जरी उद्योग' हे लेख विशेष उल्लेखनीय आहेत. मराठी विभागांतील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला लेख म्हणजे प्रा. चरडे यांचा 'प्राचीन भारतांतील ग्रामोद्योग' हा होय. श्री नांदुर्डीकर यांच्या 'नागपूर शहरांतील लघुप्रमाण उद्योग' या लेखावरून विद्यार्थ्यांच्या चिकित्सक आणि अन्वेषणात्मक बुद्धीचें कौतुक केल्याशिवाय राहवत नाही. त्याशिवाय गांधीवादी अर्थरचनेंत ग्रामोद्योगांचें स्थान, कुटीर उद्योगांसाठी परदेशी बाजार, नारळी दोराचा उद्योग हे लेखहि छान आहेत. प्रा. चोरघडे यांचा ग्रामोद्योगावरील निबंध मौलिक आहे. मराठी विभागांत फाऊन्टन पेन, खांडसरी साखर, कुटीर उद्योगाद्वारें रोजगार, बूट पॉलिश, ब्रश, खिळे, कांचेचे मणी इत्यादि लहान उद्योगांबाबत दिलेली आकडेवारी मोठी उद्बोधक आहे. इंग्रजी विभागांतील बहुतेक सर्व लेख एम्. कॉम्. च्या विद्यार्थ्यांचे असून अभ्यासपूर्वक लिहिलेले आहेत.

चांगली छपाई करून मासिकाचा दर्जा खचित वाढल्यामुळे मांडणी सर्वत्र फार आकर्षक वाटते. वाचनालयें आणि अर्थशास्त्राचे विद्यार्थी यांसाठी संदर्भ वाङ्मय म्हणून संग्राह्य असलेला असा हा 'लघु उद्योग विशेषांक' काढल्याबद्दल संपादक श्री शर्मा व त्यांचे सर्व सहकारी अभिनंदनास पात्र आहेत, परंतु यशाचें श्रेय मात्र प्राचार्य तोखी आणि प्राध्यापकांच्या विधायक मार्गदर्शनालाच द्यावें लागेल.

दि. ब. पं.

सं घ वा र्ता

ल. वा. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

विशेष साधारण सभा

विदर्भ साहित्य संघाच्या, रविवार दिनांक १८-१२-१९५५ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने दिलेल्या आदेशानुसार, घटना समितीने सुचविलेल्या घटना दुरुस्तीच्या ठरावावर विचार करण्यासाठी, घटना नियम १० आणि २२ अनुसार रविवार दिनांक २९-१-१९५६ रोजीं दुपारीं दोन वाजतां, संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष साधारण सभा, विदर्भ साहित्य मंदिराच्या गडकरी सभागृहांत भरली होती.

अध्यक्षांनी दिलेल्या आदेशानुसार घटना समितीचे सभासद श्री. ख. के. रांगोळे यांनी दुरुस्तीचीं कलमें क्रमवार वाचून सभेपुढे ठेवलीं. त्यावर साधकबाधक चर्चा झाली. ह्या सभेंत मंजूर झालेल्या संशोधनांसह पुढीलप्रमाणे घटना मान्य करण्यांत आलीः—

विदर्भ साहित्य संघाची घटना

(दिनांक २९ जानेवारी १९५६ च्या विशेष साधारण सभेंत मान्य झालेली)

१ नांवः—विदर्भ साहित्य संघ.

२ कार्यक्षेत्रः--विदर्भ साहित्य संघाचें कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणें मध्यप्रदेश हें राहील.

३ उद्देशः—(अ) मराठी भाषा आणि साहित्य यांच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करणें.

(आ) जनतेची साहित्य-विषयक सदभिरुचि व साहित्याचें रसग्रहण करण्याची शक्ति, यांचा विकास घडवून आणण्यास सहाय्यभूत होणें.

४ साधनेंः—वरील उद्देश साध्य होण्याकरिता पुढे निर्देशिलेल्या व इतर अवश्य आणि योग्य वाटतील त्या साधनांचा उपयोग करणें:—

(अ) दरवर्षी विदर्भ साहित्य संघाचें संमेलन भरविणें व शाखा-संमेलनें भरविण्यास प्रोत्साहन देणें.

(आ) मध्यप्रदेशांत ठिकठिकाणीं संघाच्या शाखा स्थापन करणें आणि स्वतंत्र रीतीनें कार्य करणाऱ्या साहित्यसंस्था आणि निर्माणक्षम कलांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्था यांना संलग्न करून घेणें.

(इ) मराठी आणि अन्य भाषांच्या साहित्य-संस्थांशीं आणि साहित्य-विषयक व कलाविषयक चळवळींशीं अवश्य व शक्य असेल तेथे सहकार्य करणें.

(ई) साहित्य, व्याकरण, कोश, इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, कला, इत्यादि विषयांवरील ग्रंथ लिहवून घेणें, प्रसिद्ध करणें, ग्रंथांचा पुरस्कार करणें व अशा प्रकारच्या कार्यास द्रव्यद्वारा अथवा अन्य रीतीने साहाय्य करणें.

(उ) ज्ञानाचीं सर्व साधनें मराठी भाषिकांना सुलभ करून देण्याकरिता चर्चा, उत्सव, प्रदर्शन, नाट्यप्रयोग आदि प्रसंग घडवून आणणें; नियतकालिक चालविणें, ग्रंथालयें स्थापन करणें, संशोधनास मदत व उत्तेजन देणें, मराठी व अन्य भाषा शिकविण्याचे वर्ग चालविणें व परीक्षा घेणें, पाठ्यपुस्तकें लिहवून घेणें व प्रसिद्ध करणें; प्राचीन ग्रंथ, चित्रें, हस्तलिखितें, ताम्रपट, नाणीं, मूर्ति इत्यादींचा संग्रह करणें.

(ऊ) मराठी भाषेसाठी शास्त्रीय विषयाची परिभाषा व पारिभाषिक कोश तयार करणें आणि अशा प्रयत्नांत सहकार्य करणें.

(ए) प्राचीन व अर्वाचीन मराठी व अन्य भाषांतील नामवंत लेखक, ग्रंथकार व कलावंत यांचीं चरित्रें, त्यांचें साहित्य आणि कला यांची माहिती मराठी वाचकांस उपलब्ध करून देणें.

(ऐ) प्रादेशिक लोकभाषांचें संशोधन करून त्यांच्याविषयीच्या ग्रंथांच्या प्रसिद्धीस साहाय्य करणें.

(ओ) मराठी भाषा आणि साहित्य यांच्या विकासाच्या आणि प्रसाराच्या मार्गांतील अडचणी दूर करण्यासाठी अवश्य ती उपाययोजना करणें, तसेंच मराठी भाषा बोलणाऱ्या बहुजनसमाजांत अशा प्रश्नांविषयी जागृति करणें.

(औ) संघासाठी कार्यालय, सभागृह इत्यादि इमारती उभारणें.

(अं) सामान्यतः संघाचे उद्देश साध्य होण्यासाठी अवश्य वाटतील त्या सर्व गोष्टी करणें.

५ **वर्षगणनाः**—संघाचें वर्ष दिनांक १ एप्रिल ते दिनांक ३१ मार्चपर्यंत गणलें जाईल.

६ **कार्यालयः**—संघाचें केंद्रीय कार्यालय नागपूर येथे राहील.

७ **सभासदांचे वर्गः**—संघाच्या सभासदांचे वर्ग पुढील प्रकारचे राहतील—

(अ) **उपकर्तेः**—संघास पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे,

(आ) **आश्रयदातेः**—संघास एक हजार किंवा अधिक रुपये देणारे,

(इ) **साहाय्यकः**—संघास पांचशे किंवा अधिक रुपये देणारे,

(ई) **हितचिंतकः**—संघास अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे,

वरील (अ) ते (ई) वर्गाच्या सभासदांना आपली रकम देतांना ती विशेष कार्यासाठी नमूद करून देतां येईल, पण अशा रकमेंतून आजीव सभासदत्वाची वर्गणी रु. ५० वगळण्यांत येईल.

(उ) **आजीव सभासदः**—संघाला पन्नास किंवा अधिक रुपये देणारे,

(ऊ) **साधारण सभासदः**—संघास वार्षिक तीन रुपये वर्गणी देणारे,

(ए) **प्रतिनिधि सभासदः**—नियमाप्रमाणे संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधि,

(ऐ) **सन्मान्य सभासदः**—मराठी भाषेची विशेष सेवा अथवा विद्वत्ता या गुणांसाठी कोणाहि व्यक्तीस संघाचे सन्मान्य सभासद करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील,

अनुक्रमणिका

८ सभासदत्वः—

(१) वयाचीं २१ वर्षें पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी भाषा-प्रेमी व्यक्तीस संघाचे उद्देश, घटना व नियम मान्य करून ठरविलेल्या नमुन्यावर स्वाक्षरी केली म्हणजे तीस सभासद होतां येईल.

(२) सभासद होऊं इच्छिणाऱ्या व्यक्तीने कार्यकारी मंडळाने निर्दिष्ट केलेल्या पत्रावर स्वतः सही करून ओवदनपत्र करून दिलें पाहिजे. त्या आवेदनपत्रावर संघाच्या मतदानाला पात्र अशा सभासदाची प्रस्तावक म्हणून व दुसऱ्या तशाच सभासदाची अनुमोदक म्हणून सही असली पाहिजे. आवेदनासह नियमानुसार त्या विशिष्ट सभासदत्वाची वर्गणी पाठविली पाहिजे. आवेदनपत्र आणि वर्गणी संघाचे केंद्रीय कार्यालयांत दिली पाहिजे व त्याची पोंच कार्यालयाने दिली पाहिजे.

(३) सभासदत्वासाठी आपलीं सर्व आवेदनपत्रें सरचिटणिसाने कार्यकारी मंडळाच्या त्यानंतर होणाऱ्या पुढल्या सभेंत प्रस्तुत केलीं पाहिजेत. आवेदनपत्राला कार्यकारी मंडळाची मंजुरी दिली गेल्यानंतर आवेदनपत्र ज्या तारखेस दिलें गेलें असेल त्या तारखेपासून व पुढील नियमांप्रमाणे सभासदत्व रद्द होईपावेतों ती व्यक्ति सभासद मानली जाईल.

(४) सभासदास आपल्या सहीनिशीं पत्र लिहून सभासदत्वाचा राजिनामा देतां येईल. राजिनाम्याचें पत्र ज्या दिवशीं केंद्रीय कार्यालयांत पोचेल त्या दिवसापासून त्या सभासदाचें सभासदत्व रद्द समजण्यांत येईल.

(५) कोणत्याहि वर्षाची वर्गणी तें वर्ष संपेपावेतों न दिली गेल्यास त्या वर्षापासून त्या सभासदाचें सभासदत्व स्थगित समजलें जाईल व एक वर्षानंतर त्या सभासदाचें सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

९ सभासदांचे अधिकार व कर्तव्यें:—

(अ) संघाच्या [७] (अ) ते (ए) वर्गाच्या कोणाहि सभासदास संघाच्या साधारण सभांस हजर राहण्याचा, चर्चेत भाग घेण्याचा, ठराव मांडण्याचा व मत देण्यांचा अधिकार राहील. तसेंच हिशेब व कागदपत्र, कार्यकारी मंडळाने केलेल्या नियमानुसार, पाहण्याचा अधिकार व सभासदत्वाचे इतर सर्व प्रकारचे अंगभूत अधिकार राहतील.

(आ) वर्ग [७] (ऐ)–सन्मान्य सभासद–यास संघाच्या सर्वसाधारण सभांना व संमेलनांना उपस्थित राहण्याचा आणि चर्चेत भाग घेण्याचा अधिकार राहील.

(इ) सभासद होऊन तीन महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.

(ई) जून अखेर वार्षिक वर्गणी न भरणाऱ्या जुन्या सभासदास वर्गणी भरीपर्यंत मताधिकार राहणार नाही.

१० साधारण सभा.

(अ) संघाची वार्षिक साधारण सभा एप्रिल ३० च्या आंत भरवावी. या सभेंत गतवर्षाचें कार्यवृत्त, हिशेब-तपासनिसाकडून तपासून घेतलेले हिशेब, पुढील वर्षाचें अंदाजपत्रक, व अधिकृत (चार्टर्ड) हिशेब-तपासनिसाची नेमणूक हीं कामें करण्य. .तील.

(आ) संमेलनाचे वेळीं आणि जरूर लागेल तेव्हा अध्यक्षाने किंवा कार्यकारी मंडळाने संघाची सभा भरवावी.

अनुक्रमणिका

(इ) सभेची गणपूर्ती ५० किंवा एकूण मतदार सभासदसंख्येच्या एक अष्टमांश यांपैकी जी कमी असेल ती राहील.

गणपूर्तीच्या अभावीं तहकूब झालेली सभा, त्या सभेच्या सूचनापत्रिकेंत तशी पूर्वसूचना दिली असल्यास, पहिल्या सभेच्या जागींच त्या सभेच्या वेळेनंतर अर्ध्या तासाने भरवितां येईल. स्थगित सभेस गणपूर्तीचा निर्बंध राहणार नाही. मात्र या सभेंत कार्यक्रम–पत्रिकेंत असलेल्या विषयांबाहेरचे प्रश्न विचारांत घेतां येणार नाहीत.

(ई) संघाच्या कोणत्याहि साधारण सभेची सूचना सभेच्या दिवसापूर्वी पंधरा दिवस अगोदर कार्यालयाने पाठवावी.

(उ) संघाच्या साधारण सभेंत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी चार दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.

(ऊ) **मागणी सभा**—मताधिकार असलेल्या सभासदसंख्येचा एक अष्टमांश किंवा पन्नास यांपैकी कमी असेल त्या संख्येइतक्या सभासदांनी लेखी मागणी केल्यास, मागणीपत्र पोचल्यापासून एक महिन्याच्या आंत संघाची विशेष साधारण सभा अध्यक्ष किंवा सरचिटणीस याने बोलाविली पाहिजे. अशा सभेंत मागणीपत्रांत नमूद केलेल्या विषयाखेरीज अन्य विषयाचा विचार करतां येणार नाही.

अशी सभा न बोलाविली गेल्यास मागणी करणारांस मध्यप्रदेशांतील दोन प्रमुख मराठी वृत्तपत्रांत जाहीर करून ही सभा बोलावितां येईल.

या विशेष सभेस गणपूर्ति नसल्यास ती सभा रद्द होईल.

(ए) जेथे विशिष्ट बहुमताचा उल्लेख केलेला नाही तेथे सर्व निर्णय साध्या बहुमताने घेण्यांत येतील.

११ कार्यकारी मंडळ

(अ) मतदार सभासदांनी निवडलेला एक अध्यक्ष व १६ सभासद आणि निवडून आलेल्या अध्यक्षाने उमेदवार होण्याची पात्रता असलेल्या सभासदांतून नियुक्त केलेले दोन सभासद अशा एकूण १९ सभासदांचें कार्यकारी मंडळ राहील.

(आ) हें कार्यकारी मंडळ आपल्यांतून अध्यक्षाखेरीज खालील पदाधिकारी निवडील:—

[१]	उपाध्यक्ष	…१
[२]	सरचिटणीस	…१
[३]	चिटणीस	…३
[४]	कोषाध्यक्ष	…१
[५]	संपादक ‘ युगवाणी ’	…१
[६]	संचालक परीक्षा–समिति	…१
	एकूण	८

१२ निवडणुकी

(अ) संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकी दर तीन वर्षांनी दिनांक १ मार्च पूर्वी करण्यांत येतील. यासाठी दिनांक २ डिसेंबर पर्यंत संघाच्या मतदार सभासदांची सूचि प्रसिद्ध करण्यांत येईल.

अनुक्रमणिका

या सूचींतील नांवांबद्दल जर कोणा सभासदांची तक्रार असेल तर त्याने दिनांक १५ डिसेंबरपर्यंत अध्यक्षाकडे ती लेखी पाठवावी. अध्यक्षाने तीवर निर्णय घेऊन अशा सर्व दुरुस्त्या दि. २ जानेवारीपर्यंत प्रसिद्ध कराव्या.

(आ) दिनांक १५ आक्टोबरपर्यंत जे सभासद नोंदलेले असतील व ज्यांच्याकडे कोणतीहि वर्गणी थकित नसेल अशाच सभासदांचा मतदार सभासदांच्या सूचींत समावेश होईल.

(इ) अध्यक्षाच्या निवडणुकीस तसेंच कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार सभासद होऊन ज्यांना संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें असेल व ज्यांच्याकडे कोणतीहि वर्गणी थकित नसेल अशाच सभासदांना राहील व त्यांची नांवें वरील सूचींत निराळीं दर्शविलीं जातील. या सूचीस 'अ' सूचि असें संबोधिलें जाईल.

(ई) मतदारांच्या सूचींतील कोणत्याहि व्यक्तीस निवडणुकींत उमेदवार म्हणून उभे राहण्यास पात्र असलेल्या कोणत्याहि व्यक्तीचें नांव तिच्या लेखी अनुमतीसह मतदानाच्या तारखेपूर्वी तीस दिवस अगोदर सुचवितां येईल.

मतदानाची तारीख म्हणजे मतपत्रिका सरचिटणिसांकडे पोचल्याच पाहिजेत यासाठी ठरविलेली अखेरची तारीख. ही तारीख दि. २ जानेवारीपर्यंत जाहीर करण्यांत आली पाहिजे.

(उ) नांवें सुचविण्याच्या शेवटच्या तारखेनंतर दोन दिवसांचे आंत निवडणुकीच्याकरिता उभे असलेल्या उमेदवारांच्या नामनिदर्शक पत्रिकांची छाननी करण्यांत आली पाहिजे. छाननी करतां नेमलेल्या दिवसांच्या नंतर पांच दिवसांच्या आंत कोणत्याहि उमेदवारास आपली उमेदवारी लेखी विनशर्त मागे घेतां येईल. अशाप्रकारें उमेदवारी परत घेतली जाण्याचा समय संपल्यानंतर योग्यप्रकारें नामनिर्दिष्ट झालेल्या उमेदवारांची यादी निश्चित करून ती केंद्रीय कार्यालयांत प्रकाशित झाली पाहिजे.

(ऊ) निवडणुकीसाठी निश्चित झालेल्या उमेदवारांच्या यादीसह मतपत्रिका मतदार सभासदांकडे मतदानाच्या तारखेपूर्वी निदान पंधरा दिवस अगोदर रवाना केल्या पाहिजेत.

(ए) मतमोजणी करून निकालाबद्दलचें प्रतिवृत्त कार्यकारी मंडळाला सादर करण्यासाठी कार्यकारी मंडळाचे सभासद नसलेल्या दोन गणकांची नियुक्ति उपनियम औ प्रमाणे नेमलेला निर्वाचनाधिकारी करील व त्यांच्याकडून हें प्रतिवृत्त आल्यावर तो अधिकारी निकाल जाहीर करील.

(ऐ) अध्यक्षपदासाठी किंवा कार्यकारिणींतील अखेरच्या जागेसाठी सारखीं मतें मिळालेल्या उमेदवारांतून निवड करावयाची झाल्यास ती निवड निर्वाचनाधिकाऱ्याने चिठ्ठया टाकून करावी.

(ओ) मतमोजणीच्या वेळीं उमेदवारांना किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहतां येईल.

(औ) अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकीच्या तारखा ठरविणे व नामनिर्देश पत्रांची छाननी व तदनंतरचीं निवडणुकीसंबंधाचीं कामें करण्याकरितां चालू निवडणुकीकरिता उभा न राहणारा व चालू कार्यकारी मंडळाचा सभासद नसलेला अशा एका सभासदाची नियुक्ति कार्यकारी मंडळ करील व हा अधिकारी निर्वाचनाधिकारी या नांवाने संबोधिला जाईल. दोन्ही निवडणुकींची वर म्हटल्याप्रमाणे सर्व कार्यवाही या अधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे होईल.

(अं) निवडणुकीबाबतच्या तक्रारींचा विचार करून निकाल देण्यासाठी साधारण सभेंत एक लवाद निवडण्यांत यावा. असा लवाद हा त्या निवडणुकींत उभे राहणारा उमेदवार किंवा त्या वेळच्या चालू कार्यकारिणीचा सभासद नसावा.

(अः) निवडणुकीसंबंधांत कोणाला कांही तक्रार करावयाची असेल तर त्याने निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून आठ दिवसांचे आंत आपल्या आधारासह निवडणूक लवादाकडे ती लेखी केली पाहिजे. निवडणूक लवादाने अशा तक्रारीसंबंधी अवश्य ती चौकशी करून आपला निर्णय तक्रार आल्यापासून पंधरा दिवसांचे आंत जाहीर केला पाहिजे. लवादाने अपरिहार्य कारणास्तव मागणी केल्यास १५ दिवसांच्या मुदतीपेक्षा अधिक मुदत देण्याचा अधिकार अध्यक्षास राहील. हा निर्णय अखेरचा समजला जाईल. लवादाच्या निकालामुळे एक अथवा अधिक जागांची फेरनिवडणूक अवश्य झाल्यास ती करण्याची व्यवस्था अध्यक्षांनी तावडतोब केली पाहिजे.

१३ सभासदांची नियुक्ति

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर दहा दिवसांत नवीन अध्यक्ष नव्या कार्यकारी मंडळावर दोन सभासद नियुक्त करील.

१४ कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी निवडण.

(अ) निवडणुकीच्या निकालापासून वीस दिवसांच्या आंत नवीन निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा, वर कलम ११ (आ) मध्ये नमूद केलेले पदाधिकारी निवडण्यासाठी, जुना अध्यक्ष बोलावील. नवीन अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या नवीन सभासदांना ह्या सभेंत हजर राहून मत देण्याचा पूर्ण अधिकार राहील. त्यांपैकी कोणाच्या निवडणुकीविरुद्ध लवादासमोर अर्ज अनिर्णित आहे ही गोष्ट त्यांच्या मताधिकारास अगर सभेच्या निर्णयास बाधक होणार नाही. लवादाच्या निर्णयामुळे ह्या सभेच्या वेळीं ज्यांची निवडणूक रद्द झाली असेल त्यांना ह्या सभेच्या कारवाईत भाग घेतां येणार नाही, परंतु इतर सभासदांना त्या जागेवर पुन्हा निवडणूक होईपर्यंत वाट न पहातां ह्या नियमानुसार पदाधिकारी निवडण्याचा व घटनेप्रमाणे इतर सर्व कार्य करण्याचा पूर्ण अधिकार राहील. लवादाने जर नवीन अध्यक्षाची निवडणूक रद्द ठरविली असेल तर पुन्हा निवडणूक होईपर्यंत जुना अध्यक्ष हाच नवा अध्यक्ष म्हणून कार्य चालवील. हें नवें कार्यकारी मंडळ दिनांक १ एप्रिलपासून अधिकारारूढ होईल.

(आ) अध्यक्ष जर नागपूरबाहेरचा असेल तर उपाध्यक्ष नागपूरचा असला पाहिजे. सरचिटणीस, एक चिटणीस व कोषाध्यक्ष हे नागपूरचेच राहणारे असले पाहिजेत.

(इ) लवादाच्या निर्णयाव्यतिरिक्त कोणत्याहि अन्य कारणाने अध्यक्षाची अगर कार्यकारी मंडळांतील कोणतीहि जागा रिकामी झाल्यास ती भरण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

१५ कार्यकारी मंडळाचीं कर्तव्यें व अधिकार

कार्यकारी मंडळ हेंच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वयें नेमावें लागणारें जनरल कौन्सिल समजलें जाईल.

संघाचीं सर्व कामें कार्यकारी मंडळ करील व अध्यक्ष हा संघाचा कार्यप्रमुख राहील. अध्यक्षाच्या अनुपस्थितींत अध्यक्षाचे सर्व अधिकार उपाध्यक्षास राहतील. कार्यकारी मंडळ मुख्यतः पुढील कामें करील—

(अ) संघाच्या नियमाप्रमाणे संमेलन भरविण्याची व्यवस्था करणें.

(आ) संघाचें नियतकालिक चालविणें.

(इ) मराठी भाषेचें अध्ययन, अध्यापन व परीक्षा यांची व्यवस्था करणें.

अनुक्रमणिका

(ई) वार्षिक अहवाल, हिशेब व अंदाजपत्रक हीं तयार करून सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणें. हे हिशेब संघाच्या साधारण सभेने नियुक्त केलेल्या अधिकृत (चार्टर्ड) हिशेबतपासनिसाने तपासून दिलेले असले पाहिजेत.

(उ) संमेलनाने व साधारण सभेने केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणें, आणि साधारण सभा नेमून देईल तीं कामें पार पाडणें.

(ऊ) संघाच्या कार्याकरिता द्रव्यनिधि जमविणें; उपकर्ते, आश्रयदाते, सभासद इत्यादि मिळविणें आणि नियमांनुसार संघनिधीची व्यवस्था करणें.

(ए) संघाच्या नियमांप्रमाणे साधारण सभा भरविणें.

(ऐ) संघामार्फत होणाऱ्या प्रकाशनांची व्यवस्था करणें.

(ओ) संघाचे उद्देश व घटना यांस अनुसरून संघाच्या कार्यासंबंधी सूचना करणें व मार्गदर्शन करणें; विशिष्ट कामांसाठी उपसमिति व शिष्टमंडळें नेमणें व जरूर तो अन्य उपक्रम करणें.

(औ) शाखासभा स्थापणें व संलग्न संस्था नोंदविणें.

(अं) उपसमिति, शाखासभा इत्यादींच्या कामकाजाचे उपनियम ठरविणें.

(अः) संघाचें दप्तर सांभाळणें, संघाच्या आणि संघाकडे सोपविलेल्या मालमत्तेचे रक्षण करणें.

१६ द्रव्यनिधि व मालमत्ता

(अ) विदर्भ साहित्य संघाचा द्रव्यनिधि व मालमत्ता पुढीलप्रमाणे राहील:—

कायम निधिः—संघाच्या उत्पन्नांतून व शिल्कींतून कार्यकारी मंडळ कायमनिधि म्हणून ठेवील ती रकम; तसेंच, नियम ७ (अ), (आ), (इ) व (ई) या चारी वर्गांतील सभासदांच्या देणग्यां-मधून विशिष्ट कार्यांकित असलेल्या रकमा व आजीव सभासदत्वाच्या वर्गण्या ह्या दोन्हीहि जाऊन शिल्लक राहणाऱ्या रकमा.

हा निधि किमान दोन हजार रुपये राहील व तो विश्वस्तांच्या स्वाधीन राहील; आणि त्यांत कार्यकारी मंडळाने वेळोवेळीं भर घालावी. या निधींचें व्याज चालू निधींत जमा केलें जाईल. या कायम निधींतून रकम खर्च करावयाची झाल्यास त्याला विश्वस्तांची किंवा साधारण सभेची मंजुरी लागेल.

चालू निधी—

(१) कायम निधींत व विशेष निधींत समाविष्ट न होणाऱ्या सर्व वर्गण्या व देणग्या,
(२) संघाचें ग्रंथप्रकाशन व ग्रंथविक्री यांचें येणारें उत्पन्न,
(३) परीक्षांचें शुल्क,
(४) बँकांतील रकमांवर येणारें व्याज, आणि
(५) इतर सर्व उत्पन्न,

यांचा चालू निधींत समावेश होईल.

चालू निधीचा जमाखर्च ठेवण्यासंबंधीचे उपनियम हिशेबतपासनिसाच्या सूचनेनुसार कार्यकारी मंडळ बनवील,

विशेष निधि—

संघाला विशेष कार्यासाठी मिळालेल्या देणग्या व जमविण्यांत आलेला निधि हा विशेष निधि होय; व तो त्याच विशेष कार्यासाठी खर्च करण्यांत येईल. ही रकम अपरिहार्य कराणासाठी अन्य कामीं खर्च करावयाची झाल्यास ती परत त्या खातीं जमा करण्याचें बंधन कार्यकारी मंडळावर राहील.

(आ) संघाच्या विश्वस्तांकडे सोपविण्यांत येणाऱ्या मालमत्तेव्यतिरिक्त सर्व मालमत्ता संघाचे मुख्य अधिकारी म्हणून संघाच्या अध्यक्षाच्या नांवाने राहील; मात्र बॅंकेंतील सर्व व्यवहार कोषाध्यक्षाच्या नांवें खातें उघडून करण्यांत येईल. अध्यक्षाच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रकास व कार्यकारी मंडळाच्या ठरावांस धरून या निधींतून कोषाध्यक्ष रकमा देईल.

१७ विश्वस्तांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्यें

विश्वस्तांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्यें हीं विश्वस्तपत्रांत नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१८ संमेलन

(अ) विदर्भ साहित्य संघाचें संमेलन दर वर्षी होतां होईतों डिसेंबर महिन्यांत भरविण्याची जबाबदारी सर्वस्वी कार्यकारी मंडळावर आहे. कोणत्याहि शाखासभेस अथवा संलग्नसंस्थेस कार्यकारी मंडळाच्या संमतीने हें संमेलन भरवितां येईल.

(आ) संघाच्या सभासदांनाच संमेलनांत ठराव आणण्याचा, भाषण करण्याचा व मत देण्याचा अधिकार राहील.

(इ) संमेलनापुढे मांडावयाच्या ठरावांची सूचना संमेलन भरावयाच्या तारखेपूर्वी १४ दिवस अगोदर सरचिटणिसाकडे पाठविली पाहिजे.

(ई) संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी कार्यकारी मंडळ तीन नांवें सुचवील व ह्या तीन नांवांतून संमेलनाचें स्वागतमंडळ संमेलनाच्या अध्यक्षाची निवड करील. संमेलनाच्या अध्यक्षाचे अधिकार संमेलनापुरतेच मर्यादित राहतील.

(उ) विषय-नियामक-समिति पुढीलप्रमाणे राहील—

(१) संघाध्यक्ष, स्वागताध्यक्ष व उपस्थित असलेले माजी संघाध्यक्ष,
(२) चालू कार्यकारी मंडळाचे सर्व सभासद,
(३) उपस्थित असलेल्या सर्व सभासदांतून अध्यक्षाने नियुक्त केलेले पन्नास सभासद, आणि
(४) स्वागताध्यक्षाने स्वागत-समितींतून नियुक्त केलेले दहा सभासद.

(ऊ) विषय-नियामक-समितींत असंमत झालेले ठराव किंवा उपसूचना खुल्या अधिवेशनांत मांडावयाच्या असल्यास, अशा ठरावावर अथवा उपसूचनेवर मतें देणाऱ्या एक चतुर्थांश सभासदांच्या सह्यांनिशीं, तशी लेखी सूचना त्या बैठकीनंतर होणाऱ्या संमेलनाच्या जाहीर बैठकीच्या सुरवातीपूर्वी दिली पाहिजे व असा ठराव अथवा उपसूचना आणण्याची सूचना आपण देणार असल्याचें त्या सभासदाने विषय-नियामक-समितींत त्याच वेळीं अध्यक्षास लेखी कळविलें पाहिजे.

(ए) संमेलनाच्या सर्व खर्चाची जबाबदारी निमंत्रण देणारी संस्था व त्या संस्थेने निर्माण केलेलें स्वागतमंडळ यांच्यावर राहील. संमेलनाच्या अध्यक्षांचा प्रवासखर्च स्वागतमंडळ करील व भाषणाचा मुद्रणखर्च संघ करील.

अनुक्रमणिका

(ऐ) संमेलनाची सर्व कार्यवाही निमंत्रण देणारी संस्था संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सल्ल्याप्रमाणे करील.

(ओ) संमेलनासंबंधी इतर सर्व उपनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

१९ शाखा—सभा

(अ) मध्यप्रदेशाच्या निरनिराळ्या भागांत विदर्भ साहित्य संघाच्या शाखा स्थापण्याचा प्रयत्न कार्यकारी मंडळाने करावा. शाखा सभा स्थापन करण्यास निदान २५ सभासद त्या भागांतील रहिवासी असले पाहिजेत.

(आ) त्या त्या भागांतील विदर्भ साहित्य संघाचे सभासद त्या त्या शाखासभेचे सभासद राहतील. त्यांतील साधारण सभासदांच्या वर्गणीपैकी षष्टांश रकम विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाकडून शाखेचें कार्य चालविण्यासाठी देण्यांत येईल.

(इ) शाखासभेने आपलें कार्य कार्यकारी मंडळाच्या देखरेखीखाली करावं. कार्यकारी मंडळाने कांही विशिष्ट कामें तिजकडे सोपविल्यास तींहि करावी. तसेंच शाखासंमेलनें शक्यतोंवर दर वर्षी भरविण्याचा प्रयत्न करावा.

(ई) शाखासभेच्या सर्व स्थावर आणि जंगम मालमत्तेवर विदर्भ साहित्य संघाची मालकी राहील.

(उ) शाखासभेचें पदाधिकारी मंडळ यांची निवड त्या शाखेचे सभासद करतील. शाखासभा ज्या विभागाची असेल त्या विभागांत राहणारा विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाचा सभासद शाखासभेच्या कार्यकारी मंडळाचा पदसिद्ध सभासद राहील.

(ऊ) शाखासभेच्या कारभाराची चौकशी करण्याचा अधिकार संघाच्या अध्यक्षास राहील. शाखासभेच्या निवडणुकी अगर इतर कोणतेहि प्रश्न याबाबत वाद उपस्थित झाल्यास त्याचा निर्णय संघाचा अध्यक्ष करील व तो अखेरचा राहील.

(ए) चौकशीच्या कामीं अध्यक्ष मागेल ती शाखासभेच्या कारभाराची सर्व माहिती शाखासभेच्या कार्यकारी मंडळाने दिली पाहिजे. शाखासभेने आपले हिशेब व दप्तर व्यवस्थित ठेवलें पाहिजे. शाखासभेचा कारभार असमाधानकारक होत असल्याचें आढळून आल्यास शाखासभेचें म्हणणें ऐकून तिची मान्यता रद्द करण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास राहील.

(ऐ) वरील नियमास अविरोधी असे उपनियम करण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास राहील.

२० संलग्न संस्था

(अ) विदर्भ साहित्य संघाचे उद्देश मान्य असणाऱ्या व संघाच्या कार्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या, समान उद्देश असणाऱ्या संस्था संलग्न करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(आ) संलग्न संस्थांना नोंदणी आकार पांच रुपये व वार्षिक वर्गणी पांच रुपये द्यावी लागेल.

(इ) संलग्न संस्थेची अंतर्गत व्यवस्था व आर्थिक परिस्थिति यांची कोणतीहि जबाबदारी विदर्भ साहित्य संघावर राहणार नाही.

(ई) संलग्न संस्थेने आपल्यातर्फे नोंदलेला एक प्रतिनिधि संघाचा प्रतिनिधि सभासद राहील.

(उ) संलग्न संस्थेने आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल संघाच्या कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहिजे.

२१ इतर नियम

(अ) विदर्भ साहित्य संघाची साधारण सभा, कार्यकारी मंडळाची सभा, संमेलन, विशिष्ट सभा, व उपसमिति यांच्या कामकाजाची नोंद व्यवस्थितपणें पुस्तकांत केली जाऊन ती त्या त्या सभांच्या पुढील बैठकींत मंजूर झाली पाहिजे.

(आ) विदर्भ साहित्य संघाचें दप्तर, पत्रव्यवहार, निरनिराळ्या सभांच्या वृत्तांतांचीं पत्रकें वगैरे सर्व सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सरचिटणिसावर व नागपूरच्या चिटणिसावर राहील.

(इ) संघाच्या प्रत्येक सभासदास संघाचें नियतकालिक 'युगवाणी' विनामूल्य पाठविण्यांत येईल. संघाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या सर्व सूचना अधिकृत समजण्यांत येतील. सभासदांकडे त्या पुन्हा स्वतंत्र रीतीने पाठविल्या जाणार नाहीत.

(ई) योग्य कारण न कळवितां कोणतीहि समिति वा कोणतीहि उपसमिति यांच्या तीन सभांस लागोपाठ अनुपस्थित राहणाऱ्या सभासदाचें त्या त्या ठिकाणचें सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(उ) संघाच्या ध्येयधोरणाला पोषक व घटनेस अविरोधी असे उपनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संघाच्या सभासदांना या उपनियमांची व घटनेची एक प्रत विनामूल्य देण्याची व्यवस्था कार्यकारी मंडळाने करावी.

(ऊ) नवीन कार्यकारी मंडळाची निवड होईपर्यंत जुनें कार्यकारी मंडळच कार्य करील.

(ए) घटनेंत उल्लेखित नसलेले शेषाधिकार अध्यक्षांत निहित राहतील.

(ऐ) संघाच्या वतीने कायदेशीर कामें करण्याकरिता आणि कायद्याचा सल्ला देण्यासाठी योग्य सल्लागार नेमण्याचा अधिकार संघाच्या अध्यक्षास राहील. तसेंच न्यायालयीन कार्यासाठी संघाचें प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार अध्यक्ष, सरचिटणीस किंवा नागपूरचा चिटणीस ह्यांना राहील.

(ओ) [१] जर कार्यकारी मंडळाच्या मतें संघाच्या कोणत्याहि सभासदाचें वर्तन संघाचें ध्येय, उद्देश अथवा हित यांना बाधक होणारें असेल तर कार्यकारी मंडळास बहुमताने त्या सभासदाचें सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार राहील. परंतु अशा प्रकारचा ठराव करण्यापूर्वी कार्यकारी मंडळाच्या वतीने त्या सभासदाच्या वर्तनांतील आक्षेपार्ह भाग काय आहे हें त्यास कळवून त्याचें उत्तर मागविलें गेलें पाहिजे व ज्या सभेंत संबंधित सभासदाचें स्पष्टीकरण विचारण्यांत येईल त्या सभेसमोर तोंडी निवेदन करण्याची संधि त्या सभासदाला दिली पाहिजे.

[२] अशा रीतीने संघाचें सभासदत्व रद्द केल्या गेलेल्या व्यक्तीस कार्यकारी मंडळाचा ठराव पोचण्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आंत अपीलाचे रूपाने तो प्रश्न सर्वसाधारण सभेपुढे मांडण्याकरिता सरचिटणिसांकडे आवेदनपत्र देतां येईल.

[३] अशा प्रकारें अपील न केल्यास सभासदत्व रद्द झालेल्या व्यक्तीबाबत कार्यकारी मंडळाने केलेला निर्णय अखेरचा व निर्णायक समजण्यांत येईल; परंतु जर अपील केलें गेलें तर सर्वसाधारण सभेकडून होणारे निर्णय अखेरचे व निर्णायक समजण्यांत येतील.

अनुक्रमणिका

२२ घटनेंत बदल.

विदर्भ साहित्य संघाच्या घटनेंत फेरबदल करणें झाल्यास एक महिन्याची पूर्वसूचना देऊन साधारण सभेंत किंवा त्यासाठी बोलाविलेल्या संघाच्या विशेष साधारण सभेंत ते करण्यांत येतील. या सभेला हजर असणाऱ्या सभासदसंख्येच्या तीन चतुर्थांश सभासदांच्या मतानेच हे फेरबदल करण्यांत येतील.

२३ ही घटना दि. ३०-१-५६ पासून अंमलांत येईल व तेव्हापासून पूर्वीची घटना तिच्या सर्व दुरुस्त्यांसह रद्द समजण्यांत येईल.

कामकाजाचे उपनियम

(१) संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यांतून निदान एकदा तरी भरेल. विशेष प्रसंगीं तातडीची सभा बोलावण्याचा अधिकार अध्यक्ष व सरचिटणीस यांना राहील. सभेची निदान तीन दिवसांची पूर्वसूचना देण्यांत येईल.

(२) कार्यकारी मंडळाची गणपूर्ती ६ ही राहील. गणसंख्या न जमल्यास सभेच्या त्याच दिवशीं व त्याच जागीं, आगाऊ पूर्वसूचना दिली असल्यास, पूर्वनियोजित सभेच्या वेळेनंतर अर्ध्या तासाने स्थगित सभा भरवितां येईल. मात्र अशा सभेंत कार्यक्रमपत्रिकेव्यतिरिक्त कोणतेंहि कामकाज करतां येणार नाही.

(३) कार्यकारी मंडळाची सभा बोलाविण्यास सवड नसेल तर सभासदांचा लेखी अभिप्राय मागवून अध्यक्षाला तातडीचीं कामें करतां येतील. कार्यकारी मंडळाच्या चार सभासदांनी या कामास आपली लेखी असंमति कळविल्यास त्या कामासाठी सभा बोलाविली पाहिजे.

(४) संघाच्या दैनंदिन खर्चासाठी म्हणून, आवश्यक असल्यास, सरचिटणिसाजवळ रु. १०० (शंभर) पर्यंत रकम ठेवतां येईल. यापेक्षा अधिक रकम तावडतोब बँकेंत जमा करावी.

(५) संघाचें सर्व प्रकारचें रोकड उत्पन्न रोजच्या रोकड-वहींत नोंदलें पाहिजे; व वसुलीच्या पावत्या दिल्या पाहिजेत.

(६) संघाचे सर्व जमाखर्च नियमानुसार ठेवण्याची जबाबदारी नागपूरचा चिटणीस व अध्यक्ष यांजवर राहील.

(७) प्रत्येक खर्चाचें प्रमाणपत्र (व्हाऊचर) घेतलें पाहिजे, किंवा नागपूरच्या चिटणीसाने त्या खर्चाचा दाखला दिला पाहिजे.

(८) सरचिटणिसाला १० रु. पर्यंत खर्च करण्याचा अधिकार राहील. त्यावरील खर्चास अध्यक्षांची लेखी संमति घेतली पाहिजे.

(९) जमाखर्चासाठी रोजनामा, खातेपुस्तक, जमेच्या पावत्या व खर्चाचीं प्रमाणपत्रें अगर चिटणिसाचे दाखले हे ठेवण्यांत आले पाहिजेत.

(१०) बँकेचीं पासबुकें व चेकबुकें सरचिटणिसाच्या ताब्यांत राहतील. बँकेंतून खर्चासाठी रकम काढावयाची झाल्यास अध्यक्षांची लेखी परवानगी घेऊन, त्यांच्या आदेशाप्रमाणे सरचिटणिसाने चेक लिहून कोषाध्यक्षाकडे सहीसाठी पाठवावा व अध्यक्षाचा हुकूम पाहून त्यावर कोषाध्यक्षाने स्वाक्षऱ्या कराव्यात.

(११) संघाचें कार्यालय, कागदपत्र, हिशेब वगैरे संघाच्या कोणत्याहि सभासदास पाहावयाचे असल्यास, त्याने तशा अर्थाची कमींत कमी तीन दिवसांची पूर्वसूचना चिटणिसाला दिली पाहिजे. म्हणजे कार्यालयाच्या सोईप्रमाणे कार्यालयाच्या कामाच्या वेळांत ते पाहावयास मिळतील.

(१२) अध्यक्षांच्या अनुपस्थितींत उपाध्यक्ष अध्यक्षांचीं कामें करील. एखाद्या सभेस दोघेहि अनुपस्थित असल्यास हजर असलेले सभासद त्या सभेपुरता अध्यक्ष आपल्यांतून निवडतील.

(१३) कार्यकारी मंडळाच्या सभासदांना, जेथे सभा असेल त्या ठिकाणचे जर ते रहिवासी नसतील तर, जाण्यायेण्याचें तिसऱ्या वर्गाचें रेल्वें भाडें (अगर मोटारचें साधारण भाडें) देण्यांत येईल. मात्र संमेलनाच्या वेळीं भरणाऱ्या सभांचा असा प्रवासभत्ता मिळणार नाही.

(१४) संघाचें नियतकालिक चालविण्यासाठी एका संपादक-मंडळाची नेमणूक कार्यकारी मंडळ करील, आणि अशा संपादक-मंडळाच्या सल्ल्याने व सहकार्याने संपादक तें नियतकालिक चालवील.

(१५) संघातर्फे घेण्यांत येणाऱ्या परीक्षांच्या संचालनकार्यासाठी कार्यकारी मंडळ एक परीक्षा समिति नेमील, आणि या परीक्षा समितीच्या सल्ल्याने व सहकार्याने परीक्षासंचालक कार्य करील.

(१६) कार्यकारी मंडळाने एक स्थायी अर्थसमिति नेमावी व तिने संघाचे जमाखर्च व हिशेब ठेवणें या बाबतींत साहाय्य करावें.

(१७) संघाच्या सर्व मालमत्तेचें एक नोंदणी पुस्तक (स्टाक-रजिस्टर) सरचिटणीस ठेवील.

(१८) संघाचे वैतनिक सेवक नेमण्याचा, त्यांचें वेतन ठरविण्याचा आणि त्यांच्या संबंधांत उपनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(१९) (अ) अंदाजपत्रकांत मंजूर झालेल्या मर्यादांपर्यंत रकमा त्या त्या कार्यासाठी खर्च करण्याचा अधिकार अध्यक्षास राहील.

(आ) दि. १ एप्रिलपासून तों पुढील वर्षाचें अंदाजपत्रक साधारण सभेंत मंजूर होईपर्यंत नित्य व नैमित्तिक खर्च करण्याचा अधिकार अध्यक्षास राहील.

(इ) अंदाजपत्रकांत तरतूद नसलेल्या विशेष निकडीच्या कामासाठी तीनशें रुपयेपर्यंत खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(ई) विशेष निधि जमा करण्याचा व त्यांतून खर्च करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास अथवा त्याने नेमलेल्या विशेष समितीस राहील.

शेवटीं पुढील ठराव मंजूर झाल्यावर ही सभा संपली.

निर्वाचनाधिकारी नेमण्यासंबंधीची कार्यवाही ह्या तारखेपासून दोन दिवसांत केली पाहिजे व तो अधिकारी त्या तारखेनंतर करावयाच्या निवडणुकीच्या कामकाजाबद्दल आदेश देईल व तत्पूर्वी अध्यक्षांच्या आदेशाने केल्या गेलेल्या कामांबाबत कोणचाहि आक्षेप घेण्याचा कोणालाहि अधिकार राहणार नाही.

* *

अनुक्रमणिका

कार्यकारी मंडळाची सभा

बुधवार दि. १-२-५६ रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां, दि. २१-१-५६ रोजीं दुपारीं २ वाजतां भरलेल्या विशेष साधारण सभेने मंजूर केलेल्या घटना दुरुस्तीच्या ठरावानुसार, येत्या निवडणुकीसाठी निर्वाचनाधिकारी नियुक्त करण्यासाठी, कार्यकारी मंडळाची सभा केंद्रीय कार्यालयांत संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

प्रथम सरचिटणिसांनी दि. २४-१२-५५ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

नंतर निर्वाचनाधिकारी निवडण्यासाठी प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी श्री. मुकुंद हरि मुंजे, वकील, रामदासपेठ, नागपूर; यांचें नांव सुचविलें. प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी त्यास दुजोरा दिला. दुसरें नांव पुढे न आल्याने, श्री. मुंजे यांची एकमताने घटना दुरुस्ती नियम ४ (नियम १२) कलम ९ अनुसार निवडणुकीची पुढील कार्यवाही करण्यासाठी नियुक्ति करण्यांत आली.

कोषाध्यक्षांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र बँकेंत सेव्हिंग्ज अकाउंट उघडून २०१० रु. (दोन हजार रु.) करंट अकाउंटमध्ये ठेऊन बाकीचे सेव्हिंग्ज अकाउंटमध्ये ठेवण्यांत यावेत आणि अध्यक्षांच्या नांवें २००० रु. (दोन हजार रु.) फिक्स डिपॉझिटमध्ये मध्यप्रदेश कोऑपरेटिव्ह बँकेंत, जमा करण्याचें एकमताने ठरलें.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम

दि. ४-२-५६ रोजीं सुप्रसिद्ध कवि आणि नाटककार श्री. कुसुमाग्रज यांचा सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं त्यांनी उपस्थितांशीं प्रश्नोत्तर रूपाने चर्चा केली. त्यामुळे कार्यक्रम उद्बोधक झाला.

चिनी सांस्कृतिक शिष्टमंडळाची भेट

दि. १९-२-५६ रोजीं सकाळीं ८-३० वाजतां सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे चिनी सांस्कृतिक शिष्टमंडळाचा सत्कारसमारंभ करण्यांत आला.

प्रा. श्री. के. क्षीरसागर, पुणें

दि. २०-२-५६ रोजीं सकाळीं ८ वाजतां ख्यातनाम साहित्यिक व टीकाकार प्रा. श्री. के क्षीरसागर यांचें सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे बोधप्रद व्याख्यान झालें.

"आइन्स्टाईनचा सापेक्षवाद"

दि. २१, २२, २३ आणि २४ फेब्रुवारी ५६ रोजीं वि. सा. संघांत संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचीं "आइन्स्टाईनचा साक्षेपवाद" या विषयावर विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें झालीं.

*   *

नाट्य—समिति

"राक्षसी महत्त्वाकांक्षा"—दि. १४-२-५६ रोजीं नाटयसमितितर्फे प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचें "राक्षसी महत्वाकांक्षा" या नाटकावर विद्यार्थ्यांना उपयुक्त असें व्याख्यान झालें.

"विकारविलसित"--दि. २६-२-५६ रोजीं नाटयसमितितर्फे प्रा. या. मु. पाठक यांचें "विकारविलसित" या नाटकावर विद्यार्थ्यांना उपयुक्त असें व्याख्यान झालें.

१९५६–५७ ते १९५८–५९ सालासाठी अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकी

सोमवार दिनांक २०–२–५६ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां निर्वाचनाधिकाऱ्यांच्या उपस्थितींत मतमोजणीस प्रारंभ झाला. ह्याच दिवशीं पहाटे ३ च्या सुमारास अध्यक्षपदाकरिता मतमोजणी संपली. दि. २१–२–५६ रोजीं कार्यकारी मंडळाच्या सभासदांच्या निवडणुकीकरितां मतमोजणीस सायंकाळीं ६-३० वाजतां सुरुवात होऊन पहाटे ३ च्या सुमारास मतमोजणीचें काम संपलें.

निर्वाचनाधिकारी श्री. मु. ह. मुंजे यांनी विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदासाठी १९५६-५७ ते १९५८-५९ ह्या तीन वर्षांकरिता श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे हे निवडून आले असून कार्यकारी मंडळासाठी पुढील सोळा सभासद निवडून आले आहेत असें जाहीर केलें.

१. प्रा. पां. कृ. सावळापूरकर
२. श्री. ल. वि. पांढरीपांडे
३. प्रा. माणिक के. बैतुले
४. श्री. मा. ल. व्यवहारे
५. डॉ. पु. गो. एकबोटे
६. श्री. द. रा. गोमकाळे
७. श्री. चं. प. भिशीकर
८. श्री. श्री. गो. काशीकर
९. श्री. कृ. व्यं. पेशकार
१०. श्री. पां. बा. गडकरी
११. श्री. रा. पु. सगदेव
१२. श्री. तु. ना. काटकर
१३. श्री. श्री. ग. पांढरीपांडे
१४. श्री. य. गो. मालोदे
१५. श्री. मा. तु. दलाल
१६. तु. वि. गेडाम

नवीन संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी दिनांक १–३–५६ रोजीं, घटना नियम

१३ प्रमाणे श्री. ना. रा. शेंडे आणि कु. ताराबाई प्रधान यांची १९९६–९७ ते १९९८–९९ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर सभासद म्हणून नियुक्ति केली.

*   *

शाखावृत्त : हिंगणघाट शाखा

विदर्भ साहित्य संघ, हिंगणघाट शाखेचा द्वितीय वार्षिकोत्सव शुक्रवार दिनांक २७ जानेवारीला मोहता सरायच्या सभागृहांत उत्साहाने साजरा करण्यांत आला. श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांनी मुद्दाम तयार करण्यांत आलेल्या व्यासपीठावर, अध्यक्षपद ग्रहण केलें. मुलींच्या स्वागत-गीताने व महाराष्ट्र-गीताने समारंभास सुरुवात झाली. बाबासाहेबांना शाखेतर्फे पुष्पमाला अर्पित करण्यांत आली.

श्री. पुसेगांवकरांनी आपल्या परिचयात्मक भाषणांत बाबासाहेबांचा यथोचित शब्दांत गौरव केला.

नंतर विदर्भ साहित्य संघ, हिंगणघाट शाखेचे सरचिटणीस श्री. म. वि. करपे यांनी संस्थेचा अहवाल सादर केला व हिंगणघाट येथे एक सभागृह बांधण्याचा विचार आहे असें सांगितलें. बाबासाहेबांनी शाखेतर्फे काढलेल्या प्रेरणा त्रैमासिकाचें उद्‌घाटन केलें.

आपल्या भाषणांत त्यांनी देशाच्या कल्याणाकरिता साहित्य निर्माण व्हायला पाहिजे. असें सांगून ती कामगिरी आपण करायला हातभार लावाल, अशी सदिच्छा व्यक्त केली.

श्रीमान बावासाहेबांचें भाषण संपल्यावर श्री. ना. ल. पोतदार यांनी उपस्थितांचे आभार मानले. श्री. इंदुरकरांचें वंदेमातरम् झाल्यावर हा गोड समारंभ संपला.

प्रा. ना. ल. पोतदार यांचा सत्कार व निरोप

दिनांक १६–२–९६ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां येथील भारत विद्यालयांत स्थानिक शाखेतर्फे प्रा. ना. ल. पोतदार, यांचा सत्कार करण्यांत येऊन त्यांना सर्व सभासदांतर्फे प्रेमाचा निरोप देण्यांत आला.

*   *

परीक्षा समिति वृत्त, शेंबा

